# माणूस

शनिवार । २७ नोव्हेंबर १९७६ । साठ पैसे

कामगारवर्ग व बुद्धिवादी
यांनी आपले हितसंबंध
एकच आहेत हे ओळखणे
ही आपल्या युगातील
एक महत्त्वाची गरज होय.

—सार्खॅरावचा जाहीरनामा

# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक सव्विसावा

२७ नोव्हेंबर १९७६

मूल्य : साठ पैसे



संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

◻

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये

सहामाही वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

◻

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

◻

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

◻

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

◻

दूरध्वनी : ४३४५९

◻


# नव्याने गिरवायचा धडा

श्री. मा. भावे

गेल्या २६ जूनला आणीबाणीची घोषणा करण्यात आली, त्यावेळी अनेकांना देशातील लोकशाही राज्यरचनेवर या घोषणेने प्रहार झाला आहे, असे वाटले. खुद्द पंतप्रधानांनीही 'लोकशाहीची गाडी रुळावरून खाली आली' असे म्हटले. तेव्हा आणीबाणीच्या घटनेनंतरची परिस्थिती नेहमीच्या लोकशाहीप्रथांना डावलणारी आहे, हे सर्वांना मान्य आहे.

परंतु लोकशाहीची सर्व अंगे आपल्याकडे शाबूत आहेत, इतकेच नव्हे तर कामही करीत आहेत, हे स्पष्ट दिसते. लोकसभा व विधानसभा यांची अधिवेशने होत आहेत व सर्व सरकारी कायदे आणि वटहुकूम यांना त्यांची मंजुरी घेतली जात आहे. न्यायालये सरकारविरुद्ध निर्णयही देत आहेत; म्हणजेच त्यांचे स्वातंत्र्य अबाधित आहे. कोणत्याही राजकीय पक्षावर बंदी नाही. वृत्तपत्रांवरील निर्बंधही शिथिल होत आहेत.

असे सर्व असताना 'लोकशाहीची गाडी रुळावरून खाली आली' असे पंतप्रधान म्हणतात, याचा अर्थ काय असावा? पंतप्रधान या थोर व्यक्ती आहेत. त्यांच्या मौनाचा अर्थ लावण्यातही बुद्धिमंत आणि पत्रपंडित कृतार्थता मानतात. परंतु त्यांच्या या वाक्याचा अर्थ सामान्य जनांना समजावून सांगण्याचे काम काँग्रेसमधील पंडितांनीही केले नाही. तथापि, 'आता आणीबाणी शिथिल करून परिस्थिती पूर्ववत करावी,' असे आवाहन केले जाते, तेव्हा आणीबाणीमुळे नेमका काय फरक पडला, याचा विचार करावा लागतो. हा विचार करावयाचा म्हणजेच पंतप्रधानाच्या वरील वाक्याचा अर्थ लावावयाचा.

लोकशाहीला एका विशिष्ट पद्धतीच्या राजकारणाची अपेक्षा असते. हे राजकारण म्हणजे कोणत्याही प्रश्नावर सार्वजनिक चर्चेने बहुमत निर्माण करण्याची प्रक्रिया. असेही म्हणण्यास हरकत नाही की असे राजकारण अबाधित राहावे म्हणून लोकशाही शासनपद्धती निर्माण झाली. आणीबाणीनंतर हे राजकारण बंद पडले. कारण आणीबाणीचा अर्थच असा, की निर्णय कसा घेतला व कोणता घेतला यापेक्षाही कोणता तरी निर्णय घेतला गेला, याला जास्त महत्त्व येते अशी परिस्थिती. अशा परिस्थितीत बहुमत घडवील अशी चर्चा दुय्यम महत्त्वाची ठरली तर ते साहजिक आहे.

आता सत्तारूढ पक्ष आणि पक्षीय राजकारणाशी संबंध नसलेले काही विचारवंत यांचे म्हणणे असे आहे की, आणीबाणीच्या घोषणेनंतर लोकशाही राजकारण संपले असे नसून, लोकशाही राजकारण संपले म्हणून आणीबाणीची घोषणा करावी लागली. काही जण असे म्हणतील (आणि या काही जणांत आचार्यकुलाचा समावेश होतो) की, हा मुद्दा आता महत्त्वाचा उरलेला नाही. या चर्चेने आता काही साधणार नाही. पण हे म्हणणे चूक आहे. आपण लोकशाही राजकारण पुन्हा चालू राहावे, अशी अपेक्षा करीत असू तर पूर्वी चालू असलेल्या राजकारणात कोणत्या त्रुटी होत्या याचा विचार करावाच लागेल.

आपण वर म्हटलेच आहे की बहुमत निर्माण करील अशी चर्चा ही लोकशाही राजकारणाचा गाभा आहे. हे बहुमत कशासाठी घडवायचे? तर निर्णय घेण्यासाठी. आणीबाणी कशासाठी पुकारली? तर निर्णय घेता यावेत आणि अंमलात आणता यावेत म्हणून. यावरून हे उघड आहे की आणीबाणीपूर्वीच्या राजकारणातून निर्णय घेऊ शकेल असे बहुमत तयार होऊ शकत नव्हते; किंवा निर्णय घेतले तरी ते अंमलात आणून दाखविण्याची धडाडी त्या बहुमतांत नव्हती. तेव्हा आपण जर लोकशाही–राजकारण पुन्हा सुरू व्हावे असे म्हणत असू तर बहुमताने निर्णय घेतल्यानंतर तो अंमलात आणला जात असताना त्याला विरोध होणार नाही याची खबरदारी आपण कशी घेणार हे ठरविले पाहिजे.

सार्वजनिक चर्चेने बहुमत घडविले जाते, याला दोन प्रकारचा अर्थ आहे. पहिला अर्थ हा की, सर्वांचे हितसंबंध एक नाहीत. जर हितसंबंध एक असते, तर बहुमत आपोआपच तयार झाले असते. कम्युनिस्ट देशांतून लोकशाही राजकारण नाही, असा आरोप केल्यास त्याला उत्तर हेच दिले जाते की तेथील सर्व

व्यक्तींचे हितसंबंध सारखेच असल्याने निर्णयासाठी चर्चेची आवश्यकताच उरत नाही. आपण सार्वजनिक चर्चा अटळ मानतो तेव्हा येथे निरनिराळे हितसंबंध आहेत, हे आपण मानले पाहिजे.

लोकशाही राजकारण हितसंबंधांचे अस्तित्व अटळ मानते, इतकेच नव्हे तर कोणताही हितसंबंध समाजविरोधी नाही; प्रत्येक हितसंबंधाला योग्य ती मुरड घालून त्याचा समाजहिताशी मेळ घालता येईल असेही मानते. असे मानल्याखेरीज चर्चा संभवतच नाही. यावर कोणी विचारील की, भांडवलदार वर्गाचे हितसंबंध समाजविरोधी आहेत, असे मानणाऱ्या डाव्या पक्षांना लोकशाही राजकारणात स्थान नाही की काय ? किंवा सरकारी कारखानदारी तत्त्वतःच समाजविरोधी आहे, असे मानणाऱ्या उजव्या पक्षांनी लोकशाही राजकारण करू नये काय? याला उत्तर असे की, भांडवलदारांना विरोध अगर सरकारीकरणाला विरोध हे त्या त्या पक्षांचे तात्त्विक हितसंबंध आहेत. सर्व हितसंबंधाना राजकारणात स्थान आहे. फक्त हितसंबंधी लोकांनी आपले हितसंबंध समाजातील अधिकाधिक लोकांना रुचतील, अशा पद्धतीने मांडले पाहिजेत.

गेल्या दहा वर्षांत लोकशाही राजकारणातील या मूलभूत तत्त्वाकडे दुर्लक्ष करून काही आर्थिक तत्त्वांना अधिक महत्त्व देणाऱ्या व्यक्ती राजकारणात दुर्दैवाने पुढे आल्या. त्यामुळे निष्कारण कटुता निर्माण होऊन लोकशाही राजकारणाचे सूत्र तुटले. याचे एक उदाहरण आठवते. मोनॉपली अँड रिस्ट्रिक्टेड ट्रेड प्रॅक्टिसेस बिलाच्या प्रवर समितीवर श्रीयुत चंद्रशेखर हे एक खासदार होते. या समितीसमोर श्री. पालखीवाला यांची साक्ष झाली. त्या वेळी श्री. पालखीवाला यांनी टेल्कोचे उदाहरण घेऊन सांगितले की, इतर कोणत्याही कारखान्यांपेक्षा या कारखान्यात तयार होणाऱ्या ट्रक्स उच्च दर्जाच्या आणि कमी किंमतीच्या असतात. तेव्हा अशा कारखान्यावर प्रस्तुत कायद्याचा प्रतिकूल परिणाम होणार नाही, अशी खबरदारी घेतली पाहिजे. येथे हे उघड आहे की, श्री. पालखीवाला आपल्या हितसंबंधांना सार्वजनिक दृष्टचा स्वीकार्ह असे रूप देत होते. यावर श्री. चंद्रशेखर यांनी उत्तर दिले की, मला कमी दर्जाचा आणि महाग माल मिळाला तरी चालेल, पण मी एका कारखान्याची अमर्याद वाढ होऊ देणार नाही. या ठिकाणी संवाद तुटला. असा संवाद तुटणे लोकशाही राजकारणाला बाधक ठरते.

राजकारणाच्या व्यासपीठावर आपल्याला पुरेसा वाव मिळत नाही आणि संवाद चालू ठेवण्यापेक्षा तो मोडण्याकडेच प्रवृत्ती असलेली माणसे वाढत आहेत, असे झाल्यावर अल्पमतधारकांनीही सर्व प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी न्यायालयांकडे धाव घेण्यास सुरुवात केली. संस्थानिकांच्या तनख्याचा प्रश्न किंवा बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रश्न हे वास्तविक राजकीय प्रश्न होते. पण या दोन्ही प्रश्नांबाबत अल्पमताची खात्री पटली नाही व केवळ पूर्वघटित बहुमताच्या जोरावर निर्णय घेतले गेले, अशी त्यांची समजूत झाली. न्यायालये व विधिमंडळे यांच्यातील तथाकथित संघर्षाचे मूळ राजकारण पुरेसे समावेशक व सौम्य उरले नाही, यात आहे.

लोकशाही राजकारण व्यवस्थित चालवायाचे असेल, म्हणजेच अधिकाधिक हितसंबंधांचा मेळ बसवायाचा असेल तर चर्चा मोकळेपणी व्हावयास हवी. याचाच अर्थ असा की, बहुमताच्या निर्णयाच्या कक्षेत येणार नाहीत, अशी व्यक्तीच्या जीवनातील काही अंगे असली पाहिजेत. यालाच मूलभूत अधिकार असे म्हणतात. उदाहरणार्थ, अमुक एक व्यक्ती कोणता धर्म मानते, याची सार्वजनिक चर्चा होऊ शकते, पण तिने तो धर्म मानावा की नाही, याविषयी बहुमताने निर्णय घेतला जाऊ शकत नाही. पण आपण पाहिलेच आहे की, कोणताही प्रश्न लोकशाही राजकारणाला कायमचा अस्पृश्य आहे असे नाही. एकाच वेळी राजकारण सर्व प्रश्न हाताळू शकत नाही किंवा एकाच वेळी सर्व प्रश्नांचा विचार राजकारण करू लागले तर त्याचे लोकशाही स्वरूप नाहीसे होते, इतकाच याचा अर्थ आहे. म्हणूनच कोणतेच अधिकार सर्व काळ सार्वजनिक निर्णयाच्या कक्षेबाहेर आहेत, असे म्हणता येणार नाही. पण प्रत्येक वेळी व्यक्तीला काही तरी मूलभूत अधिकार आहेत, असा विश्वास वाटावयास हवा.

स्वातंत्र्य-लढ्यात ज्यांनी नेतृत्व मिळविले असे लोक संपून नवीन लोक राजकारणात उतरू लागल्यावर प्रसिद्धी मिळविण्यासाठी किंवा स्पर्धाशून्य क्षेत्र मिळविण्यासाठी आजपर्यंत राजकारणापासून अलिप्त असलेले प्रश्न आणि गट राजकारणात खेचले जाऊ लागले. आपल्या प्रश्नावर जनमत जागृत व्हावे आणि आपल्या मनासारखे निर्णय व्हावेत यासाठी प्रसिद्धीचे अधिकाधिक भडक मार्ग अवलंबिण्यात सुरुवात झाली. चर्चा बाजूस राहून मोर्चे, सत्याग्रह, उपोषण हेच लक्ष वेधून घेण्याचे मार्ग आहेत अशी समजूत झाली. शासन देखील असे काही झाल्याखेरीज प्रश्न लक्ष देण्याजोगा आहे असे मानेना. परिणामतः राजकारण सर्वव्यापी आणि तीव्रतर होत गेले.

गल्या दहा वर्षांतली कितीतरी उदाहरण सहज डोळ्यांसमोर येतात. बिर्लाभवनाचे राष्ट्रीयीकरण व्हावे म्हणून शशीभूषण यांनी उपोषण केले; वानखेडे स्टेडियमचे बांधकाम थांबावे म्हणून मी आडवा पडीन, असे मोहन धारिया यांनी सांगितले होते; कोर्टात कामगारांविरुद्ध निकाल लागू नयेत म्हणून घेराव घालण्यात यावा असा सल्ला मान्यवर पक्षांचे अध्यक्ष देत होते. उच्चस्तरीय नेत्यांनी अशी अप्रौढ विधाने केल्यावर गल्लीबोळांतील अश्राप युवकनेते बारसे कार्यालयात साजरे होत आहे म्हणून मोर्चे काढू लागले तर नवल नाही.

कदाचित वर दिलेल्या प्रत्येक कृतीचे त्या त्या संदर्भात समर्थन करणे शक्यही असेल. परंतु या प्रत्येक गोष्टीचा परिणाम सार्वजनिक जीवनात अधिक कटुता निर्माण होण्यात आणि राजकारण सर्वव्यापी बनण्यात होतो, हे स्पष्ट आहे. अतिव्यापक राजकारण हे लोकशाही-राजकारण राहात नाही, हे आपण वर पाहिलेच आहे.

सार्वजनिक चर्चेतून निर्माण झालेल्या बहुमताने एक निर्णय घेतल्यानंतर तो मान्य नसलेल्या अल्पमतातील लोकांना आपल्या बाजूकडे बहुमत वळवून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे, त्या दृष्टीने कोणताच निर्णय अपरिवर्तनीय नसतो. परंतु घेतलेल्या निर्णयाची शासकीय अंमलबजावणी थांबविण्याचा अधिकार अल्पमतधारकांना आहे, असा त्याचा अर्थ नाही. म्हणूनच गव्हाच्या एकाधिकार खरेदीचा निर्णय घेतल्यानंतर शेतकऱ्यांनी गव्हाची लेव्ही घालू नये, असा प्रचार करणे हा गुन्हाच मानला पाहिजे.

घटना-दुरुस्ती विषयी चर्चा अजून चालू आहे. आपली घटना घटना समितीने मंजूर केली, तेव्हा श्री. राजेंद्रप्रसाद यांनी केलेल्या भाषणाची आठवण ठेवली पाहिजे. त्यावेळी श्री. राजेंद्रप्रसाद म्हणाले होते की, घटना कितीही चांगली असली तरी ती राबविणाऱ्यांच्या हातात तिचे प्राण आहेत. लोकशाही-राजकारण हा लोकशाही घटनेचा प्राण आहे. हे राजकारण त्याची सर्व पथ्ये पाळून आपण करणार की नाही हा खरा प्रश्न आहे. अशा प्रकारचे राजकारण गेल्या दहा वर्षांत आपण विसरून गेलो होतो. त्याचा परिणाम आणीबाणीची घोषणा होण्यात झाला. लोकशाही-राजकारणाचा धडा नव्याने गिरविण्याची कुवत आपल्यात आहे की नाही, याचा प्रामाणिक विचार आपण केला पाहिजे. □

# प्रगती सहजीवन आणि बौद्धिक स्वातंत्र्य

## आंद्रे साखॅराव

अनुवाद : द. कृ. सुखठणकर

साखॅराव हा रशियातील टीकाकार, विचारवंत म्हणून सोल्झेनित्सिनच्या तोडीचा. गेल्या वर्षी त्याला शांततेचे नोबेल पारितोषिक मिळाले. साखॅरावच्या 'Progress, Co-existence & Intellectual Freedom (१९६८) या जाहीरनाम्याची ही सारांशरूपाने करून दिलेली ओळख समाज प्रबोधन पत्रिकेच्या नोव्हेंबर–डिसेंबर १९७६ अंकावरून साभार पुनर्मुद्रित केलेली आहे.

आज मानवसमाजात जी फूट पडलेली आहे तिच्यामुळे तो समूळ नष्ट होण्याचा धोका निर्माण झालेला आहे. जागतिक अणुयुद्ध, प्रचंड दुष्काळ, माणसाला निर्बुद्ध बनवणारे सामुदायिक 'संस्कृतिकरण', नोकरशाहीचा हटवादीपणा, कोटघवधी लोकांना कावेबाज आणि क्रूर अशा हुकूमशहांच्या सत्तेखाली आणणाऱ्या बाजारगप्पांचा प्रचार आणि मानवसमाज नष्ट करू शकणारे पृथ्वीच्या वातावरणात होणारे जलद बदल ही सर्व संकटे आज माणसाला भेडसावीत आहेत. या परिस्थितीत समाजात आणखी फूट पाडणे वा निरनिराळ्या तत्त्वप्रणाली व वेगवेगळ्या गटांतील राष्ट्रे ह्यांच्यात सामंजस्य कधीच नांदणार नाही असा प्रचार करणे हा मूर्खपणा व गुन्हा आहे. मानवी संस्कृती वाचवण्याचा आज एकच उपाय आहे : बौद्धिक स्वातंत्र्याचा आणि समाजवादाच्या तत्त्वांचा आधार घेऊन आणि हटवादी सत्ताधारी वर्गांच्या छुप्या हितसंबंधियांकडून येणारा दबाव बाजूला सारून जागतिक सहकार्य निर्माण करणे. अर्थात एकांतिक, हटवादी, माथेफिरू अशी तत्त्वप्रणाली कोणतीच तडजोड, विचार-विनिमय स्वीकारू शकत नसल्याने त्यांच्याशी हे सहकार्य अशक्यच आहे. हुकूमशहाचा, लष्करशाह्या, वंशवाद आणि माओवाद ह्या विचारप्रणाली सहकार्याला कधीच तयार होणार नाहीत.

जगात आज लाखो लोक दारिद्र्याविरुद्ध झगडत आहेत. जुलूम, हटवादीपणा आणि दादागिरी यांचा त्यांना तिटकारा आहे. वंशवाद, हुकूमशाही, स्टॅलिनवाद आणि माओवाद हे त्यांना रुचत नाहीत. सामाजिक न्याय व बौद्धिक स्वातंत्र्य यांचा पाठपुरावा करून मानवतेच्या आजपर्यंतच्या साठवलेल्या अनुभवांचा उपयोग करून प्रगती साधणे हे त्यांचे ध्येय आहे.

बौद्धिक स्वातंत्र्य हे मानवी समाजाला अत्यावश्यक आहे. माहिती जमवणे व तिचा प्रसार करणे, निर्भय व मोकळेपणाने चर्चा करण्याचे स्वातंत्र्य आणि पूर्वग्रह व अधिकारशाही यांच्या दबावापासून मुक्त असे स्वातंत्र्य यांची मानवी समाजाला आज नितांत गरज आहे.

ही स्वातंत्र्ये असली तरच माणूस ढोंगी व क्रूर अशा सत्ताधाऱ्यांनी पसरवलेल्या खोट्यानाट्या प्रचारापासून दूर राहून हुकूमशाहीच्या तावडीत सापडणार नाही. राजकारण, अर्थकारण व संस्कृती यांच्याबाबतीत निकोप शास्त्रीय दृष्टिकोण, विचारस्वातंत्र्याच्या वातावरणातच अस्तित्वात येऊ शकतो. पण आज विचारस्वातंत्र्यावरच गदा येऊ पाहात आहे. भावड्या जनसमुदायाला भुरळ पाडणारी विचारसरणी; भ्याड, स्वार्थी व क्षुद्र तत्त्वज्ञान, कर्मठ हटवादी अशा मूठभर नोकरशाहीच्या हातात असलेली सेन्सॉरशिप यापासून विचार-स्वातंत्र्याला धोका आहे आणि म्हणूनच प्रामाणिक विचारवंताने डोळ्यात तेल घालून विचारस्वातंत्र्याचे रक्षण केले पाहिजे. अर्थात हे कार्य फक्त बुद्धिवाद्यांचेच नसून समाजातील सर्व थरांचे, विशेषतः संघटित आणि कार्यप्रवण अशा कामगारवर्गाचे आहे. युद्ध, दुष्काळ, विभूतिपूजा व नोकरशाही ही मानवजातीला भेडसावणारी संकटे आहेत. कामगारवर्ग व बुद्धिवादी यांनी आपले हितसंबंध एकच आहेत हे ओळखणे ही आपल्या युगातील एक महत्त्वाची गरज होय. रशिया, पोलंड आणि इतर समाजवादी देशांतून बुद्धिमंतांनी कामगार-वर्गाच्या हितासाठी झटले पाहिजे, अशी जी मागणी केली जाते तिला काहीच अर्थ नाही. म्हणजे बुद्धिमंतांनी पक्षाची किंवा विशेषतः

पक्षाच्या मध्यवर्ती यंत्रणेची आणि त्याच्या अधिकाऱ्यांची ताबेदारी पत्करावी, असाच या मागणीचा खरा अर्थ. हे अधिकारी स्वतःच्या वर्गाचे हितसंबंध सोडून कामगारवर्गाचे हितसंबंधाचे रक्षण करत असतील, याची काय शाश्वती ?

## धोके

अणुशस्त्रांनी मानवजातीला धोका निर्माण केला आहे. आजचा अणुबाँब हा सर्वसाधारण ३ मेगॅटन शक्तीचा असतो. याचाच अर्थ तो हिरोशिमावर टाकलेल्या बाँबच्या १५० पट जास्त प्रदेशात पसरू शकतो. एखाद्या शहरावर हा बाँब टाकला तर शंभर चौरस किलोमीटर एवढे क्षेत्र पूर्णपणे नष्ट होऊ शकते. एका अणुबाँबच्या स्फोटातून १० लक्ष लोक मृत्युमुखी पडतील.

जगात आज प्लुटोनियमचे उत्पादन हजारो टनांवर गेलेले आहे. याच्यातील निम्मे उत्पादन अणुबाँबसाठी वापरले जाते असे मानले व प्रत्येक अणुबाँबला काही किलोग्रॅमच प्लुटोनियम लागते हे लक्षात घेतले तर मानवजातीचा पुरा संहार करावयास जेवढे आवश्यक आहे त्याहून कितीतरी पटीने जास्त अणुबाँब निर्माण झालेले आहेत हे पटेल. अणुबाँबच्या हल्ल्यापासून संरक्षण करणे जवळ जवळ अशक्यच आहे. संरक्षण क्षेत्रात आतापर्यंत अनेक प्रयोग केले गेले असले तरी अणुबाँबच्या विरुद्ध संरक्षणाची फारशी आशा आहे असे म्हणता येत नाही. सुदैवाने रशिया आणि अमेरिका यांची तांत्रिक शक्ती जवळ जवळ सारखीच असल्याने कोणताही एक पक्ष स्वतःचे अस्तित्व धोक्यात टाकल्याशिवाय दुसऱ्यावर हल्ला चढवू शकणार नाही.

माझ्या मते आंतरराष्ट्रीय संबंधात काही मूलभूत बदल केले गेले पाहिजेत. आंतरराष्ट्रीय तेढ वाढू नये ह्या मुख्य हेतूने काही निश्चित ध्येय पुढे ठेवून स्थानिक प्रश्न सोडवले पाहिजेत. आंतरराष्ट्रीय तेढ वाढून प्रतिगामी शक्ती बळकट होणार नाही, या हेतूने सर्व प्रश्न हाताळले पाहिजेत. आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडवताना सर्व बाजूचा निर्भयपणे विचार करून निश्चित ध्येय पुढे ठेवून अंतिम ध्येयाना भरपूर प्रसिद्धी दिली पाहिजे.

## आंतरराष्ट्रीय तणाव

जगातील दोन्ही प्रमुख राष्ट्रानी आपली आंतरराष्ट्रीय राजनीती काही ठराविक तत्त्वांवर आधारली पाहिजे. आमच्या मते सुरुवातीला तरी ही तत्त्वे अशी असावीत–

जगातील सर्व लोकांना स्वयंनिर्णयाचा व मतस्वातंत्र्याचा हक्क असावा. जगातील सर्व सरकारांना 'मानवी हक्कांची घोषणा' मान्य करणे भाग पाडले पाहिजे. मानवी हक्कांच्या रक्षणासाठी संयुक्त राष्ट्रांच्या सैनिकी शक्तीचा आणि आर्थिक दबावाचा वापर करण्यास हरकत नसावी.

क्रांती व प्रतिक्रांती, सैन्याच्या किंवा आर्थिक दबावाच्या मदतीने, एका देशातून दुसऱ्या देशात निर्यात करणे हे बेकायदेशीर मानले जावे आणि तो एक आक्रमणाचाच प्रकार समजावा.

आपले अंतर्गत व आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडवण्यासाठी आणि जगातील तणाव वाढू नयेत व प्रतिगामी शक्तीनी जोर धरू नये म्हणून जगातील सर्व राष्ट्रांत आर्थिक, सांस्कृतिक व इतर क्षेत्रात सहकार्य नांदले पाहिजे. स्थानिक प्रश्नांचा उपयोग स्वतःच्या हितसंबंधांचे क्षेत्र वाढवण्यासाठी आणि प्रतिपक्षाला अडचणीत टाकण्यासाठी कोणीही करू नये. जगात ठिकठिकाणी चाललेल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यात व क्रांत्यात वर सांगितलेल्या तत्त्वांमुळे अडचण येऊ नये. उलट, प्रतिक्रांती, वंशवाद, लष्करशाही यांच्याविरुद्ध निर्णायक अशी कृती झाली पाहिजे. कारण शस्त्रबलाशिवाय त्यांचा बिमोड करणे शक्यच नसते.

## भूक आणि वाढती लोकसंख्या

दारिद्र्यात खितपत असलेल्या अर्ध्या भागावर आज भुकेचे संकट वाढत असून तज्ज्ञ लोक त्याकडे लक्ष देत आहेत. जगातील लोकसंख्या गेल्या ३० वर्षांत ५० टक्क्यांनी आणि अन्नउत्पादन ७० टक्क्यांनी वाढलेले आहे. अर्थात या अन्नधान्य उत्पादनवाढीचा गरीब देशांना फारच थोडा फायदा मिळालेला आहे. तांत्रिक व आर्थिक मागासलेपणा, योग्य अधिकाऱ्यांचा अभाव, वाढते जननप्रमाण इत्यादींमुळे भारत, इंडोनेशिया, लॅटिन अमेरिकेतील अनेक राष्ट्रे, इत्यादी भागांत अन्नपरिस्थिती बिघडतच आहे आणि येत्या काही वर्षांत तरी ती फारच भयंकर होण्याची शक्यता आहे.

खते आणि पाणी यांचा जादा पुरवठा, शेतीमध्ये सुधारलेल्या तंत्रांचा उपयोग, समुद्रापासून मिळणाऱ्या अन्नाचा अधिक वापर आणि रासायनिक अन्न तयार करण्याचे प्रयत्न हेच मार्ग अन्नटंचाईच्या बाबतीत उपयोगी ठरू शकतील. १९७५ ते १९८० या कालखंडात जगात भयंकर अन्नटंचाईची सुरुवात होईल असे सांगितले जाते. गरीब राष्ट्रांच्या बाबतीत वरील सर्व उपाय त्याआधीच योजणे कितपत शक्य आहे हा प्रश्नच आहे.

हे अन्नटंचाईचे संकट ज्यावेळी येईल तेव्हा सबंध मानवजातच धोक्यात येईल. जगातील प्रत्येक राष्ट्राला आणि प्रत्येक व्यक्तीला याची फळे भोगावी लागतील. युद्ध आणि द्वेष यांचे सर्वत्र थैमान सुरू होईल. जगातील सर्वांचेच जीवनमान खाली येईल.

लोकसंख्या ज्यांनी वाढवली तेच तिच्या परिणामाला जबाबदार आहेत असे म्हणणारे काही वाचाळ लोक निघतील. कुटुंबनियोजन खात्रीने महत्त्वाचे आहे आणि भारतासारख्या देशात त्या दृष्टीने योग्य पावले टाकली जात आहेत. परंतु आर्थिक व सामाजिक मागासलेपणा, मोठमोठी कुटुंबे असण्याची परंपरा, इत्यादींमुळे कुटुंबनियोजनाचे कार्य व्हावे तितके यशस्वी होत नाही. मागासलेल्या देशांना कुटुंबनियोजन करण्याची सक्ती करणे फारसे फायदेशीर नाही. त्या देशांना आर्थिक व तांत्रिक मदत करणे हेच महत्त्वाचे आहे. देशादेशांतील भांडणे मिटल्याशिवाय ही मदत जितक्या मोठ्या प्रमाणावर होणे जरूर आहे तितके होणे शक्य नाही. आज अमेरिकेतील गोरे लोक तेथील लोकसंख्येच्या १० टक्के असलेल्या काळ्या लोकांसाठी लहानसा त्याग करावयास तयार नाहीत. त्या अमेरिकन नागरिकांचे हृदयपरिवर्तन करून त्यांच्यात जगातील अब्जावधी मागासलेल्या लोकांची परिस्थिती सुधारण्यासाठी त्याग करायची प्रेरणा निर्माण केली पाहिजे. याचा अमेरिकनांच्या आर्थिक प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होईल. पृथ्वीवरील मानवी समाज व त्यांचो

संस्कृती टिकून राहावी ह्या भव्य ध्येयाने अमेरिकन जनता या त्यागाला तयार झाली पाहिजे. सोव्हिएट युनियन आणि इतर पुढारलेल्या देशांतील जनतेनेही असेच विचारपरिवर्तन होऊन तिने आपापल्या सरकारांना वरील गोष्टींसाठी प्रवृत्त केले पाहिजे. प्रस्तुत लेखकाच्या मते सर्व पुढारलेल्या राष्ट्रांवर १५ वर्षांसाठी त्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या २० टक्के एवढा कर बसविला पाहिजे आणि त्यातून मागास देशांना मदत केली पाहिजे. या करामुळे शस्त्रास्त्रांवर होणाऱ्या खर्चात आपोआप कपात होईल. मागासलेल्या देशांना या मदतीमुळे आपली परिस्थिती सुधारता येईल. आर्थिक परिस्थिती सुधारली की या मागासलेल्या देशांतील जननप्रमाण आपोआप कमी होईल व निर्बीजीकरणाचा अवलंब करावा लागणार नाही.

'वसुधैव कुटुंबकम्' ही वृत्ती स्वीकारल्यानेच मानवजात शांततेने प्रगती करू शकेल. सुधारलेल्या देशांत कुटुंबवाढ आणि मागासलेल्या देशांत कुटुंबनियोजन असे परस्पर विरोधी प्रचार करणे धोक्याचे आहे. याच्यातून फक्त कडवटपणा निर्माण होऊ शकतो.

## प्रदूषण

नवीन उद्योगधंदे, जंगलतोड, विषारी द्रव्यांचा वापर या सर्वांमुळे पृथ्वीचे रूप सतत बदलत आहे. आज आपण कोणताच विचार न करता हवा आणि पाणी यांच्यात अत्यंत घातक असे द्रव्य मिसळून टाकत आहोत. प्रदूषणाच्या कोणत्या थराला मानवीजीवन नष्ट होईल हेही आपण शोधून काढलेले नाही. शेतकामात अशी काही विषारी द्रव्ये आपण वापरत आहोत की, ती माणसाच्या शरीरात अन्नामार्फत शिरून अनेक व्याधी निर्माण करत असतात. प्रदूषणाचा प्रश्न हा आर्थिक आणि सामाजिक प्रश्नांशी निगडीत असून तो स्थानिक किंवा राष्ट्रीय पातळीवर सोडवणे शक्य नाही. जगातील सर्व मतभेद मिटल्याशिवाय हा प्रश्न सोडवणे कठीण आहे. प्रदूषणामुळे मानवी समाज नष्ट होऊ शकेल असे म्हणणे आज तरी अतिशयोक्तीचे असले तरी आज प्रदूषणात वार्षिक १० टक्क्यांनी वाढ होते असे आपण मानले तरी ही वाढ १०० वर्षांत २० हजार पटीने होईल, हे आपण विसरता कामा नये.

## हुकूमशाही

वंश, राष्ट्र, सैनिकीकरण यांच्या नावाखाली निर्माण होणारी हुकूमशाही हा एक आधुनिक जगाला असलेला मोठा धोका आहे. स्टॅलिन, हिटलर, माओत्सेतुंग, आणि स्पेन, पोर्तुगाल, दक्षिण आफ्रिका इत्यादी देशांत असलेले छोटे-मोठे हुकूमशहा आपल्याला परिचित आहेत. स्वार्थ आणि गटबाजी, अमर्याद सत्तेची हाव, वैचारिक स्वातंत्र्याला मूठमाती आणि अज्ञ जनतेला पटेल अशा बाजारगप्पांचा प्रचार यांच्यावर या हुकूमशाह्या उभारल्या गेलेल्या आहेत. अनेक जर्मन शहरांच्या चौकांतून होणाऱ्या ग्रंथांच्या होळ्या, फ्युररची भयंकर भाषणे, आणि जनसमूहालाच नष्ट करण्याच्या फासिस्टांच्या क्रूर योजना यांचा जगाला कधीही विसर पडणार नाही.

हिटलर व त्याचे साथीदार यांनी अनंत मार्गांनी मानवी जीवनाची जी विटंबना व हत्या केली तिचा आपल्याला कधीही विसर पडणार नाही. हिटलरला जन्माला घालणारे जर्मन व आंतरराष्ट्रीय भांडवलशाही आणि जर्मनीतील सोशालिस्ट व कम्युनिस्ट यांना आपण विसरता कामा नये. जर्मनीने हिटलरशाही १२ वर्षे सहन केली. स्टॅलिनशाही रशियात दुपटीने टिकली. या दोहोंत काही साम्य व काही फरक आहेत. हिटलर हा उघड उघड क्रौर्याचा प्रसार करत होता तर स्टॅलिनने प्रगती, समाजवाद, विज्ञान वगैरेंची ढोंगे चालविली. यामुळे कामगारवर्गाला फसवण्यात आणि बुद्धिवाद्यांच्या डोळ्यांत धूळ फेकण्यात तो यशस्वी झाला. जुलूम-जबरदस्ती, खून, गुप्तपोलिसांचा ससेमिरा यांच्या मदतीने स्टॅलिनने आपली पकड बळकट केली. स्टॅलिनशाहीच्या काळात १ ते १॥ कोटी लोक गुप्तपोलिसांनी ठार मारले असावेत. छळ, उपासमार, कडाक्याची थंडी, प्रचंड श्रम, यांनी स्टॅलिनच्या राज्यांत थैमानच घातले होते. अत्यंत भयंकर स्वरूपाची गुलामगिरी सोव्हिएट जनतेने सहन केली. उलटपक्षी भांडवलशाही जर समाजवादी व प्रागतिक शक्तीपासून मुक्त झाली तर मानवी आणि आंतरराष्ट्रीय जीवनात किती भयंकर परिस्थिती निर्माण करू शकते याची प्रस्तुत लेखकाला पूर्ण जाणीव आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांतील प्रागतिक शक्तींना या गोष्टीची प्रस्तुत लेखकाहून जास्त जाणीव असून त्या तिच्याशी जास्त समर्थपणे मुकाबला करतात. म्हणूनच प्रस्तुत लेखक आपल्या देशात चाललेल्या ज्या घटना लोकशाही, सामाजिक प्रगती, वैचारिक स्वातंत्र्य यास मारक आहेत, त्यावरच जास्त भर देऊ इच्छितो.

आपल्या देशात आज स्टॅलिनशाही झटकून टाकण्याचे काम सुरू आहे. चेकॉव्हने म्हटल्याप्रमाणे, 'आम्ही आमच्यातील गुलाम थेंबाथेंबाने गाळून टाकत आहोत.' आमच्यात हळूहळू निर्भयता येत असून आम्ही आमची मते व्यक्त करावयास शिकत आहोत.

ख्रुश्चेव्हने सोविएट कम्युनिस्ट पक्षाच्या २० व्या कॉंग्रेससमोर केलेल्या भाषणापासून या खडतर आणि नागमोडया प्रवासाला सुरुवात झाली. ह्या भाषणाने आणि त्या संदर्भात घडलेल्या अनेक सत्कृत्यांमुळे (लाखो राजकीय कैद्यांची मुक्तता आणि त्यांचे पुनर्वसन, शांततापूर्ण सहजीवनाच्या तत्त्वाचा पुनर्विचार आणि लोकशाहीची सुरुवात) आपल्याला ख्रुश्चेव्हच्या ऐतिहासिक भूमिकेबद्दल आदर व्यक्त केला पाहिजे. स्टॅलिनशाही पूर्ण नष्ट करण्यात आपल्याला यश आलेले नसून अजून पुष्कळ मार्ग आक्रमावयाचा आहे.

१९३६–३९ या दरम्यान पक्षाच्या अर्ध्याहून जास्त म्हणजे १२ लक्ष सभासदांना अटक करण्यात आली. त्यांच्यातील फक्त ५० हजार लोकच सुटू शकले. ६ लाख लोकांना गोळ्या घालून ठार मारण्यात आले व राहिलेले कारागृहांतील हालअपेष्टांनी मरण पावले. जखमांवर मीठ चोळू नका असे आम्हाला पुष्कळ वेळा सांगितले जाते. ज्यांना कधी जखमाच झाल्या नाहीत असेच लोक हे सांगू शकतील. भूतकाळाच्या सखोल अशा विश्लेषणानेच आपण आपल्या झेंड्यावरील रक्त व घाण धुऊन काढू शकू. हल्लीच्या काळात समाजवादाच्या मार्गावर असलेला आणखी एक मोठा देश दादागिरी, हिंसा, क्रौर्य आणि नीचपणा यांच्या तावडीत सापडलेला आहे. (मी चीनबद्दल बोलत आहे.) चेअरमन माओच्या वैचारिक शत्रूंना फासावर चढवताना रेडगार्ड आनंदाने नाचत होते, ही चिनी रेडिओवरची बातमी वाचून अंगावर काटा उभा राहतो. स्टॅलिन आणि हिटलर

यांच्या कारकीर्दीतील विभूतिपूजा वेडाच्या थराला गेलेली होती. पण या वेडेपणानेच कोटयवधी लोकांचा बुद्धिभ्रंश आणि लाखो नागरिकांची हत्या केलेली आहे.

### वैचारिक स्वातंत्र्यास धोका

वैचारिक स्वातंत्र्याला धोका असणे म्हणजे मानवी व्यक्तित्वाला, मानवी जीवनाच्या अर्थालाच धोका असणे होय. युद्ध, उपासमार, भीती यांनी मानवी व्यक्तित्व धोक्यात येते. पण अदृश्य असे आणखीही धोके अस्तित्वात आहेत. सेन्सॉरशिप आणि कोणताच धरबंध नसलेला प्रचार यामुळे सर्व जनतेचाच बुद्धिभ्रंश होऊ शकतो. आता शिक्षणाचा प्रश्न घेऊ. शिक्षण आणि त्यावर शासनाचे नियंत्रण या चांगल्या गोष्टी आहेत. पण प्रत्येक नाण्याला दुसरी बाजू असते. जर एखाद्या शासनाने विद्यार्थ्यांच्या वैचारिक वाढीला महत्त्व न देता आपल्याच विचाराचा प्रचार करावयाचे ठरवले तर व्यक्तिस्वातंत्र्याला आपोआप धोका निर्माण होतो. प्रचार-जाहिरातबाजी यांचे आज एक नवीन तंत्रच बनलेले आहे. संततिनियमन आणि विचार-नियमन यांसाठी औषधाचा वापर करण्याचे तंत्र आतापर्यंत निर्माण झालेलेच आहे.

स्वैंपाक्यालासुद्धा राज्य चालवायला आले पाहिजे, असे लेनिन म्हणे. आज अनेक देशांचा राज्यकारभार काही मूठभर लोकांच्या हातात सापडलेला असून त्यांनी घेतलेल्या चुकीच्या निर्णयामुळे कोटयवधी लोकांचे जीवन संकटात येऊ शकते. वैचारिक स्वातंत्र्य असेल तरच जनता व बुद्धिजीवी वर्ग आपल्यावर राज्य करणाऱ्या गटाचे कार्य, हेतू आणि निर्णय यांची योग्य छाननी करू शकेल. सेन्सॉरशिप हे मानवी स्वातंत्र्याचा एक प्रमुख शत्रू आहे. सोल्झेनित्सिन इत्यादी महान सोव्हिएट लेखकांनी निर्बंद्ध सेन्सॉरमुळे सोव्हिएट वाङ्मयाची कशी धूळधाण केलेली आहे, हे दाखवून दिलेले आहे. मानवसमाजाच्या हितासाठी शासनाची पुनर्घटना करावयाची असल्यास बौद्धिक स्वातंत्र्यालाच महत्त्व द्यावे लागेल. याबाबतीत झेकोस्लोव्हाक लोकांनी जो धाडसी प्रयत्न केला त्याला समाजवाद आणि मानवी समाज यांच्या भवितव्यासाठी आपण पाठिंबा दिला पाहिजे.

### भविष्याची आशा

समाजवादाचे भवितव्य हे जनतेला किती आकर्षक वाटेल यावर अवलंबून आहे. समाजवाद आणि भांडवलशाही यांची तुलना करताना जनता काय लक्षात घेणार आहे? समाजवादातील नैतिक कल्पना आणि मजुरांचे माहात्म्य एका बाजूस, आणि भांडवलशाहीतील खाजगी मालमत्तेमागील स्वार्थ आणि भांडवलाचे मोठेपण दुसऱ्या बाजूला? की समाजवादातील बौद्धिक स्वातंत्र्यावरील मर्यादा आणि विभूतिपूजेवर आधारलेली फॅसिस्ट राजवट? उत्पादनशक्ती आणि जनतेचे जीवनमान वाढवणे याबाबतीत भांडवलशाही व समाजवाद यांच्यात फारसा फरक नाही, म्हणून मी ह्या तुलनेत नैतिक बाजूवर जोर देईन.

उत्पादनवाढीच्या मार्गात येणारे अनेक अडथळे दूर करण्याचे बहुतांशी काम भांडवलशाहीनेच केल्यामुळे समाजवादी राष्ट्रांचा मार्ग जास्त सोपा झाला, हे आपण विसरता कामा नये. अर्थात आपण जो कालखंड विचारात घेतो त्यात सोव्हिएट युनियनने एका भयंकर युद्धाला तोंड दिले याचीही आपण आठवण ठेवली पाहिजे. समाजवादात अंतर्गत नसलेले काही दुर्दैवी अपघात आपल्या देशात घडून आले यांचीही विस्मृती होता कामा नये. कोळसा आणि पोलाद ह्या आज फारशा महत्त्वाच्या नसलेल्या उद्योगधंद्यांत आपण जरी अमेरिकेच्या इतकी वाढ केलेली असली तरी आज अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या स्वयंचलित गणकयंत्रे, पेट्रोलियम रसायन आणि औद्योगिक संशोधन याबाबतीत आपण अमेरिकेहून अनेक योजने मागे आहोत. अमेरिकेने प्रचंड श्रम व प्रचंड खर्च करून जे अनेक शोध लावले त्यांचा फायदा आम्हाला आपोआप मिळाला. या सर्वांतून दोन निष्कर्ष निघू शकतात. (१) आपण समाजवादाचे चैतन्य जगापुढे सिद्ध केलेले आहे आणि समाजवाद जनतेसाठी, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक ह्या तिन्ही क्षेत्रांत दुसऱ्या कोणत्याही अर्थव्यवस्थेपेक्षा जास्त कार्य करू शकतो, हे दाखवलेले आहे. (२) भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादनवाढ शेवटी थांबते किंवा कामगारवर्गाचे दारिद्र्य शेवटी वाढत जाते, ह्या गोष्टी सिद्ध करणे कठीण आहे. भांडवलशाही राष्ट्राची आज जी सतत प्रगती होत आहे ती मार्क्सवाद्यांनी लक्षात घेतली पाहिजे आणि खरे म्हणजे हीच गोष्ट शांततामय सहजीवनाचा पाया होऊ शकतो. समाजवादी व भांडवलशाही राष्ट्रे सतत प्रगती करू शकतात आणि एकमेकांचे गुण आत्मसात करून सहकार्याने प्रगतीच्या मार्गावर चालू शकतात.

माझ्यावर मार्क्सवादाचा मार्ग सोडल्याचा आणि अप्रबुद्धपणाचा आरोप केला जाईल याची मला जाणीव आहे. पण अमेरिकेत व इतर भांडवलदारी देशांत समाजवादाची अनेक तत्त्वे स्वीकारली गेली आहेत व कामगारवर्गाची परिस्थिती सुधारत आहे, ही सत्य परिस्थिती आहे. खरी गोष्ट म्हणजे ह्या दोन्ही अर्थव्यवस्थांमध्ये सहकार्य व सहजीवन याशिवाय दुसरा मार्गच नाही. सोव्हिएट युनियनमध्ये उपभोग्य वस्तू नागरिकांना समप्रमाणात मिळतात आणि अमेरिकेमध्ये आर्थिक विषमता प्रचंड प्रमाणात आहे असे सांगितले जाते. या दोन्ही गोष्टी सत्याला धरून नाहीत. अमेरिकेत काही लोक कोटयधीश आहेत हे खरे, पण त्यांना नष्ट करण्यासाठी लागणारे क्रांतीचे मोल अमेरिकी जनतेच्या दृष्टीने फायद्यापेक्षा थोडेसे नुकसानीचेच होईल असे म्हणावयास हरकत नाही. सोव्हिएट युनियनमध्ये शहर व खेडे यांच्या नागरिकांत पुष्कळ विषमता आहे. नव्या व जुन्या उद्योगधंद्यांत अशीच असमानता आहे. रशियात जवळजवळ ४० टक्के जनता कठीण आर्थिक परिस्थितीत जगत असते तर अमेरिकेत २५ टक्के लोकसंख्या दारिद्र्यात जीवन कंठीत आहे. याउलट संचालक वर्गात असलेले रशियामधील ५ टक्के लोक अमेरिकेतील त्या वर्गात असलेल्या महाभागांइतकेच सुख उपभोगत असतात. भांडवलदारी देशांनी २० व्या शतकात जी प्रगती केली आहे, तिच्या मुळाशी समाजवादी देशांशी असलेली त्यांची स्पर्धा आणि तेथील श्रमजीवी वर्गाने आणलेला दबाव हीच कारणे आहेत. आणि म्हणूनच ह्या दोन्ही आर्थिक पद्धतीत समझोता झाला पाहिजे. समाजवादाने श्रमाला एक नैतिक मूल्य प्राप्त करून दिले हे आपण नाकारू शकत नाही. भांडवलदारी जगाने समाजवादी जगाला जन्म दिला. आता समाजवादी जगाने आपण जेथून निर्माण झालो ती भूमी नष्ट करता

कामा नये. तसे झाल्यास तो एक आत्महत्येचाच प्रकार होईल.

मी जेव्हा समझोता म्हणतो तेव्हा १९३९ मधील तत्त्वहीन जनताविरोधी असा सोव्हिएट–नाझी समझोता माझ्यासमोर नाही. माझा समझोता जागृत अशा लोकशाहीवर अधिष्ठित असेल. या समझोत्यात भांडवलशाही देशांतून फार मोठे सामाजिक बदल होतीलच, पण मालकीहक्काच्या बाबतीत महत्त्वपूर्ण सुधारणा घडून येईल. सरकारी आणि सहकारी मालकीच्या सीमा वाढतील. त्याचबरोबर समाजवादी देशांतून उत्पादनाच्या साधनांची सामुदायिक मालकी कायम राहील. प्रेसिडेंट रुझवेल्ट, प्रे. केनेडी यांसारखे पुढारी भांडवलदारी राष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील असे मला वाटते.

बर्ट्रांड रसेलने मॉस्को येथील शांतता परिषदेत बोलताना एकदा म्हटले होते की, प्रतिस्पर्ध्याचा विजय झाला तरी चालेल, पण अणुयुद्ध नको असे दोन्ही गटांचे पुढारी म्हणतील तेव्हाच जग अणुयुद्धापासून बचावले जाईल. माझ्या मते हळूहळू ह्या विचारप्रणालीचा जगातील बहुसंख्य जनता स्वीकार करील. त्यातच त्याचे हित आहे.

### कार्यक्रम

आता कार्यक्रमाच्या पद्धतीने ह्या जाहीरनाम्यात एक योजना मांडतो. त्यामध्ये चार टप्पे असतील. हे टप्पे एकमेकांत मिसळलेले असतील. कार्यक्रमसुद्धा अगदी स्थूल आणि प्राथमिक अशा स्वरूपात मांडीत आहे.

पहिला टप्पा १९६८–८० असा. ह्या काळात स्टॅलिन–माओ पुरस्कृत शक्ती एका बाजूस आणि वास्तवदर्शी, डावे लेनिनवादी कम्युनिस्ट आणि डावे पश्चिमी दुसऱ्या बाजूस, असा झगडा पक्षांतर्गत, देशाच्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठ्या जोमाने होईल. ह्या झगड्यात वास्तवदर्शी पक्षांचा विजय होईल.

दुसरा टप्पा १९७२–८५. ह्या टप्प्यात अमेरिका आणि इतर भांडवलशाही देशांत समाजवादी देशांच्या आणि अंतर्गत शक्तींच्या (कामगारवर्ग आणि बुद्धिजीवी) दबावाने डाव्या प्रवृत्तींचा विजय होईल आणि समाजवादाच्या दिशेने प्रगती होईल. बुद्धिजीवींचे महत्त्व वाढून वंशवाद आणि वठकरवाद यांवर हल्ला केला जाईल.

तिसरा टप्पा १९७२-९०. सोविएट रशिया आणि अमेरिका यांमधील दुरावा दूर होऊन हे देश गरीब देशांचे प्रश्न सोडवायला लागतील. अणुशक्ती वापरून गरीब देशांसाठी अतिभव्य खतांचे कारखाने उभे केले जातील आणि कालवे काढले जातील. समुद्रातील संपत्ती उपयोगात आणली जाईल. ह्या देशांचे औद्योगीकरण होईल. निःशस्त्रीकरण केले जाईल.

चौथ्या टप्प्यात (१९८०–२०००) समाजवादी संयोगीकरणामुळे (सोशॅलिस्ट कॉन्व्हर्जन्स) समाजरचनेतील विषमता कमी होईल, बौद्धिक स्वातंत्र्य, विज्ञान, आर्थिक विकास वाढेल. आणि जागतिक राज्याची उभारणी होईल. युरेनिअम आणि थोरिअमचा उपयोग करून आणि कदाचित ड्युटेरिअम आणि लिथिअमचा उपयोग करून अणुशक्ती वाढविली जाईल. अवकाश–संशोधनासाठी लाखो माणसांचा उपयोग होईल. वीज, वाहतूक, दळणवळण आणि सायबरनॅटिक्समध्ये क्रांती होऊन जाईल. विज्ञानशास्त्रातील प्रगतीमुळे जीवसृष्टीचे नियमन आणि मार्गदर्शन करता येईल. त्यावेळी वैज्ञानिक दूरदृष्टी आणि मानवी मूल्याबद्दल कदर यांची अतिशय जरूरी असेल. □


## प्रसिद्ध झाले !




**लेखक : पु. ल. इनामदार**

**मूल्य : वीस रुपये**

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**

# सोलकढी

## □ बेदीला जिंकावे लागले

गेल्या काही वर्षांत अधूनमधून भारताने काही कसोटी क्रिकेट सामने जिंकले. त्यामुळे भारतीयाच्या क्रिकेटी उत्साहाला बऱ्यापैकी उधाण चढले : भारतीय क्रिकेट संघाचे व्यवस्थापक, कोच, क्रिकेट नियामक मडळाचे कार्यवाह, निवडसमितीचे सभासद यांची नावे झळकठळकू लागली. कर्णधाराच्या



नावाचे तर हरहर महादेव झाले. त्यांतले मन्सूरअलिखान पतौडी आणि अजित लक्ष्मण वाडेकर निवृत्त होत्साते अंगठे चोखत बसले आहेत. सध्याचा कर्णधार आहे बिशनसिंग बेदी. त्याच्या डोक्यावर भलामोठा पटका असला तरी त्याचे खुद्द डोके पतौडी-वाडेकर-पेक्षा वेगळे चालत नाही. याचे खासे प्रत्यंतर न्यूझीलंडविरुद्ध मुंबईत झालेल्या पहिल्या कसोटी सामन्यात आले.

सामना भारताने जिंकला हो. बेदीने प्रभावी गोलंदाजीच नव्हे तर फलंदाजीसुद्धा केली. पण कर्णधाराने याच्यापलीकडे जे करायचे ते वानखेडे स्टेडियमवर सोपवून बेदी लस्सी प्यायला मोकळा झाला. आपण हरायचे नाही एवढे त्याने पक्के ठरवले होते. जिंकायची जबाबदारी पत्करायला त्याची तयारी नव्हती. आता हरायचे नाही अशा प्रतिज्ञेने खेळता खेळता चुकून भारतीय संघ जिंकला त्याला बेदीचाही नाइलाज झाला असावा. एरवी त्याने आपल्याकडून प्रयत्नांची अगदी शर्थ केली, हे कबूल केलेच पाहिजे

पहिल्या दिवशी सगळे साजुक आणि स्वादिष्ट चालले होते. पण धावांचा वेग वाढवायचा आदेश देणे बेदीच्या जीवावर आले. भारताच्या दुसऱ्या डावात तासादीड-तासाचा अवधी असा आला की, भारताची फलंदाजी चालली आहे की न्यूझीलंडची, असा संभ्रम माझ्यासारख्या प्रेक्षकांना पडला होता. गुंडाप्पा विश्वनाथ आणि ब्रिजेश पटेल जणू वेळ काढून सामना वाचवण्याची शिकस्त करत होते. तेव्हासुद्धा उगाच कशाला काही करा, असा विचार बेदीने केला असणार. शेवटी ब्रिजेश पटेलने घणी भरपाई करून पावणेतीनशे धावांचा बोजा न्यूझीलंड-वर टाकला. शेवटच्या दिवशी तितक्या धावा तीनशेतीस मिनिटात करायचे आव्हान न्यूझीलंडला देऊन आपल्या गोलंदाजांना अधिक वेळ ठेवणे बेदीला शक्य होते. पण न्यूझीलंडने करामत करून सामना जिंकण्या-पेक्षा आपल्या करामतीने तो अनिर्णीत ठेवणे भारताच्या झुंजार कर्णधाराला अधिक मांग्री-स्कर वाटले. म्हणून पाचव्या दिवशी तब्बल पस्तीस मिनिटे त्याने काढली. दोनशे-पंचाणव मिनिटांत तीनशेतीन धावा करा-यचे सावध आव्हान त्याने न्यूझीलंडला दिले. आपण हरणार तरी नाही अशी पुरी व्यवस्था केली, पण न्यूझीलंडनेच हरायचे ठरवल्या-मुळे बेदीला जिंकावे लागले. त्याने तरी काय आणि किती करायचे ?

सामना भारताने जिंकल्यामुळे लोक वीस कलमी उत्साहाने बेहोश झाले. बेदीच्या पटकेबाज दर्शनासाठी व्याकुळ झाले. मग बेदी आपल्या सहकाऱ्यांसमवेत बाहेर आला आणि त्याने प्रेक्षकाची मानवंदना स्वीकारली. जे त्याने केले नव्हते त्याचे श्रेय त्याला घ्यावे लागले. जे त्याने केले त्याचे श्रेय एखादा 'महाराष्ट्र टाईम्स'चा वि. वि. करमरकर किंवा 'माणूस'चा अनंतराव त्याला देऊ लागला तर बहुधा हात पटका बांधण्यात गुतल्यामुळे त्याला ते घेता येणार नाही. आता आम्ही ते त्याच्या पटक्यातच खोचून ठेवू हे वेगळे. □

## □ जिमी कार्टरचे 'वृद्ध' साहाय्यक

सध्या तुम्ही कधीही आमच्या घरी आलात तर तुम्हाला हवेतेवढे शेंगदाणे खायला मिळतील. शिवाय कोणत्याही भाजीत सध्या आम्ही शेंगदाणे घालतो; कोशिंबिरीत शेंग-दाण्याचे कूट घालतो; शेंगदाण्याचे लाडू

करून खातो; शेंगदाण्याची आमटी रोजच असते; आणि सुचतील तितके शेंगदाण्याचे नवेनवे पदार्थ करतच असतो. इतके शेंगदाणे आमच्याकडे आले कुठून असा प्रश्न तुम्हाला पडेल. कारण अमेरिकेचा नवा राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर आणि 'सोलकढी'चा जुना सदरकार अनंतराव यांची घट्टघनिष्ट पत्र-मैत्री आहे, हे तुम्हाला ठाऊक नसेल.

ही पत्रमैत्री अलीकडची नाही. खूप जुनी आहे. जिमी जॉर्जिया संस्थानचा गव्हर्नर होण्याआधीपासून आणि संजय गांधी युवक-नेते होण्याआधीपासून आणि साध्या अनंताचा 'सोलकढी'चा अनंतराव होण्याआधीपासूनची ही मैत्री आहे. जिमी जॉर्जियाचा गव्हर्नर झाला तेव्हा मी पत्राने त्याचे अभिनंदन केले; चार युक्तीच्या गोष्टी सांगितल्या; आणि प्रयत्न केल्यास गड्या तू राष्ट्राध्यक्ष-सुद्धा होशील, असे सुचवले. त्याने कसचे-कसचे म्हणणारे एक उत्तरपत्र पाठवले; पण मला असे निखालसपणे वाटते की माझ्या पत्राने राष्ट्राध्यक्षीय महत्त्वाकांक्षेचे बीज त्याच्या मनात खोलवर रुजले असणार. पुढे त्याने खरोखरच राष्ट्राध्यक्ष व्हायचे ठरवले. तेव्हा मी एक सविस्तर पत्र जिमीला लिहिले. म्हटले, बाबा रे, तुझ्या देशातली ही राष्ट्राध्यक्षाची निवडणूक फार बिकट असते हो; निक्सनसारखे अगडबंब कोसळतात; तेव्हा सावधान; पण घाबरायचे नाही; भल्या वृद्ध लोकांचा नुसता आशीर्वाद घेऊ नकोस, साहाय्य व सल्ला घे; गड्या तू विजयी होणार असे माझे आतले मन सांगून राहिले आहे; गो अहेड—अनंतराव इज बिहाइंड यू!

त्या निवडणुकीचे काय झाले हे सर्वांना ठाऊक आहे. सुंदर बायकांकडे आपण हावरट हव्यासाने पाहतो असे सांगणारा आमचा दोस्त जिमी कार्टर जिंकला. निकालानंतर त्याने पहिली कोणती गोष्ट केली असेल तर मला त्याच्या त्या शेंगदाण्यासारख्या अक्षरात पत्र लिहिले. पत्रात माझे आभार होते; व्हाइट हाऊसमध्ये चार दिवस विश्रांतीसाठी यायचे हार्दिक आमंत्रण होते; 'साप्ताहिक माणूस' चे कसे चालले आहे अशी पृच्छा होती; वीस कलमांतल्या सतराव्या कलमाबद्दल अधिक उद्बोधक माहिती कळवण्याची विनंती होती; आणि शेवटी तू सांगितल्याप्रमाणे वृद्ध लोकांचा नुसता आशीर्वाद न घेता साहाय्य व सल्ला घेतल्यामुळेच आपण यशस्वी झालो, असे म्हणून त्या साहाय्य-सल्लादात्यांची नावे आणि वये जिमीने दिली होती : हॅमिल्टन जॉर्डन (३२), जॅक वॅटसन ज्यू. (३७), जोडी पॉवेल (३३), स्टुअर्ट आयझेनस्टॅट (३३), ग्रेन स्क्नीडर्स (२९), झबिगन्यू ब्रेझेनिन्स्कि (४८).

जिमीने माझी फरसवी करून टाकली होती. हे म्हणे जिमीचे 'वृद्ध' साहाय्यक. अरे चोरा. मला वृद्ध म्हणजे कसे यथास्थित वृद्ध अभिप्रेत होते. भारतात सगळ्या मोठमोठ्या जागांवर विराजमान झालेले असतात, तसे. अस्सल. डोक्यात पावसाळे जपणारे. हातातल्या काठीने भूमी नमवणारे. कवळ्यांतून मौलिक विचारमौक्तिके सांडणारे. देशाला एकसारखे पुढेआणिपुढेआणिपुढे नेणारे. पण जिमीला धमकावणे मुष्किल होऊन बसले होते. कारण भारतीय दृष्टीने अगदी पोरटुल्या असणाऱ्या त्या वृद्धांनी निवडणूक चक्क जिंकली होती. उद्या ते व्हाइट हाऊसमध्ये जबाबदारीच्या जागा धरून जिमीचा राज्यकारभारसुद्धा चालवतील.

त्यामुळे पाहू या काय होते ते, असे म्हणून मी आपला तोंडात शेंगदाणे धरून गप्प बसलो. हे शेंगदाणे जिमीने त्या पत्रासोबत पाठवलेल्या त्याच्या शेतातल्या शेंगांचे. भले मोठे पोते भरून शेंगा पाठवल्या आहेत या आमच्या शेतकरी दोस्ताने. आमचे काही मित्र तर इंपोर्टेड शेंगदाणे आपल्या बदामासारखे लागतात असे म्हणतात. तुम्ही काही त्यांतले नाही. तेव्हा सध्या तुम्ही कधीही आमच्या घरी आलात तर तुम्हाला हवेतेवढे शेंगदाणे खायला मिळतील.

—अनंतराव


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

॥ मॅक्झिम गॉर्की ॥

। सुमती देवस्थळे ।

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ । पुणे ४११ ०३०

# थायलंड

## लोकशाहीच्या अपमृत्यूचे रक्तरंजित नाट्य

रविकिरण साने

### ६ ऑक्टोबर १९७६

बँकॉकच्या क्षितिजावर त्या दिवशी सूर्य उगवला तो एका भयंकर स्वप्नाची रक्तवर्णी प्रभा उजळीतच. विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांवरच शस्त्र धरले आणि एका अमानुष कत्तलीला प्रारंभ झाला. डाव्या व व उजव्या गटातील हजारो विद्यार्थ्यांच्यात हिंसक दंगल उसळली. लाथाबुक्क्या, हाणामारी, चेन, गज, दंडुके यांचा मुक्त वापर सुरू झाला. चौकशीविना कत्तल आणि परस्परांवर गोळीबार यांना ऊत आला. या भीषण रणकंदनातून स्वतःला वाचवण्यासाठी शेकडो मुलामुलींनी खळाळत्या नदीत उड्या टाकल्या. हे सारे क्रौर्य कमी झाले म्हणूनच की काय, अखेर अनेक जखमी व मृत शरीरांना पेट्रोल ओतून भडाग्नी देण्यात आला. सूर्य माध्यान्हीला येईपर्यंत या ज्वाला एवढ्या उंच पोहोचल्या की, थायलंडच्या लोकशाही शासनालाच त्याचे चटके बसले.

बँकॉक रेडिओवरील संगीताचे सूर अचानक थांबले आणि एक त्रोटक निवेदन ऐकू येऊ लागले. 'शासनाला शांतता आणि सुव्यवस्था राखणे अशक्य झाले आहे.' तो आवाज क्षणभर थांबून पुन्हा ऐकू आला. 'आपला देश कम्युनिस्टांच्या हातून वाचवण्यासाठी आणि थायलंडची राजसत्ता या भूमीवर चिरंतन ठेवण्यासाठी, लष्करी मंडळाने सत्तासूत्रे हाती घेतली आहेत. देशभर मार्शल लॉ जारी करण्यात आला आहे.' क्षणभर या निवेदनाने सारी जनता अवाक झाली. विद्यार्थ्यांनी मिळवून दिलेल्या लोकशाहीला विद्यार्थ्यांच्याच भीषण हत्याकांडाने मूठमाती मिळत असलेली पाहून सारेजण हळहळले. रेडिओवरील त्या घनगंभीर आवाजाची आता सर्वांना ओळख पटली. आदल्याच दिवशी संरक्षणमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतलेल्या अॅडमिरल सगद यांचा तो आवाज होता. पुन्हा तो आश्वासक आवाज आला : 'आज रात्री तुम्ही आता शांतपणे झोपू शकाल. आता भीतीच्या छायेत राहण्याचे तुम्हाला कारण नाही.'

लष्करी शासनाच्या या पहिल्या आदेशान्वये थायलंडमधील सारे राजकीय वातावरणच खरोखर गाढ निद्रेत शिरले. राजकीय पक्षावर बंदी लादण्यात आली. पाचपेक्षा अधिक लोकांना एकत्र येण्यास मज्जाव झाला. वृत्तपत्रे, प्रकाशने आणि रेडिओ यांच्यावर सेन्सॉरशिप बसविण्यात आली. साम्यवादी संघटनांच्या सभासदांना मृत्युदंडाची सजा फर्मावण्यात आली. एका दिवसात, डाव्या गटाचे अनुयायी असल्याचे संशयावरून ३,००० संशयितांना अटक करून खास शिबिरात बंदिस्त करण्यात आले. अॅडमिरल सगद यांनी घोषणा केली : 'मुलकी शासन हळूहळू पूर्वपदावर आणण्यात येईल.' क्षणभर थांबून त्यांनी पुस्ती जोडली– 'अर्थात जेव्हा सारे राष्ट्र त्यासाठी सिद्ध होईल तेव्हा.' आपल्या सद्हेतूचे प्रमाण म्हणून लष्करी जनता मंडळाने तावडतोब सरन्यायाधीश थानिन क्रायविचिएन (वय ४९) यांची पंतप्रधानपदी नेमणूक केल्याचे जाहीर केले.

सप्टेंबरच्या मध्यापासूनच थायलंडमधील वातावरण तापू लागले होते. १९७३ मध्ये विद्यार्थ्यांनी उठाव करून लष्करशाही उलथून पाडली आणि लोकशाही स्थापन केली होती. त्यावेळच्या उलथापालथीत परागंदा झालेले माजी पंतप्रधान थानोम किट्टिकाचूर्ण सप्टेंबरात मायदेशी परतले. मृत्यूच्या दारात असलेल्या ९१ वर्षांच्या आपल्या वृद्ध पित्याला भेटायला म्हणून थानोम मायदेशी आले. पण मागील अनुभव ध्यानात घेऊन ते परत जायचे नाव काढीनात. आपल्या राजकीय हद्दपारीनंतर १९७४ मध्ये थायलंडमध्ये घुसण्याचा त्यांनी पहिला प्रयत्न केला. पण विद्यार्थ्यांच्या उग्र निदर्शनामुळे त्यांना पुन्हा हद्दपार व्हावे लागले. थानोम यांचे माजी उपपंतप्रधान फिल्ड मार्शल प्रपास चारूसाथिएन यांनी काही सहकाऱ्यांसह गेल्या ऑगस्ट ७६ मध्ये पुन्हा एकदा थायलंडमध्ये प्रवेश करायचा प्रयत्न केला. त्यावेळी उसळलेल्या दंगलीत १५ जण ठार झाले आणि प्रपास यांची पुन्हा हकालपट्टी झाली. या पूर्वानुभवामुळे मायदेशी परतलेले थानोम पुन्हा बाहेर जाण्याऐवजी चाचपणी करू लागले. थानोम यांच्या विरोधाचे निनाद संसदेतही उठले. २३ सप्टेंबरला गच्च भरलेल्या संसदेपुढे पंतप्रधान सेनी प्रमोज यांनी थानोम प्रकरणी समर्थन केले. पण त्यांच्याच पक्षाच्या एका तरुण खासदाराने पंतप्रधानांवरच तोफ डागली. शासनाचे वर्तन जनतेत अविश्वास निर्माण करणारे असल्याचे त्याने ठणकावून सांगितले. या प्रचंड माऱ्याने गर्भगळीत झालेल्या पंतप्रधानांनी अखेरचे शस्त्र उपसले. ते म्हणाले, 'या सभागृहात जर माझे कोणीच ऐकून घेणार नसेल तर आजच मला माझा राजीनामा सादर करावा लागेल.' पण असल्या धमक्यांना कोणी किंमत दिली नाही. परिणामी सेनी प्रमोजना खरोखरीच आपला राजीनामा सादर करावा लागला. पण अवघ्या २४ तासांत थायलंडचे नरेश भूमिबल अतुल्यदेय यांनी त्यांची पुन्हा नियुक्ती केली. सेनी प्रमोजही 'राष्ट्रावरील उत्कट प्रेमापोटी' पुन्हा पंतप्रधानपदावर आरूढ झाले.

या राजकीय नाट्याने वातावरण अधिकच चिघळले. देशभर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. 'थानोम किट्टिकाचूर्ण चालते व्हा' अशी प्रक्षोभक पोस्टर्स बँकॉकमध्ये झळकली. प्रक्षुब्ध विद्यार्थ्यांनी थानोमच्या हकालपट्टीची मागणी केली आणि २ ऑक्टोबर संध्याकाळ ही अंतिम तारीख देण्यात आली. शासनावर याचा काहीही परिणाम झाला नव्हता. थायलंडमध्ये प्रक्षुब्ध विद्यार्थ्यांच्या दंगली हा नेहमीचाच भाग झाला आहे. त्यामुळे या प्रकाराकडे कोणीच फारसे गंभीरपणे पाहिले नाही. शनिवारची संध्याकाळ टळली तरी शासनाने तोंड उघडले नाही. खवळलेले डाव्या गटाचे विद्यार्थी थम्मसत विद्यापीठाचे जवळ जमले. विद्यापीठ आवाराबाहेरच्या

प्रमेन पार्कवर जाहीर सभा सुरू झाली. हे पार्क डाव्या गटाचे नेहमीचे सभास्थान आहे. प्रक्षुब्ध विद्यार्थ्यांनी काही नासधूस करू नये म्हणून कुलगुरू पूए इंगफाकोर्न यांनी विद्यापीठाचे आवार बंद केले. पण चार हजार विद्यार्थी आणि त्यांचे समर्थक यांनी ही निदर्शनबंदी धुडकावून लावली आणि हा प्रक्षुब्ध जमाव विद्यापीठावर चाल करून आला. संध्याकाळी पाच वाजता विद्यापीठाचे दर्शनी दरवाजे कोसळले आणि विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा ताबा घेतला. शनिवार रात्री विद्यापीठाचा खूप मोठा भाग व्यापण्यात आला आणि एक सनसनाटी घोषणा करणारा प्रस्ताव सर्व विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आला. १४ ऑक्टोबर ७३ मध्ये लष्करशाही उलथून पाडली त्याचा तिसरा वर्धापन दिन साजरा करण्याचा. गगनभेदी घोषणांनी हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. सभामंचकावर राजकीय टिंगल-टवाळी करणारी भाषणे एकीकडे चालू होती. त्याचवेळी गुप्तपणे शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा विद्यापीठ आवारात जमा होऊ लागला होता. विद्यापीठ आवाराबाहेर वेगळेच नाट्य आकाराला येत होते. डाव्या गटाच्या या उपद्व्यापी चाळ्यांनी संतप्त झालेले उजव्या गटाच्या विद्यार्थ्यांचे जथेच्या जथे आवाराबाहेर जमा होत होते. त्यात कामगार होते. रेड गार्स (जंगली रेडा) संघटनेचे सभासद होते. त्यांनी मागणी केली : ' राष्ट्र डाव्यांच्या प्रवाहात वाहवत असल्यामुळे शत्रूराष्ट्रांना आपला मर्मभेद करणे सहज शक्य होईल. अशावेळी कम्युनिस्ट शेजाऱ्यांकडून येणाऱ्या दडपणापासून राष्ट्र वाचविणे आवश्यक आहे. म्हणून कम्युनिस्टांना हाकून लावा. मंत्रिमंडळातून बडतर्फ करा.' थायलंडमधील संघर्ष टोकाच्या अवस्थेला पोचला होता. पण अशा वेळी राजकीय परिस्थिती मात्र विलक्षण होती. कम्युनिस्टांची हकालपट्टी करा, ही मागणी ऐकायला अधिकृतपणे कोणी जागेवरच नव्हता. कारण सेनी प्रमोजच्या नव्या मंत्रिमंडळाला नरेशांची मान्यताच मिळाली नव्हती. थायलंडच्या लोकशाहीवर येणारे गंडांतर टाळण्यासाठी उजवे गट संघर्षाला सिद्ध होते. पण ज्या लोकशाहीच्या रक्षणासाठी ते युद्धसज्ज झाले होते, ती लोकशाहीच त्यावेळी जागेवर नव्हती. राष्ट्र ज्वालामुखीच्या उद्रेकाची भीषणता अनुभवत असताना शासनच अस्तित्वात नव्हते.

५ ऑक्टोबर. मंगळवार दुपारपर्यंत वातावरण विलक्षण तापले होते. राष्ट्र एका घातक वळणावर येऊन ठेपले होते. आपल्या मागण्या मान्य होईपर्यंत थम्मसत विद्यापीठाचा ताबा सोडण्यास डाव्या विद्यार्थ्यांनी स्पष्ट नकार दिला होता. ४३ कामगार संघटनांनी या डाव्या विद्यार्थ्यांना आपला पाठिंबा जाहीर केला आणि आपल्याकडून ३ दिवसांची अंतिम मुदत शासनाला दिली. त्यानंतर बँकॉकमध्ये सार्वत्रिक संप सुरू करण्याची धमकीही देण्यात आली. त्याच दिवशी पंतप्रधान सेनी प्रमोज यांच्या नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी थायलंड नरेश भूमिबल अतुल्यदेय यांचेपुढे पार पडला. डाव्या गटांनी एकीकडे असे उग्र रूप धारण केले असताना दुसरीकडे साऱ्या उजव्या गटवाल्यांनी मंत्रिमंडळाला धारेवर धरले. सर्व उजव्यांनीही संयुक्तपणे मागणी केली : ' सेनीच्या मंत्रिमंडळातील दोन डाव्या मंत्र्यांना अर्धचंद्र द्यावा.'

मंत्रिमंडळ अस्तित्वात येऊन काही तास होत नाहीत तोवर दोन्ही गटांनी असे कात्रीत पकडलेले पाहून सेनी प्रमोजचा निश्चय डळमळू लागला. सेनीचा ढासळता आत्मविश्वास पाहून डाव्यांनी उचल खाल्ली. थायलंडचे राजकुमार अञलोंगकर्ण (वय २४) यांच्यासारखा दिसणारा एक तरुण निवडण्यात आला. त्याला विद्रूप करून विद्यापीठ आवारात फासावर लटकवण्यात आले. त्याच रात्री ही वार्ता सर्वत्र पसरली. रात्रीच्या वृत्तपत्रांत थम्मसत विद्यापीठातील ही भीषण कुचेष्टा–घटना फोटोसह छापण्यात आली. फासावर लटकणाऱ्या विद्यार्थ्यांचे राजकुमाराशी एवढे साम्य होते की, ही कुचेष्टा म्हणजे साऱ्या राजघराण्याचा अपमान समजला गेला थायलंडमध्ये अशा प्रकारच्या अपराधाला घटनेने शिक्षा फर्मावि़ली आहे. या कुचेष्टेने साऱ्या जनतेच्या भावनांनाच हात घातला गेल आणि त्या भीषण हत्याकांडाची ठिणगी पडली.

अखेर मध्यरात्री सेनी प्रमोज यांनी उपपोलीस प्रमुख चुंपल लोहाचल यांना आज्ञा दिली : ' विद्यापीठात घुसलेल्या डाव्या गटाच्या विद्यार्थ्यांना हुसकावून लावा.' पण आता खूप उशीर झाला होता वेळ केव्हाच निघून गेली होती. स्फोट अपरिहार्य होता. पहाटे उजव्या गटाच्या १० हजार विद्यार्थ्यांनी थम्मसत विद्यापीठावर चढाई करावयास प्रारंभ केला. त्या वेळी त्यांच्याजवळ M–16 च्या बंदुका आणि हॅन्डग्रेनेडस् होती. त्यापाठोपाठ लष्कराने कारवाई सुरू केली. विद्यापीठाचे दार उडवून देण्यात आले. पॅराट्रूपस्, सीमारक्षक दले, नाविक दले यांची वाहने घोंघावत आत शिरली. बंदुका, ग्रेनेडस् यांचा वर्षाव सुरू झाला. सैनिकांनी सारे आवार धुऊन काढले. अंतिम निकाल ४१ ठार त्यात २ पोलीस आणि एकूण १८० गंभीर जखमी. घाबरून सैरावैरा पळणाऱ्या आणि विद्यापीठाच्या फूटबॉल मैदानावर एकत्र झालेल्या विद्यार्थ्यांना तर सैनिकांनी अमानूष मारहाण केली. त्यांचे बूट, घड्याळे, चष्मे, गॉगल, गळ्यातील बुद्धाच्या प्रतिमा काढून घेण्यात आल्या. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या जखमी विद्यार्थ्यांकडे पाहत मिलिटरी डॉक्टर्स शांतपणे बसून होते. कारण वरून येणाऱ्या आदेशाची ते वाट पाहत होते.

या सर्व गोंधळात काहीजण मात्र आवाराजवळील वाहणाऱ्या चाओफ्या नदीत उड्या टाकून पसार झाले. ज्यांनी रस्त्यावर उड्या टाकून पळण्याचा प्रयत्न केला ते खवळलेल्या जमावाच्या हातात सापडले. काहींना मरेपर्यंत मारहाण झाली. काहींना फासावर लटकावण्यात आले तर काही प्रदीप्त अग्नीच्या स्वाधीन झाले.

एवढे सगळे घडत असताना सेनी प्रमोज मात्र मंत्रिमंडळाच्या बैठकीत गुंतला होता. बाहेरचा संघर्ष विकोपाला जात असल्याचे त्याला माहीत होते. मंत्रिमंडळही दुभंगले होते. पण या सर्वांच्या मागे वावरणाऱ्या अन्य दुष्ट प्रवृत्तीची मात्र सेनींना कल्पना नव्हती. ते लंबेचवडे भाषण ठोकून मंत्र्यांची समजूत काढत होते. एवढ्यात कम्युनिस्ट विद्यार्थ्यांचे निकंदन करून, उन्मत्त झालेला, खून चढलेला हजारोंचा जमाव संसदेवरच चालून आला. संसदेला वेढा पडला. ' सेनी प्रमोजची भेट हवी,' अशा घोषणा सुरू झाल्या. भेदरलेला सेनी जमावाला सामोरा गेला. पुनश्च घोषणांनी वातावरण निनादले, ' कम्युनिस्ट मंत्र्यांना खतम् करा.' सेनीने होकार दिला नाही. संतप्त जमावाशी वाद सुरू झाला. अखेर सेनीने घोषणा केली, ' थायलंडच्या राजांची सत्ता चिरंतन राहावी म्हणून त्याची शांतता व सुव्यवस्था राखण्याचा मी माझ्याकडून आटोकाट प्रयत्न केला. पण जर तुमची इच्छाच असेल तर मीही जाईन.'

आणि तसेच झाले. अखेर सेनी प्रमोजना जावेच लागले. पण त्याबरोबर लोकशाहीही गेली. रक्तरंजित क्रांतीतून मिळवलेली लोकशाही अखेर रक्तवर्णी लष्करी क्रांतीत परिणत झाली.

थम्मसत विद्यापीठातील एका विद्यार्थ्याने काढलेले उद्गार समर्पक आहेत. तो म्हणतो, ' आम्ही लोकशाही गमावली.आणि सुरक्षितता मिळवली आहे. आम्हाला संसदीय लोकशाही हवी आहे, पण हे राजकीय पक्ष त्याचा सावळागोंधळ माजवायलाच जणू एकत्र येतात. असो. ही सुरुवातही काही वाईट नाही.' □



# अशी चौकशी, अशी फाशी !

र. धों. घाणेकर

## : दोन :

दुसऱ्या महायुद्धकालात जपानने ७ डिसेंबर १९४१ ला पर्ल बंदरावर हल्ला केला, तेव्हापासून रिचर्ड निक्सनचे मन युद्धावर जाण्यासाठी ओढ घेऊ लागले. लग्न होऊन एक वर्ष लोटलेलं, वकिलीला नुकतीच सुरुवात केलेली, तेव्हा जावे की न जावे, ह्याचा विचार करता करता दीड वर्ष निघून गेलं. जर्मनीची सरशीच होत होती. अखेर त्याने युद्ध-भरती-केंद्रावर नाव नोंदविण्याचे ठरविले. त्याची भरती झाली.

२ सप्टेंबर १९४२ ला तो नौदलात दुय्यम लेफ्टनंट ह्या हुद्द्यावर रुजू होऊन 'ऱ्होड आयलंडस' ह्या ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी निघून गेला. काही महिन्यांनी त्याला आयोवा संस्थानातील ओटुम्वा ह्या ठिकाणी धाडण्यात आले आणि १९४३ सालच्या मे महिन्यामध्ये 'दक्षिण पॅसिफिक हवाई विभागा'त तेथे लढणाऱ्या सैन्याला दाणा-गोटा पुरविणाऱ्या जहाजावरील दुय्यम अधिकाऱ्याची त्याला जागा मिळाली. जुलै १९४४ मध्ये निक्सन अमेरिकेला परत आला व अल्मेडा–कॅलिफोर्निया FLEET–AIR–WING–8 येथे काम करू लागला.

युद्धसमाप्तीनंतर त्याला 'नेव्ही ब्यूरो ऑफ एरोनॉटिक्स' या कार्यालयात धाडण्यात आले. १९४५ च्या नोव्हेंबर महिन्यात नौदलातील नोकरीला रामराम ठोकून निक्सन बाहेर पडला व पुन्हा वकिली सुरू करावी, अशा विचारात होता.

ह्याचवेळी कॅलिफोर्नियातील बाराव्या उपविभागाची निवडणूक होऊन एक व्यक्ती लोकप्रतिनिधी सभेमध्ये धाडावयाची होती. ह्या भागातून गेली १० वर्षे डेमोक्रॅट जेरी वूरीस हा निवडून जात असे. तो आताही निवडणुकीला उभा राहणार होता. परंतु नुकतेच युद्ध संपून गेलेले, तेव्हा युद्धावरून परत आलेल्या एखाद्या उमद्या, तरुण, तडफदार, शिक्षित माणसास 'रिपब्लिकन' पक्षातर्फे निवडणुकीसाठी उभा करावयाचा बेत ठरत होता. कॅलिफोर्नियाचा भाग हा जात्याच रिपब्लिकन पक्षाचा बालेकिल्ला; परंतु गेली १० वर्षे चांगली व्यक्ती उभी करण्यासच मिळेना, त्यामुळे साहजिकच डेमोक्रॅट वूरीस हाच निवडला जात होता.

जेरी वूरीस हा लक्षाधीश, राजकारणपटू, उच्च शिक्षण घेतलेला, सोशॅलिस्ट, अप्टन सिंक्लेअरच्या END POVERTY (गरिबी नष्ट करा) ह्या चळवळीचा कॅलिफोर्नियामधील कार्यकर्ता होता. वागणुकीने सोज्वळ, स्वभावाने उमदा, दिलदार, निःस्वार्थी. कम्युनिस्टांचा वैरी. House of Representatives मध्ये 'वूरीस कायदा–Public Law–870' हा कायदा त्याने पास करून घेतला की, ज्यामुळे व्हाईट-हाऊसच्या न्यायखात्याकडे अमेरिकेत काम करणाऱ्या परदेशांतील प्रत्येक संस्थेने आपल्या संस्थेचे, पदाधिकाऱ्यांची नावे नोंदवलीच पाहिजेत, असे ठरले गेले. यामुळे विशेषतः कम्युनिस्ट तर त्याच्याविरुद्ध फारच जळफळत होते.

वूरीस हा काम छान करीत होता. पण रिपब्लिकन पक्षाचा नव्हता, हीच बोचणी त्या पक्षाला होती. जाणत्या व वयस्क रिपब्लिकन्सची बैठक भरली. शंभरच्यावर व्यक्ती उपस्थित होत्या. त्यांच्यापैकी निवडणुकीला उभे राहण्यास कोणी तयार नव्हते व डोळ्यांपुढे योग्य उमेदवाराचे नाव नव्हते.

ह्या बैठकीत असे ठरले की, निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून जाहिरात द्यावी. त्याप्रमाणे २६ वर्तमानपत्रांत एकाच दिवशी जाहिरात दिली गेली. मजकूर खालीलप्रमाणे होता :

उमेदवार पाहिजे : जिल्ह्यातून गेली १० वर्षे निवडून येणाऱ्या व्यक्तीचा पराभव करू शकेल, असा तरुण–प्रामुख्याने लढाईवरून पराक्रम करून परतलेला व पूर्वीचे कोणत्याही पक्षाचे पाश नसलेला. शंभर नागरिकांची समिती अर्जातून निवड करील, परंतु अन्य कोणतीही मदत समितीकडून अपेक्षू नये.

आलेल्या अर्जांची तपासणी करण्यासाठी एक कमिटी नेमली गेली. त्या कमिटीचे सभासद–स्टॅनले बार्नेस–वकील, फ्रँक जॉर्मेनसन्–उपाध्यक्ष–मेट्रोपोलिटन विमा कंपनी, हेरमन पेरी–बँक ऑफ अमेरिकेच्या व्हिटियर येथील शाखेचे अध्यक्ष आणि मूरे छोटिनर–वकील.

चांगल्यापैकी व नावाजलेली कोणीच व्यक्ती पुढे आली नाही. ज्या व्यक्ती आल्या, त्यांतून समितीला एकही उमेदवार पसंत पडला नाही.

जाहिरात नाकामी ठरली. पैसे वाया गेले. काहीच निष्पन्न झाले नाही.

तेथीलच व्हिटियर कॉलेजचा अध्यक्ष वॉल्टर डेक्स्टर ह्याला निवडणुकीला उभे राहण्याची विनंती करण्यासाठी एक शिष्टमंडळ गेले. तो उभा राहता तर कदाचित निवडून येता. सर्व बाजूंनी वॉल्टर डेक्स्टर लायक होता. पण शैक्षणिक क्षेत्रात आपण सबंध जन्म घालविल्यानंतर आता उतारवयात राजकारणात पडून हात बरबटून घ्यावेत, हे त्याच्या मनाला रुचेना–त्याने नकार दर्शविला. मात्र त्याने रिचर्ड निक्सनचे नाव सुचविले व सर्व दृष्टीने तो लायक असल्याची त्याने ग्वाही दिली. समितीला, सर्व बाजूंनी विचार केल्यानंतर, निक्सन हा निवडणुकीला उभा करण्यास काही हरकत नाही, असेच वाटले.

काही दिवसांनंतर फ्रँक जॉर्जेनसन व बॉइड गिवन्स निक्सनच्या आईवडिलांना भेटून आले. निक्सनची सर्व माहिती त्यांच्याकडून त्यांना मिळाली व निक्सनला बोलावून घ्यावे, असे ठरले. सप्टेंबर १९४५ मध्ये हर्मन पेरीने निक्सनला तार धाडली. दुसऱ्या दिवशी निक्सनने हर्मन पेरीला टेलिफोन करून स्वतःची माहिती करून दिली. समितीने निक्सनला भेटीसाठी बोलावले. शंभरजणांच्या मेळाव्यापुढे २९ सप्टेंबर १९४५ ला निक्सन जाऊन थडकला. हा मेळावा 'विल्यम पेन' या भव्य हॉटेलमध्ये भरला होता.

ऑक्टोबर महिन्यामध्ये समितीच्या ४ बैठकी झाल्या. विचार-विनिमय होतच होता. शेवटी २० नोव्हेंबरला समितीने आपल्या ठरावाची प्रत निक्सनकडे धाडली व त्याचे काय म्हणणे आहे, ह्याची विचारणा केली. ठरावात, रिपब्लिकन पक्षातर्फे ही निवडणूक लढवावयाची आहे, असा स्पष्ट खुलासा केलेला होता.

४ डिसेंबर १९४५ ला निक्सनने आपला होकार समितीला कळविला. काही दिवसांतच म्हणजे ४ जानेवारी १९४६ ला निक्सनची नौदलातून मुक्तता झाली.

तपास करता करता निक्सनला समजून चुकले की, वूरीसच्या विरुद्ध निवडणूक लढविणे तितकेसे सोपे नाही. १०० व्यक्तींच्या समितीच्या अध्यक्षांनी मूरे छोटिनेर ह्या कर्तबगार वकिलाची गाठ घेऊन, निक्सनच्या निवडणुकीची सर्व सूत्रे त्याने हातात घ्यावीत, म्हणून विनंती केली व ती त्याने मान्य केली.

मूरे छोटिनेर ही व्यक्ती वकील असून, राजकारणातील निवडणुका लढविण्यामध्ये हुशार आणि दर्दी. नानाप्रकारच्या युक्त्या व क्लृप्त्या लढविण्यात अगदी पहिला नंबर! तो फौजदारी कोर्टात काम करणारा वकील होता, त्याला कामही भरपूर होते. त्याचे ऑफिस फॉक्स थिएटर बिल्डिंग, लॉस एंजेल्स येथे होते. जरासा ठेंगणा, वर्णाने सावळा, परंतु दिसायला तरतरीत व चलाख. राजकारण झुंजविण्याची फार आवड. गाठीचा पैसा खर्च करून राजकारणातील कोंबडी झुंजविणं ह्यातच त्याला आनंद. तसा बुद्धिमान व लेखणीदेखील तिखट व झणझणीत.

निक्सनच्या ह्या १९४६ मधील पहिल्या निवडणुकीचा हा मूरे छोटिनेर सूत्रधार आणि चालक. युद्धावरून नुकतेच परत आलेले हर्बर्ट क्लीन व रॉबर्ट फिंच हेदेखील निक्सनला येऊन मिळाले.

राजकीय निवडणुका लढविण्याचे व त्या जिंकण्याचे एक तंत्र असते. छोटिनेरने आपले स्वतःचे एक तंत्र करून ठेवलेले होते. त्यातील काही सूत्रे खालीलप्रमाणे होती.

1] Never let the public know all your opinions, but make sure it knows about selected portions of your opponents' views.

[ आपली सर्वच्या सर्व वैयक्तिक मते उमेदवाराने जनतेपुढे कधीच ठेवू नयेत, परंतु विरुद्ध पक्षाच्या उमेदवाराच्या मतातील महत्त्वाची टिपणे जनतेपुढे ठेवण्याचा अट्टाहासाने प्रयत्न करावा. ]

2 ) Start the election campaign atleast one year before the scheduled date of election.

[ निवडणूक-प्रचार-मोहीम ही निवडणुका होण्याच्या पूर्वी कमीतकमी एक वर्षभर अगोदर सुरू करावी. ]

या सूत्राचे कारण उघड होते. प्रतिपक्षावर एकेक हल्ला सावकाश चढवत राहिले पाहिजे. त्या हल्ल्यांवर त्याचे प्रत्युत्तर येतेच. ते जनतेपुढे आले की दुसरा हल्ला. त्याला प्रत्युत्तर आले की तिसरा. असा मारा करीत राहावयासाठी हा एक वर्षाचा काळ जरूरीचा असतो. स्वतःचा मोठेपणा उगीच भडक भाषेत जनतेपुढे ठेवण्याचा मोह टाळलाच पाहिजे.

3 ) Advance to the attack, but side-step the smear.

[ हल्ला झालाच तर प्रतिहल्ला. उगीचच प्रतिमा डागाळून देऊ नका. ]

4 ) Refuse to be put in the defensive.

[ प्रतिपक्षाने हल्ला चढविला तरी तुम्ही त्याची उत्तरे देत आहात, असे भासता कामा नये. ]

5 ) Let the public think they are selecting the candidate.

[ तुम्ही तुमचा डांगोरा पिटण्याचे टाळा. जनतेमध्ये आपआपसात 'तुम्ही निवडणुकीला उभे आहात' ह्याची सतत वाच्यता होत राहू दे. जणू सर्व जनताच करीत आहे ! ]

6 ) Create a favourable image with the press.

[ निवडणूक-मोहीम सुरू करण्यापूर्वी जबाबदार व भारदस्त वर्तमानपत्रांच्या संपादकांना, स्तंभलेखकांना व वार्ताहारांना आपलेसे करून घ्या. स्वतःची चांगली प्रतिमा निर्माण करा. ]

निदान नव्याने निवडणुका लढविणारांना ही छोटिनेरची सूत्रे फारच उपयोगी पडण्यासारखी आहेत हे निश्चितच. ह्या सूत्रान्वये निवडणूक-मोहिमेतील धोके व खाचखळगे छोटिनेरने निक्सनला

समजावून सांगितले. निक्सन जात्या संतापी वृत्तीचा, परंतु तशा-वेळी देखील छोटिनेर त्याला समजून सांगून थंड राहण्यास सांगत असे.

मोहीम जोरात सुरू झाली. जनता तर असेच म्हणू लागली की–
'Nixon has been thorougly Chotinerised.'

१९ मार्च १९४६ ला जेरी वूरीस व निक्सन ह्या दोघांनी निवडणूक अर्ज भरले. कॅलिफोर्निया संस्थानच्या निवडणूक कायद्यान्वये सुरुवातीच्या मतमोजणीसाठी (Primaries) मध्ये कोणत्याही पक्षांतर्फे कोणालाही उभे राहता येत होते. त्यात काहीही आडकाठी नव्हती.

वूरीसचा निवडणूक-मारा सुरू झाला. 'एक अननुभवी युद्धावरून परतलेला तरुण' असा निक्सनविषयीचा उल्लेख तो प्रत्येक ठिकाणी करू लागला.

निक्सन लहान लहान सभा घेत होता. माणसे फारच थोडी जमा होत होती. रस्त्यांच्या कोपऱ्याकोपऱ्यावर प्रचारसभा घेण्याचा त्याने सपाटा लावला.

प्राथमिक चाचणी मतदानामधे १९४४ ला वूरीसला ६१ टक्के मते पडली होती, ती आता १९४६ साली ५२·६ टक्के पडली.

ह्या निकालाने निक्सन व छोटिनेर खचले नाहीत; उलट त्यांना काम करण्याची हिंमत आली.

नुकतेच दुसरे महायुद्ध संपुष्टात आले होते. बेकारी वाढत चाललेली होती. युद्धावरून परत आलेले सैनिक नोकऱ्यांच्या शोधात होते. बेकारीचा फायदा घेऊन रशियातील साम्यवादी हळूहळू कामगारांच्या संघटनेत घुसलेले होते व त्यांच्या ह्या घुसण्यामुळे (Congress of Industrial organisation) CIO आणि (Political Action Committee) PAC ह्या कामगारांच्या संघटना अमेरिकन राजकारणापासून दुरावल्या होत्या.

निक्सन-छोटिनेर ह्या जोडगोळीने असे वातावरण तयार करावयाचे ठरविले की, वूरीस हा स्वतःला जरी डेमोक्रॅट म्हणत असला, तरी काँग्रेसमध्ये कोणत्याही महत्त्वाच्या विषयावर मतदान करावयाची वेळ आली की सोशिॲलिस्ट व कम्युनिस्ट ह्यांच्या मार्फत आलेल्या ठरावांवरच मतदान करतो! ही कृती धोक्याची आहे, हे जनतेसमोर प्रामुख्याने आणावयाचे. लोकांना सांगायचे की–

N. C. O.,–P. A. C.,–C. I. O. ह्या संघटनांशी वूरीसची थुरी हातमिळवणी आहे. लोकशाहीच्या नावाखाली हे साम्यवादी देशात धुमाकूळ घालीत आहेत आणि त्यांच्यातलाच हा एक वूरीस.

सर्व ठिकाणी खालील फलक फडकू लागले :
'A VOTE FOR NIXON IS A VOTE AGAINST THE COMMUNIST–DOMINATED PAC.'

निक्सनला मत म्हणजे कम्युनिस्टांनी पोखरलेल्या 'पाक' या कामगार संघाचे विरुद्ध मत!

वूरीस या जाळ्यात अडकला! त्याने CIO व PAC ह्या संघटनांशी आपला काहीही संबंध नसल्याचे जाहीर केले. कामगारांनी वूरीसला आपला पाठिंबा नसल्याचे जाहीर केले. पहिली गोळी बरोबर लागू पडली होती.

निक्सन–छोटिनेरनी मग नवा मारा आरंभला. त्या दोघांनी जनतेपुढे एक महत्त्वाची गोष्ट आणली व ती म्हणजे १९४५ साली काँग्रेसमध्ये निरनिराळ्या वेळी आलेल्या ४६ ठरावांपैकी ४३ ठरावांवर वूरीसने आपले मतदान केले ते CIO व PAC ह्यांनी आणलेल्या ठरावांवर केले.

मतदानाच्या आधी एक दिवसच घेतलेल्या सभेमध्ये निक्सन म्हणाला, 'आताची होणारी निवडणूक ही काही किरकोळ २ व्यक्तींमधील नाही. अगदी एकमेकाच्याविरुद्ध मूलतःच राजकीय मतभेद असणाऱ्या भूमिकेवरून ही निवडणूक लढविली जात आहे. आपल्या दैनंदिन जीवनावर सत्ता आणि हुकूम वॉशिंग्टनमधून यावेत असे वाटत असेल तर आपण, मला मत न देता, माझ्याविरुद्ध उभा राहणाऱ्या व्यक्तीला द्यावे. माझे काहीही म्हणणे नाही!'

५ नोव्हेंबर १९४६ ला निवडणूक झाली. निक्सनला ६५५८६ व वूरीसला ४९९९४ मते पडली. निक्सन निवडून आला!

वूरीसने आपला पराभव मान्य केला; निक्सनच्या तुफानी प्रचाराचे कौतुक केले, एवढेच नव्हे तर त्याला एक अभिनंदनपर पत्र लिहून लागेल ती मदत देण्याचे अभिवचन पण दिले.

*'The greenest young' congressman'* असा उल्लेख 'New york Times ने निक्सनविषयी ह्यावेळी केला. तो फार काळपर्यंत पुढे लोकांच्या स्मरणात राहिला.

१४ डिसेंबर १९४६ ला आपली पत्नी व लहान मुलगी ट्रिशिया ह्यांच्यासह निक्सन वॉशिंग्टनला काँग्रेसमन म्हणून येऊन थडकला. ८० व्या काँग्रेस अधिवेशनाच्या अगोदर ३ जानेवारी १९४७ ला निक्सनचा शपथविधी पार पडला.

कॅलिफोर्नियामधून नुकताच निवडून आलेला काँग्रेसमन डोनॉल्ड जॅक्सन ह्याला बरोबर घेऊन १५ रिपब्लिकन काँग्रेसच्या सभासदांचा एक 'क्लब' निक्सनने स्थापन केला. दर बुधवारी ह्या क्लबाच्या बैठकी भरून काँग्रेसमधील कामकाजाची छाननी चालायची. मिचिगॅनचा जेरॉल्ड फोर्ड (आताचा राष्ट्राध्यक्ष), न्यूयॉर्कचा केनेथ कीटिंग, न्यू-हॅंपशायरचा नोरिस कॉटन, केंटुकीचा मॉर्टन, कॅलिफोर्नियाचा जॉन ॲलन, विसकॉनसिनचा बायरन, कॅलिफोर्नियाचा डोनाल्ड जॅक्सन, ओरेगॉनचा वॉल्टर नोरब्लॉड, कनेक्टिकटचा जॉन लॉज, मिसुरीचा बेकवेल, येनचा नेलसन्, डाकोटाचा लोव्हरे हे सुरुवातीचे सभासद होते.

काँग्रेसमध्ये गेल्यानंतर तीनच महिन्यांत निक्सनला 'मार्शल प्लॅन' या सर्वांगीण विचार करण्यासाठी असलेल्या सिलेक्ट कमिटीचा सभासद नेमण्यात आले.

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपची सांपत्तिक परिस्थिती अत्यंत खालावलेली होती व युरोपला मदत करणे म्हणजे कम्युनिस्ट रशियाला शह देणे होय, ह्या दृष्टीने निक्सनने ह्या मार्शल प्लॅनचा चांगला अभ्यास केला. १९४७ च्या अखेरीस ज्यावेळी सिलेक्ट कमिटीचे सभासद युरोपची पाहणी करण्यासाठी गेले त्यावेळी निक्सनलाही धाडण्यात आले.

अमेरिकेतील मजूर संघटना, रेड माफिया ह्या कम्युनिस्ट विचारप्रणाली असलेल्या व्यक्तींच्या आधिपत्याखाली असल्यामुळे, देशात संप घडवून आणणे व राज्ययंत्रणा खिळखिळी करणे, ह्या व्यतिरिक्त त्याचा दुसरा कोणताच धंदा नव्हता. १९७५ च्या ऑगस्ट महिन्यात हा माफिया अमेरिकेतून एकाएकी नाहीसा झाला व नंतर त्याचा कोठेच पत्ता लागला नाही.

प्रेसिडेंट ट्रूमन विरुद्ध होता तरी देखील एक असा कायदा पास झाला, की त्यामुळे कारखान्यातील मजुरांवर पुष्कळच बंधने घातली. हा कायदा पास करून घेण्यात निक्सनचे फार मोठे अंग होते व ह्याचवेळेस प्रथम त्याची व John Fitzerald Kennedy ह्याची प्रथम गाठ पडली. दोघे निरनिराळ्या पक्षाचे असून देखील त्यांची मैत्री चांगलीच टिकली. हा Taft-Hartley Act पास झाल्यानंतर कामगार वर्ग–विशेषतः साम्यवादी विचारसरणीचे कामगार–निक्सनवर आग पाखडू लागले. त्याच्यातूनच १९५८ मध्ये अल्जर हिस हे प्रकरण उद्भवले!

[क्रमशः]

CENPULP

# दि सेंट्रल पल्प मिल्स लि.

(कंपनीची स्थापना : ४ जुलै १९६०)

रजिस्टर्ड ऑफीस : ११८३, शिवाजीनगर, पुणे ५.

## ठेवी स्वीकारणे आहेत

| मुदत वर्षे | व्याजाचा दर द. द. शे. |
|---|---|
| १ | ११ |
| २ | १२ |
| ३ | १३ |
| ५ | १३½ |

**व्यवस्थापन :**
संचालक मंडळाच्या सर्वसाधारण नियंत्रण व निर्देशनाखाली कार्यकारी संचालक कंपनीचे व्यवस्थापन पहातात.

**व्यवहार :**
बांबूपासून कागद तयार करण्यासाठी लागणाऱ्या लगद्याचे उत्पादन, तसेच छपाईसाठी व लिखाणासाठी उपयुक्त अशा विविध प्रकारच्या कागदाचे उत्पादन.

**विनीयोग :**
कंपनीच्या दैनंदिन खेळत्या भांडवलासाठी व भांडवली खर्चासाठी.

व्याज दर सहामाहीस १ एप्रील व १ ऑक्टोबरला देण्यात येईल.

अर्जाचा नमुना व नियम यासाठी कृपया वरील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

ठेवीची किमान रक्कम रु. ५०० व त्यापुढील रक्कम रु. ५००च्या पटीत स्वीकारली जाईल.

ठेव कमीत कमी १ वर्ष मुदतीने स्वीकारणेत येईल.

ठेवीसंबंधी इतर अटी कंपनीकडून प्राप्त करावयाच्या छापील अर्जावर दिल्या आहेत.

**संचालक मंडळ :**

| नांव | पत्ता | व्यवसाय |
|---|---|---|
| श्री. एस्. एल्. किर्लोस्कर, चेअरमन | 'लकाकि', शिवाजीनगर, पुणे १६ | उद्योगपती |
| श्री. एम्. एस् पारखे, कार्यकारी संचालक | 'विद्याविलास', ११८३, शिवाजीनगर, पुणे ५. | उद्योगपती |
| श्री. आर्. बी. अमीन, | अलेंबिक कॉलनी, बडोदे ३. | उद्योगपती |
| श्री. जी. जी. टकले, | 'वनश्री', ९४/२०, एरंडवणा, पुणे ४. | आय् एफ् एस्. (रिटायर्ड) |
| श्री अकबर हैदरी, | त्रिमको लि. इंडियन मर्कंटाईल चेंबर्स, वॅलर्ड इस्टेट, निकोल रोड, मुंबई ४०० ००१ | उद्योगपती |
| श्री. डी. पी. मेहता, | मोती मॅन्शन, ५वी खेतवाडी लेन, मुंबई ४. | उद्योगपती |
| श्री. के. पी. मेहता, | मोती मॅन्शन, ५वी खेतवाडी लेन, मुंबई ४ | उद्योगपती |
| श्री. ए. पी. पदमजी, | दरभंगा मॅन्शन्स, कार मायकेलरोड, मुंबई २६. | उद्योगपती |
| श्री. डी. डी. पदमजी, | ७२, कोरेगाव पार्क, पुणे १. | उद्योगपती |
| श्री. व्ही. एस्. वैद्य, | 'लौकिक', मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे १६ | उद्योगपती |
| श्री. पी. जे. पटेल, | ४७०, जेठाभाई स्ट्रीट, मादिया अहमदाबाद | उद्योगपती |
| श्री. एन्. एस् सदावर्ते, एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर | १९२२, सदाशिव पेठ, पुणे ३० | बिझिनेस एक्झिक्यूटिव्ह |
| डॉ. एन् डी. जोशी, (नियुक्त आय् डी बी. आय्.) | इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया, रीफायनॅन्स डिपार्टमेंट, मिर्टा आय सी ई बिल्डिंग, २९८, पेरिन नरिमन स्ट्रीट, मुंबई ४०० ००१. | नोकरी |
| श्री पी. एस्. गुरुंग, (नियुक्त आय् एफ् सी आय्) | मेहता महाल, १५ मॅथ्यू रोड, पोस्ट बॅग नं ३९२८, मुंबई–४०० ००४. | नोकरी |
| रिअर ॲडमिरल बी. एन्. लेले, (रिटायर्ड) (नियुक्त आय् सी आय् सी आय्.) | 'नौका', आर्मामेंट पोस्ट ऑफीस, पुणे–४११ ०२१. | नेव्हल ऑफिसर (रिटायर्ड) |
| श्री. एम्. पी. पारेख, (नियुक्त गुजरात सरकार) | ॲडिशनल इंडस्ट्रीज कमिशनर, डायरेक्टोरेट ऑफ इंडस्ट्रीज, गुजरात राज्य, अहमदाबाद १. | नोकरी |
| श्री. विजय कुमार (नियुक्त सिकॉम) | निर्मल, १ला माळा, नरिमन पॉईंट मुंबई–४०० ००१ | नोकरी |

मागील तीन वर्षांचा आढावा

| वर्ष अखेर : | ३०-९-१९७३ रु | ३०-९-१९७४ रु | ३०-९-१९७५ रु |
|---|---|---|---|
| करपूर्व निव्वळ नफा | तोटा ५४,७६,५२१ | ९६,३१,७२७ | ११,५०,०६६ |
| करानंतर निव्वळ नफा | तोटा ५४,७६,५२१ | ९६,३१,७२७ | ११,५०,०६६ |
| लाभांश : | नाही | नाही | नाही |

| | |
|---|---|
| वसूल भाग भांडवल | २,८०,६२,५०० |
| फ्री रिझर्व्हज | २,४८,२२,८०० |
| मुदत ठेवी | ५४,७०,००२ |
| भागधारकाकडून कर्ज | ४०,०५,८०० |
| तारणावरील कर्ज | ८,७४,३६,४२५ |
| इतर कर्जे | ७०,००,००० |
| मागील घसाऱ्यापोटी करावयाची उर्वरित बाकी | ४,१६,२६,६६८ |

या जाहिरातीचा मसुदा संचालक मंडळाने दि २१ फेब्रुवारी १९७६ रोजी संमत केला असून दिनांक १९ जून १९७६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत वाढीव व्याजाचे दरास संमती दिली असून त्यांच्या आदेशानुसार ही जाहिरात प्रसिद्ध केली जात आहे.

एम् एस्. पारखे,
कार्यकारी संचालक.

सूचना : मूळ इंग्रजी जाहिरातीची खरी नक्कल रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, मुंबई यांचेकडे दि. ११ मे १९७६ रोजी नोंदविलेली आहे. तसेच वाढीव व्याजाचे दराची नोंद दिनांक २२।६।७६ रोजी दाखल केली आहे.

पुस्तके

# गोंदण

## शांताबाईंची नव्या-जुन्याच्या संगमावरील कविता

शांता शेळके या आपल्या सर्वांना गीतलेखक म्हणून परिचित आहेत. 'मी डोलकरं... डोलकरं... डोलकर दर्याचा राजा' हे कोळीगीत किंवा 'ही वाट दूर जाते स्वप्नामधील गावा' हे गीत, त्याचबरोबर चित्रपटगीते यांद्वारा त्यांचा परिचय सर्वांना आहे. आतापर्यंत कथा, कादंबरी, कादंबरी रूपान्तर, गीतलेखन, काव्यलेखन असे वाङमयाचे विविध प्रकार त्यांनी हाताळलेले आहेत. वर्षा आणि रूपसी या दोन कवितासंग्रहानंतरच त्यांचा कवितासंग्रह म्हणजे गोंदण.

अलीकडच्या स्त्री–लेखिका येणारा अनुभव... माणूस म्हणून येणारा अनुभव म्हणूनच व्यक्त करताहेत. माणूस म्हणून येणारा हा अनुभव स्त्री हा मानवाचा एक प्रकार म्हणूनही असू शकेल. म्हणून या स्त्री–लेखिकांमध्ये, त्यांच्या लेखनात स्त्रीच्या अनुभवाचं स्त्री म्हणून वर्णन असं असण्यापेक्षा माणूस या नात्याने केलेले वर्णन ही भावना जास्त आढळते. शांता शेळकेंचा 'गोंदण' हा कवितासंग्रह म्हणजे अशाच प्रकारचे साहित्य !

गोंदण या संग्रहाची जमेची पहिली गोष्ट म्हणजे यातल्या कविता माणूस म्हणून लिहिलेल्या वाटतात. कुठेही त्या स्त्रीच्या कविता आहेत असे वाटत नाही. त्यामुळे फक्त स्त्री म्हणून आई-मुलगी-प्रेयसी-पत्नी या नात्यांभोवती शांताबाईंच्या कविता फिरत नाहीत, तर त्यांची कविता स्वत:भोवती फिरते, 'मी' भोवती फिरते, 'दोघांच्या भोवती फिरते', 'शब्द' या माध्यमाभोवती गिरक्या घेते, तर 'ढग येतात' या कवितेमध्ये 'कालामध्ये सामावलेला कालातील अखंड अनुभव' असे म्हणत ढग येणाऱ्या वेळेचा अनुभव, दिसलेला निसर्ग व्यक्त करते. तर कधी 'माझा मी मजलाच प्रश्न करते होऊन कासावीस' म्हणून स्वत:शी बोलते. तर कधी ढसढसून रडणारे एक लहान असाहाय्य मूल पाहून त्याचे चित्र उभे करते. पण 'इथून पुढे त्याचे डोळे अधिकच खोल होतील आणि त्याचे कोवळे हात चटक्यांना सरावतील,' म्हणून समजूतही काढते. त्याचबरोबर कॅनॉट प्लेसच्या झगमगत गोल फिरणाऱ्या उंच दिमाखदार दिव्यात आपलेपणा पुसून टाकणारं क्रूर आणि नवे एकाकीपण पाहून भयभीतही होते.

या कविता वाचताना सतत जाणवत राहातं ते शांताबाईंचं संवेदनाशील मन. चित्रकाराचे डोळे असलेली त्यांची कविता अत्यंत सुंदर निसर्गवर्णन करते. झाडं, पानं, फुलं या निसर्गवर्णनाबरोबरच मोठ्या शहरातील इमारती, मोटारी, टॅक्सीची धडधड या ज्या नित्य गोष्टी पाहायला मिळतात त्याही ही कविता टिपून घेते.

शांताबाईंचं संवेदनाशील मन वेगवेगळ्या भाववृत्ती व्यक्त करण्यात यशस्वी झाले आहे. गोंदण म्हणजे संवेदनाशील मनाच्या विविध उद्‌गारांचा संग्रहच. कधी शांताबाई अस्वस्थ करून टाकणारा एकाकीपणा व्यक्त करतात, तर कधी तटस्थ होऊन स्वत:शीच बोलतात, तर कधी दुसरंच कुणी आपल्याशी बोलतं आहे असा आभास निर्माण करून बघता बघता मनाचा ठाव घेतात. आणि म्हणूनच गोंदणमध्ये एकसुरातल्या कविता येत नाहीत, तर भाववृत्तींची विविध आंदोलने असलेल्या कविता येतात.

गोंदणमधल्या कविता परक्या वाटत नाहीत, यातला कुठलाच अनुभवही परका वाटत नाही, त्यातला एकाकीपणा परका वाटत नाही, त्यातली तटस्थता दुसऱ्या कोणाची वाटत नाही, त्यातल्या आजोबांच्या आठवणी तिऱ्हाइताच्या वाटत नाहीत. निसर्गही गूढ गूढ वाटत नाही, तर हे सर्व आपल्याच भोवतीचं जणू आपलंच असल्यासारखं वाटतं. शांताबाईंच्या कविता म्हणूनच आपलेपणा निर्माण करू शकतात. यामुळे कुठलाही झपाटलेला अनुभव या कवितेत व्यक्त केला नसताना, अस्वस्थ करून सोडणारं कल्पनाविश्व हाताशी नसताना जे आहे ते सांगणारी ही कविता एकदम जवळची वाटू लागते.

वर लिहिल्याप्रमाणे शांताबाई कवितांतून अनेक भाववृत्ती व्यक्त करतात. या सर्व भाववृत्तींचा स्थायीभाव एकाकीपणा आहे. शरीरावर गोंदलेलं जसं सतत बरोबर राहतं, तसा हा एकाकीपणा सर्व भाववृत्तीच्या बरोबर, सतत व्यापून राहिलेला, सलत राहिलेलं दु:खं, बोचणी, विरह यांतून तो व्यक्त होतो. त्यामुळे शांताबाईंना 'मंद उन्हाचा उदासीन शिडकावा' वाटतो, 'चुकलेल्या गुरापरी' त्यांचा जीव हुंबरू लागतो, तर कधी सारे काही असतानाही तें भास आहे, असेच वाटू लागते.

हा एकाकीपणा, हे दुःख जसं कुणाशी तरी बोलताना व्यक्त होतं तसं ते 'देवपाट' या कवितेत जुन्या आठवणीमुळे तीव्र होतं आणि बोलून जातं :

> किती आठवू साठवू
> अरे जुन्या देवपाटा
> तुझ्या माझ्याही वरून
> किती गेल्या काळलाटा.

'आजोबा', 'पैठणी', 'देवपाट' या तीनही कविता अशाच जुन्या आठवणीत बुडून गेलेल्या.

शांताबाईंच्या कविता स्वप्नाळू नाहीत; वास्तवातून चालणाऱ्या आणि वास्तवात जे सापडेल, त्यात जिथे आनंद असेल तो आनंद उपभोगणाऱ्या, आनंद व्यक्त करणाऱ्या, दु:ख बोलणाऱ्या. म्हणून ही कविता म्हणते :

> घनदाट उभे वन भवती
> त्या सैरावैरा लाटा
> उत्फुल्ल पाकळीखाली
> अपरिहार्य सलता काटा.

शांताबाईंच्या कविता अबोल नाहीत, मितभाषीही नाहीत. अगदी अपवादात्मक ठिकाणी कविता मितभाषी होते. तशीच ही विनाकारण बडबडीही नाही. आहे ते फक्त– जिथल्या तिथे, हवे तेवढेच बोलणे.

गोंदणमधल्या बऱ्याच कवितांतून 'ऊन्ह' वेगवेगळ्या रूपात आपल्याला भेटते. कधी उन्हे मंद होतात, तर कधी ती अफाटही होतात, सोनउन्हे, मलूल उन्हाची संथ फिरणारी बोटे, तिरप्या उन्हाचे झोत, पिवळेधमक ऊन अशा वेगवेगळ्या विविध रूपांत. गोंदणमधल्या कवितेत रान, सूर्य, फुले, वाटा,

आभाळ ही सतत भेटतात. दरवेळेला त्यांचं येणं नव्याच स्वरूपाचं वाटावं, इतक्या बहारीनं, त्यांचं वर्णनही ताकदीनं केलेलं आहे. एका कवितेत शांताबाई म्हणतात :

या क्षणी मी पाहते आहे फक्त हे निळे-भोर आभाळ, झाड, वाट, ऊन, वेल, फूल-पाखरू, ढग, बगळचाची माळ. पण हे फक्त या कवितेपुरतं मर्यादित नाही तर बऱ्याच कवितांत आपल्याला हे सतत भेटत राहतं.

शांताबाईंची कविता लिहायची स्वत:ची शैलीही जाणवते. कवितेच्या पहिल्या ओळीत कुठलेच चित्र जाणवत नाही असे आपल्याला वाटू लागते तोच पुढच्या ओळीत कधी पूर्ण ओळीच्या साहाय्याने तर कधी कवितेतल्या ओळीतील एखाद्याच प्रभावी शब्दाच्या साहाय्याने त्या कधी चित्र पूर्ण करतात तर कधी तेच चित्र गडद करतात. त्याचा एखादा बारकावाही, एखादी सूक्ष्म छटाही दाखवून देतात. चित्रकाराचं कसब मोजक्या रंगात, थोडचाच फटकाऱ्यात चित्र उभे करण्यात असतं तसंच कवीचं कसब मोजक्या शब्दांत अनुभव सर्व सूक्ष्म छटांसह व्यक्त करण्यात असतं. शांताबाई मोजक्याच शब्दांत अनुभव व्यक्त करतात. या अनुभवात विविधता आहे.

शांताबाई अनुभव व्यक्त करून थांबत नाहीत, काही कवितेत त्या क्षणभर थांबलेल्या वाटतात, पण त्या थांबलेल्या वाटतात तिथं त्यांचं थांबणं चिंतनासाठी असतं. स्वत:च्याच अनुभवाची त्या चिरफाड करतात आणि त्या चिरफाडीत काय सापडलं, ते चांगलं आहे, वाईट आहे हे व्यक्त करणं योग्य किंवा अयोग्य याची मुलाहिजा न ठेवता ती चिरफाडही त्या मांडतात.

विराट आणि व्यथापूर्ण, विस्मयावह व्यंगाकार 'एकोऽहं बहुस्यां चा सनातन साक्षात्कार किंवा—

जरी भोग हा भोगणेंही चुकेना । व्यथेचीच होवो कथा सुंदर । जिव्हाळीतल्या रक्तधारेस देवा । असा लाभु द्या अमृताचा वर.

स्वतः तटस्थ राहून, अनुभवाची चिरफाड हे शांताबाईंच्या कवितेचं मोठं वैशिष्ट्य मानावं लागेल. त्यामुळे 'ती' या कवितेत त्या जेव्हा 'सुखदुःख दोहोंच्याही पैलपार तिचे मन' असं जेव्हा लिहितात तेव्हा ती ओळ किती खरी आहे ते आधीच जाणवून गेलेले असते.

गेल्या काही वर्षांत अनेक नवे कवी आले, येत आहेत. कवितेत नवे प्रवाह आले, कवितेचं विश्व त्यांनी ढवळून काढलं, टीकाकाराला खाद्य मिळावं इतकं. खरं तर शांताबाई या सर्वांपासून दूर असलेल्या. शांताबाई नव्या पिढीच्याही नाहीत आणि जुन्या पिढीच्याही नाहीत. कवितेच्या भाषेवरून त्यांना जुन्या पिढीचे म्हणावे तर आशयातला मोकळेपणा तसे म्हणू देत नाही. जुन्या आणि नव्या पिढीचा संगम त्यांच्या कवितेत जाणवतो.

उत्कृष्ट गीतकार म्हणून प्रसिद्धी पावलेल्या या कवयित्रीच्या कविता वेगळचा जरूर आहेत, पण काही वेळा शैली कंटाळवाणी होते. 'चांदण्यात गोंधळलेले पाणी' हे शुद्ध निसर्गवर्णन होईल असे वाटते तर—

'आणि क्षणोक्षणी विरघळत चाललेल्या जाणिवेचे
नुसते नुसते भास.'

या शेवटच्या दोन ओळी पूर्णपणे मानवी भावना व्यक्त करणाऱ्या, त्यामुळे अपुरं निसर्गवर्णन आणि अपुरी व्यक्त झालेली भाववृत्ती असं तिथे खटकतं.

हा कवितासंग्रहातील काही कविता सुरेख आहेत. पण काही ठिकाणी कवितेतल्या कवितेतच अंतर निर्माण झाल्यासारखे वाटते. काही भाववृत्ती फक्त एकत्र ठेवल्यासारख्या वाटतात. परडीत फुले टाकावीत तशा. ती मांडणी जमली नाही किंवा मुळातच करावीशी वाटली नाही म्हणून. या कवितात शांताबाई मला अयशस्वी वाटतात. या कवितांत काही भावना फक्त शेजारी शेजारी ठेवल्यासारख्या वाटतात. उदा. अचानकसा, गिचमिड, तटस्थ या कविता.

कविता कुणाला कुठली आवडेल हे ज्याच्या त्याच्या स्वभावधर्मावर अवलंबून असतं. तरीही एक मात्र नक्की की, 'काळी कळी वेचताना', किंवा 'स्मरणाच्या पार', 'काही', 'निळे नितळ आभाळ', 'चांदण्यात गोंधळलेले पाणी', 'अश्वत्थ', 'फोटो एक दुपार', 'मरणमहालातून', 'हे रान चेहऱ्यांचे' या शांताबाईंच्या कविता आठवणीत राहण्यासारख्या आहेत.

शांताबाईंचं कविता सहज फुलविणं, जियल्या तिथं बोलणं, चिंतन, मधूनमधून नादसौंदर्य असलेले शब्द, शवितेत उत्कट भावना व्यक्त करायचं असलेलं सामर्थ्य, कृत्रिमतेचा अभाव यामुळे 'गोंदण' वाचनीय झालंच आहे, पण शांताबाईंच्या कवितेबद्दल अधिक अपेक्षा करायला लावणारी भावनाही ह्या पुस्तकाने निर्माण केली आहे.

—लता भिसे

## The Age Of Cataclysm

By Alfred L. Webre &
Phillip H. Liss
(A Berkley Medallion Books,
Dollars 1·50 )

मानवाने विज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती केली आहे. कुठेतरी असे वाचल्याचे आठवते की, दर दहा वर्षांनी सर्व प्रकारची उपलब्ध असलेली माहिती दुपटीने वाढते. म्हणजे विज्ञानाची प्रगती एकंदरीत स्तिमित करणारीच आहे. पण माणसाचे मन मात्र प्रगती करावयाचे थांबले आहे. चहूकडे जुनी नीतिमूल्ये ढासळलेली आढळतात व त्यांच्या जागी नवीन मूल्ये येण्याची चिन्हे कुठेच दिसत नाही.

भूकंप, ज्वालामुखी, बदलते हवामान, एडगर कॅसीने केलेली भाकिते, अतींद्रिय ज्ञान, प्रदूषण व इतर अनेक विषयांवर या लेखकद्वयांनी या पुस्तकात चर्चा केली आहे. Occult Phenomena मध्ये आता चहूकडे लोकांचे लक्ष लागले आहे. शिकलेले लोकसुद्धा त्यात अनन्यसाधारण रस घ्यायला लागले आहेत. बंगलोर युनिव्हर्सिटीने तर गूढ किस्स्यांचे संशोधन करण्यासाठी एक विभागच उघडला आहे.

एडगर कॅसीने काही वर्षांपूर्वी असे भाकित केले होते की, सन १९५८ ते २००१ या काळात पृथ्वीवर भयानक नैसर्गिक उलथापालथी होतील. आणि अर्थात प्रदूषण व इतर मानवनिर्मित समस्यांमुळे या उलथापालथी विनाशकाळासारख्या वाटतील.

त्याच्या तारुण्यात एडगर कॅसी हा एक salesman व फोटोग्राफर होता. पुढे त्याला अतींद्रियाचे ज्ञान झाले. तो अगदी निरागस

मनोवृत्तीचा व कुटुंबवत्सल होता. कॅसीच्या शेवटच्या ४३ वर्षांत त्यांनी १४००० भाकिते केली. त्यातली ९००० आजारी लोकांची निदाने होती. यांपैकी बऱ्याच आजारी माणसांना त्याने पाहिलेही नव्हते. जगात अगदी लांब लांबच्या ठिकाणांहून लोक त्याचा सल्ला घेत.

भाकित करण्याआधी कॅसी स्वतःला समाधी लावून घेत असे व त्याला प्रश्न विचारण्याच्या भाषेतच उत्तर देत असे ! तो केव्हाही कोणतीच परकीय भाषा शिकला नव्हता.

कॅसीने भाकित केले होते की, सन १९६८ किंवा १९६९ मधे बहामाच्या बिमिनो बेटाजवळ एका पुष्कळच सुधारलेल्या संस्कृतीचे अवशेष सापडतील. अर्थात हे भाकित त्याने सन १९४० मधे केले होते. हे भविष्य पुष्कळच प्रमाणात खरे ठरले. उत्तर बिमिनीच्या पलीकडे १९६९ मध्ये एक ३१ माईल लांबीची एक भली मोठी दगडी भिंत सापडली होती. ही भिंत ९५०० वर्षांपूर्वीची आहे, असे कार्बन डेटिंग पद्धतीत आढळले होते. चार्लस् बर्लिझने त्याच्या 'Mystery of the Atlantis' या पुस्तकात तर असे सांगितले आहे की, हे अवशेष म्हणजेच १०/११ हजार वर्षांपूर्वी एका दिवसात महासागराखाली गेलेल्या अ‍ॅटलांटिस खंडापैकीच आहेत.

सन २००१ मध्ये पृथ्वी आपला आस बदलेल, असे आणखी एक कॅसीने भविष्य सांगितले आहे. त्याने असे सुद्धा एक भविष्य सांगितले आहे की, कॅलिफोर्निया व नेव्हाडाचे काही भाग प्रचंड लाटांमध्ये बुडून जातील. पेले किंवा व्हेसुवियस ज्वालामुखी फाटल्यानंतर तीन महिन्यांनी अशा लाटा उफाळतील. जपानचा बराच भाग समुद्राखाली गाडला जाईल. लॉस अँजेलिस, सॅन फॅन्सिस्को, आणि न्यूयॉर्क यांचा सुद्धा बऱ्याच प्रमाणात नाश होईल.

सन १९३५ मध्ये एडगर कॅसीवर विनापरवाना डॉक्टरी केल्याबद्दल खटला भरला गेला होता. ३ मार्च १९३६ ला त्याच्या बाजूने खटल्याचा निकाल लागला होता. निकाल ऐकून तो डेट्रॉईटहून व्हर्जिनिया बीचकडे आगगाडीतून प्रवास करीत होता. त्या प्रवासात त्याला असे स्वप्न पडले की, सन २१०० मध्ये नेब्रास्कामध्ये एडगर कॅसीचा पुनर्जन्म झाला. त्याचा ज्या कुटुंबामध्ये जन्म होईल त्या कुटुंबाचे आडनाव चमत्कारिक असेल. अगदी लहान असतानाच कॅसी जाहीर करील की, थोड्या वर्षांपूर्वी गतजन्मी त्या लहान मुलाने कॅन्टकी, अल्बामा, न्यूयॉर्क, मिशिगन आणि व्हर्जिनिया वगैरे ठिकाणी काम केले होते. नंतर केस गळलेल्या व पांढरी दाढी असलेल्या शास्त्रज्ञांनी कॅसीला एका उडत्या आगबोटीत बसवले व त्या त्या भागात संशोधन केले. न्यूयॉर्क भूकंपात किंवा युद्धात नष्ट झाले होते. नॉरफॉक हे एक मोठे बंदर झाले होते. अल्बामाचे बरेच भाग पाण्याखाली गेले होते. घरे काचेची बांधली होती. तिकडे कॅसीने केलेल्या कार्याचे बरेच रेकॉर्डस् सापडले. ते सर्व त्या शास्त्रज्ञांनी गोळा केले व परत त्या मुलासह (कॅसीसह) ते नेब्रास्काला गेले. असे हे कॅसीचे स्वप्न होते.

कधी कधी आकाशातील आध्यात्मिक शक्ती काही माणसांना अतींद्रिय ज्ञान देते. तसल्या माणसांना त्यामुळे भूतकाळ व भविष्यकाळाविषयी ज्ञान होते. पण ही अध्यात्मशक्ती फसवी असते. ही शक्ती काळ आणि वेळ यांची गुंतागुंत करून ठेवते. त्यामुळे कधी एखादे भविष्य तंतोतंत खरे ठरते तर दुसरे एखादे खोटे ठरते.

सन १९४० मध्ये बऱ्याच तेलाच्या कंपन्यांनी एका शास्त्रज्ञाला बहामा बँकेच्या वायव्येकडील समुद्राची पाहणी करायला सांगितली होती. त्या शास्त्रज्ञाने सुद्धा असा निष्कर्ष काढला होता की, तेथील समुद्राच्या तळात गाळाच्या खाली जे खडक आहेत, त्याच्यात व जमिनीवरच्या खडकात बरेच साम्य आहे. म्हणजे परत ते अ‍ॅटलाँटिसचेच खडक होते की काय ?

ज्वालामुखीमुळे वातावरणात जास्त धुळीचे कण पसरतात. आणि १९५५ पासून ज्वालामुखीच्या activities वाढल्या आहेत. त्या वाढत्या धुळीच्या कणांमुळे सूर्याची उष्णता अधिक प्रमाणात परावर्तित होते. त्यामुळे पृथ्वी थंड युगात प्रवेश करीत आहे, असे काही शास्त्रज्ञ म्हणतात. व्हेसुव्हियस हा ज्वालामुखी सन ७९ मध्ये मोठया प्रमाणात erupt झाला होता व त्या वेळेस पाँपेई (Pompeii) हे शहर भूकंपात नाश होऊन गाडले गेले होते. शतकानुशतके हे शहर त्याच गाडलेल्या अवस्थेत राहिले. पुढे ते सन १५९५ मध्ये सापडले. नंतर पुन्हा व्हेसुव्हियस हा १९०६ व १९४४ मध्ये मोठ्या प्रमाणात


## नवीन दाखल झालेली काही पुस्तके

| | | |
|---|---|---|
| (१) | **भगवान श्रीकृष्ण**–( श्रीकृष्ण या विषयावरील व्याख्याने ) बाळशास्त्री हरदास | रु. २५/– |
| (२) | **प्रतिमा, रूप आणि रंग**–( लेखसंग्रह ) –के. नारायण काळे | रु. १७/– |
| (३) | **बकुळीची फुले**– ( लेखसंग्रह )–महादेव सखाराम मोडक | रु. १२/– |
| (४) | **मी हा असा**–( विनोदी लेखसंग्रह )–श्रीकांत सिनकर | रु. १०/– |
| (५) | **पोरका**–( कादंबरी )–श्रीकांत सिनकर | रु. २५/– |
| (६) | **प्राजक्ता**–( कादंबरी )–योगिनी जोगळेकर | रु. १५/– |
| (७) | **हसो हसो**–( विनोदी कथासंग्रह )–बाळ गाडगीळ | रु. १२/– |
| (८) | **अवतीभवती**– ( लेखसंग्रह )–वसंत एकबोटे | रु. १०/– |
| (९) | **विषवृक्ष**–( कादंबरी )–आनंदी विजापुरे | रु. १२/– |
| (१०) | **वसंतसेना**–( कादंबरी )–आनंद साधले | रु. २१/– |

- आपल्यास पाहिजे असलेली पुस्तके आम्ही परगावीही पुरवू (V. P. नाही ).
- आपल्या पुस्तकांना प्लॅस्टिक कव्हर्स घालून देऊ.
- नॉन-मेंबर्संना डेलि-बेसीसवर पुस्तके वाचावयास मिळतील.
- दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून सभासद होता येते.
- इतर वाचनालयांसारखे 'पुस्तके किती दिवस ठेवावीत' असे बंधन नाही.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०**

erupt झाला. म्हणजे या शतकात ते दोनवेळा erupt झाला. स्ट्रँबॉली बेटावरचा ज्वालामुखी एटना हा १९६४ मध्ये जोरात erupt होत आहे. हे दोन व पेलेचे ज्वालामुखी भूमध्य समुद्राच्या तळाशी जो जमिनीचा दोष पुढे गेला आहे, त्याच दोषावर आहे.

सत १९०२ मध्ये पेले ज्वालामुखी जागृत झाला त्यावेळेला ३०००० लोकांपैकी एकच मनुष्य वाचला होता ! त्याच्या आधी पेलेचा ज्वालामुखी १७९२ व १८५१ मध्ये जागृत झाला होता. पेलेचा ज्वालामुखी हा उत्तर मार्टिनिक, फ्रेंच वेस्टइंडिजमध्ये आहे. गंमत अशी की, पेलेपासून ५० किलोमीटर लांब सेंट लुसिआ बेटावर सुफ्रीर (soufrier) नावाचा दुसरा ज्वालामुखी आहे. कधी कधी ते बरोबरच जागृत होतात. आता मात्र नुकताच थोड्या आठवड्यांपूर्वी नुसता (१५ ऑगस्टच्या आसपास) सुफ्रीरच जागृत झाला होता व ७२००० लोकांना सुरक्षित स्थळी हलविले गेले होते. सुफ्रीर बराच धडधडला व गडगडला व त्याने राख व वायू काढले. सुफ्रीरभोवती एक रहस्यमय वलय आहे. परवा जेव्हा तो जागृत झाला तेव्हा वेस-टेरे अगदी सूर्यप्रकाशात न्हाऊन गेले होते व सुफ्रीर मात्र वेगवेगळ्या रंगांच्या ढगांनी गाडला होता. त्या दोहोतले अंतर मात्र अगदीच जवळजवळ आहे. रीस्टरवर ४ स्केल एवढा भूकंप झाला व हा ज्वालामुखी ३५० किलोटन अणुस्फोटाएवढा जोराने erupt होईल असा अंदाज केला गेला. रॉबर्ट ब्राऊन् नावाचा इसम तर हेलिकॉप्टरने लाव्हारस बाहेर येण्याची सुरुवात झाली की काय हे पाहाण्यासाठी मुखावर गेला ! 'टाईम्' मासिकाचा पत्रकार बर्नार्ड डायडेरीच हा सुद्धा मुखापर्यंत गेला. ज्वालामुखीखालच्या भागात गुडघ्यापर्यंत राख साचली होती व सात शास्त्रज्ञ हेल्मेट व खास केलेले झगे घालून मुखाच्या भोवती निरीक्षण करीत होते !

कॅसीनी सन १९५८–२००१ या दरम्यान असेही भविष्य सांगितले आहे की, प्रचंड प्रमाणात दुष्काळ पडेल. सध्याचे बदलते हवामान हे त्या भाकिताला पुष्टी देईलच. प्रख्यात लेखक सी. पी. स्नो नेही असे सांगितले होते की, थोड्याच वर्षांत आपल्याला हजारो लोक मरताना दिसतील. स्नोची कारणे मात्र शास्त्रीय होती. वाढती लोकसंख्या, वाढते प्रदूषण व त्यामुळे बदलते हवामान. इंग्रजीमध्ये एक म्हण आहे ती अशी : Misfortunes never come singly. कदाचित मानवनिर्मित घोडचुका जेव्हा प्राणघातक ठरायला लागतील त्यावेळेला पंचमहाभूते उठतील. त्यात आणखीन एक भर म्हणजे antibiotics चे युगही वंचित होईल. नुकतेच एक प्रख्यात लेखक इवान इलीच याने Medical Nemesis नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. (बजेटच्या कारणामुळे माझ्या वाचनालयात हे पुस्तक उद्या घेईन, परवा घेईन, या माझ्या धोरणामुळे आता बाजारात त्या पुस्तकाच्या प्रती संपल्या आहेत. अभिजात पुस्तकात नफा अजीबात मिळत नसतो. पण शक्यतो मी ती हळूहळू घेत असतो.) या पुस्तकात वैद्यकीय शास्त्रावर व व्यवसायावर जेवढे शितोडे उडवले आहेत तेवढे मी इतर कोणत्याच पुस्तकात पाहिले नाहीत. सध्याचा डास जसा हळूहळू DDT ला immune होतो तसेच मानवी शरीरही हळूहळू ॲन्टिबायोटिक्सला immune होईल. अर्थात नवीन औषधाचे संशोधन होईलही. नवीन विचार-नवीन मार्ग सापडतीलही, पण सध्याचा जो पहाटेपूर्वीचा काळोख आहे, त्यात प्रचंड जनसमुदाय होरपळले जातील.

जो जो कोणी असा निराशावादी दृष्टिकोनाने विकृत होतो त्याला Prophet of Doom म्हणतात. पण मनुष्यांनी त्याला व इतरांना वंचित करण्यापेक्षा वस्तुस्थितीची योग्य ती दखल घेतली पाहिजे. हेच औचित्यपूर्ण आहे.

— जे. एन्. पांडा,
फिनिक्स लायब्ररी





# पॅपिलॉन
# पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

विज्ञानेश्वरी



# विज्ञान आणि पुनर्जन्म

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

मरणोत्तर माणसाला अस्तित्व असते का? पुनर्जन्म शक्य आहे का? या विषयावर विज्ञान काय म्हणते?

डॉ. गॅरिसन यानी 'नॅशनल इन्क्वायरर'च्या १५ जून १९७६च्या अंकात एक लेख लिहिलाय. त्यात त्यांनी म्हटलंय की, एडिसनचा या सर्वावर विश्वास होता. एका शास्त्रीय मासिकाला मुलाखत देताना एडिसनने आपण मृतात्म्यांशी संभाषण करू शकणारे यंत्र बनवीत आहोत व आपणाला यश येईल, असे नमूद केलेले आहे. पण एडिसनच्या या उपकरणाचे पुढे काय झाले, हे मात्र आपणाला आज समजू शकत नाही.

जेम्स किड यांनी स्वतःच्या मृत्युपत्रात 'अमेरिकन सोसायटी फॉर प्साराकीकल रिसर्च' याच्या नावे दोन लाख पन्नास हजार डॉलर्सची भली मोठी रक्कम ठेवली होती. मृत्यूसमयी माणसाच्या शरीरातून बाहेर पडणाऱ्या आणि त्यानंतर अस्तित्वात असलेल्या आत्म्याचे अस्तित्व शास्त्रीय दृष्टचा सिद्ध करणाऱ्याला ही रक्कम देण्यात येणार आहे. या संदर्भात आतापर्यंत झालेल्या संशोधनाची माहिती डब्ल्यू. टी. केवॉघ (W. T. Keovgh) यानी फिलिडालफिया येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'डिसकव्हर' दैनिकाच्या १६ नोव्हेंबर १९७५ च्या पुरवणीत दिली आहे. त्यांच्या मते मृत्यूसमयी माणसाच्या शरीरातून बाहेर पडणाऱ्या आत्म्याचे छायाचित्र काढण्याचे अनेक प्रयत्न झाले. पण त्याला यश आले नाही. मात्र असे अनेक वरवर अर्थहीन वाटणारे पुरावे मिळाले आहेत की, त्यावरून असे अनुमान काढता येईल की, माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा (Personality) काही भाग त्याच्या शरीरापेक्षा भिन्न असतो आणि मृत्यूनंतरही तो तसाच अस्तित्वात राहण्याची शक्यता आहे. पण हे पुरावे आजच्या विज्ञानाच्या भाषेत माडता येत नाहीत. कोणतीही गोष्ट, कोणतेही प्रमेय, सिद्ध करावयास काही गृहीत कल्पनांची आवश्यकता असते. विज्ञानातील कोणत्याही गृहीत कल्पनाच्या संदर्भात पुनर्जन्माचे प्रमेय अजून सिद्ध होत नाही. थोडक्यात अजूनही ते सिद्ध होते काही विज्ञानाला न पटणाऱ्या गृहीत कल्पनाच्या सदर्भात.

याबाबतची थोडी वेगळी माहिती 'नॅशनल ऑब्झरवर' आणि ऑगस्ट १९७६ चा 'सायन्स डायजेस्ट' या दोन अमेरिकन मासिकांनी दिली आहे. त्यांच्या मते अमेरिकेत याबाबत चाचणी मतदान घेतले असताना शहात्तर टक्के लोकांनी मृत्यूनंतरच्या अस्तित्वावर आपला ठाम विश्वास असल्याचे सांगितले. याबाबत सर्वस्वी वेगळ्या स्वरूपाचे संशोधन डॉ. एलिझाबेथ क्युबलर रॉस (*Dr. Elizabeth Kubler Ross*) यांनी केलंय. त्या नावाजलेल्या मानसशास्त्रज्ञ आहेत. त्यांच्या संशोधनाचा पायाच मुळी वेगळा आहे. तुकारामांनी 'आपुले मरण पाहिले म्या डोळा तो झाला सोहळा अनुपम' असे म्हटलंय! कै. काकासाहेब गाडगीळांच्यावर रेल्वेत एकदा प्राणघातक हल्ला झाला होता. जीवन-मृत्यूच्या सीमारेषेला स्पर्श करून ते तेव्हा परतले होते. त्या वेळचे आपले अनुभव त्यांनी पण एका लेखात सांगितले आहेत. डॉ. रूसने नेमके हेच केले. अगदी मरता मरता वाचलेल्या वा वैद्यकीय दृष्टचा मृत म्हणून जाहीर होऊन नंतर पुन्हा जिवंत झालेल्या जगभरच्या शेकडो लोकांच्या तिने मुलाखती घेतल्या. या मुलाखतीचा निष्कर्ष काढताना बाईंनी म्हटलंय, 'मृत्यूनंतर माणसाला अस्तित्व असते, याबाबत माझ्या मनाची आता पूर्ण खात्री पटलीय. माझ्या मनात त्याबाबत आता कोणताही संशय नाही.'

त्यांच्या मते मरणाला स्पर्श करून आलेल्या वा वैद्यकीय दृष्टचा मरण पावलेल्या प्रत्येक व्यक्तीने अगदी एकच गोष्ट आवर्जून सांगितली. त्या शेवटच्या क्षणी ती व्यक्ती क्षणभर पूर्ण जागी होती. त्या व्यक्तीची सारी ज्ञानेंद्रिये त्या क्षणी व्यवस्थित काम करीत होती. आपण फार मोठ्या तृप्तीत, समाधानात आणि शांतीत आहोत, असा निमिषमात्र भास झाला आणि आपण आपल्या शरीराच्या बाहेर पडून तरंगतो आहोत असे वाटले. आपल्या शरीराबाहेर पडून असे तरंगत असताना काही जणाना भोवतालचे सारेजण व्यवस्थित दिसत होते. काहीजणांना तर पूर्वी मरण पावलेल्या लोकांशी त्या क्षणी दिलखुलास बातचीत झाल्याचे आठवत होते.

अशाच स्वरूपाचा अभ्यास डॉ. रेमॉन्ड मुडी या डॉक्टरांनी केला आहे. त्यावर आधारित 'लाईफ आफ्टर डेथ' हे पुस्तक त्यांनी लिहिलंय. त्याच्या मते साऱ्या लोकांनी या शेवटच्या क्षणी अतीव

शांतता मिळाली आणि शरीराबाहेर पडून आपण तरंगू लागलो म्हणून सांगितले. पण डॉ. मुडी यांनी आणखीही एक गोष्ट मान्य केली आहे. त्यांच्या मते आपण केलेल्या संशोधनाला शास्त्रीय संशोधन म्हणता येणार नाही ! पण तरीही त्यांच्या मते हे संशोधन एवढे तरी नक्कीच सांगते की, माणसाच्या अस्तित्वाच्या वेगवेगळ्या पातळी असतात. अस्तित्वाचे वेगवेगळे प्रकार असतात. थोडक्यात हा विषय ज्यान्यावर गंभीरपणे संशोधन करावे, अशा योग्यतेचा ठरतो.

पण 'आयोवा' (Iowa) विद्यापीठातील मानसशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. रसेल नोयेस यांच्या मते वरील अभ्यास व त्याचे निष्कर्ष फार गंभीरपणे घेण्याचे काही कारण नाही. त्यांच्या मते, 'मृत्यूचा फार जवळून स्पर्श झालेले पण प्रत्यक्षात वैद्यकीय दृष्ट्या मरण न पावलेले लोक आणि वैद्यकीय दृष्ट्या मृत म्हणून जाहीर करून नंतर जिवंत झालेले लोक नेमकी एकाच प्रकारची भावना वा अनुभव व्यक्त करतात. म्हणजे होते काय, आपण मरणार असे वाटल्यावर—जिवंत राहण्याची सारी धडपड हताशपणे संपल्यावर—मरणाला सामोरे जाण्याची तुमचा मेंदू व तुमच्या शरीरातील साऱ्या पेशी एक तयारी करतात. हा एक मानसशास्त्रीय अनुभव आहे. फार मोठी मानसशास्त्रीय माहिती यातून मिळू शकेल. माणसाच्या मनाचा अभ्यास करावयास या माहितीचा उपयोग होईल. पण 'मृत्यूनंतरचे अस्तित्व' या विषयाचा अभ्यास करावयास मात्र या माहितीचा काही उपयोग नाही. याबाबत मानवी ज्ञानाची पाटी अजून कोरीच आहे. *

---

## मन करी रे प्रसन्न ....

---

मानवी मन हे अनेक अद्भुत शक्तींनी भरलेला एक प्रचंड खजिना आहे. मानवी मनाचा विचार करताना विज्ञान, अध्यात्म आणि मानसशास्त्रज्ञ सारेच जण या ना त्या भाषेत नेति नेति म्हणतात. मानवी मनाचा एखादा वरवरचा कोपरासुद्धा या सर्वांना अजून पुसटसाही समजलेला नाही. आपण लहानपणी वाचलेल्या एका गोष्टीतील ब्राह्मण कल्पवृक्षाखाली बसलेला असतो. आपणावर पुष्पवृष्टी होणार असे वाटले तर त्या गरीब ब्राह्मणाच्या अंगावर पुष्पवृष्टी होते. राक्षस येऊन आपणाला खाऊन जाणार असे त्याला वाटले तर राक्षस येऊन त्याला खाऊनही जातो ! विज्ञान म्हणते, मानवी मन या कल्पवृक्षासारखे आहे.

डगलॉस कॉलगीन यांनी सांगितलेली ही गोष्ट पाहा. १९६९ सालची गोष्ट. बावीस वर्षांची एक तरुणी फार घाबरलेल्या अवस्थेत बाल्टिमोर येथील प्रमुख रुग्णालयात गेली. डॉक्टरांनी तिची संपूर्ण तपासणी केली. तिला काहीही झालेले नव्हते. पण ती फार घाबरलेली होती. तिच्या गल्लीत राहणाऱ्या एका चेटकिणीने तिच्यावर काही करणी केलेली होती. ती मुलगी तेरा तारखेला—एका अशुभ तारखेला—जन्मलेली होती. त्याचवेळी तिच्याबरोबर जन्मलेल्या आणखी दोन मुलींना व तिला एका चेटकिणीने सांगितले होते की, तुम्ही अनुक्रमे १५, २१ आणि २३ व्या वर्षी मरण पावाल. त्यांतील पहिली मुलगी वयाच्या पंधराव्या वर्षी एका अपघातात मरण पावली होती. दुसरी मुलगी एकविसाव्या वर्षी एका दंगलीत गोळी लागून दगावली होती. आणि आता ह्या मुलीला दोन दिवसांनी तेविसावे वर्ष लागणार होते. डॉक्टरांनी तिची समजूत घातली आणि तिला रुग्णालयात दाखल केले. तिच्यावर दिवसरात्र देखरेख ठेवली. पण दोन दिवसांनी पहाटे ती मुलगी अंथरुणात मृतावस्थेत सापडली. तिच्या मृत्यूचे कोणतेही कारण डॉक्टरांना देता आले नाही.

या अशा अधूनमधून कानावर येणाऱ्या घटनांचा तपशीलवार अभ्यास प्रथम डॉ. वॉल्टर बी. कॅनुन यांनी केला. त्यावर आधारित चेटकिणीचे बळी (*Voodo death*) नावाचे एक पुस्तक लिहिले. आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यांनी म्हटलंय्, विज्ञानयुगात वावरणाऱ्या सुशिक्षित माणसांना ही सारी तशी बंडलबाजी वाटते. पण मानसिकदृष्ट्या मध्ययुगात वावरणाऱ्या लोकांच्यात या घटना खरोखरच घडताहेत. हे असे का घडते याचा शास्त्रीय अभ्यास आवश्यक आहे. याच पुस्तकात त्यांनी आणखी एक वेगळे उदाहरण दिलंय. चेटकिणीने आपणावर करणी केली आहे म्हणून धास्तावलेला एक आदिवासी ऑस्ट्रेलियात रॉकफेलर फाउंडेशनतर्फे काम करणाऱ्या एका डॉक्टरकडे गेला. तो डॉक्टर अधिक समंजस होता. त्यांनी त्या चेटूक करणाऱ्या माणसालाच तिथे बोलावून घेतले. त्याला जाम दम भरला. या माणसाला काहीही झाले तर उद्या तुझा खून करून तुझ्या घरादारावरून गाढवाचा नांगर फिरवू, असा सज्जड दम गावातील प्रतिष्ठित लोकांच्या समोर दिला. चेटकिणीने गयावया करून त्या माणसाची समजण्यात काही चूक झाली आहे म्हणून सांगितले. आपण उलट मंत्रटोणा करून असे काहीही होऊ देणार नाही, असे त्या आदिवासीला दादापुता करून समजावून दिले. आणि त्या आदिवासीला काहीसुद्धा झाले नाही.

डॉ. कॅनुन म्हणतात, याबाबत नक्की काय घडत असेल तर ते म्हणजे स्वत:च करून घेतलेला स्वत:चाच आत्मघात. स्वत:च्याच भावनांचा स्वत:च्या शरीरावर पडलेला पगडा. अतिशय उत्कटतेने खूप वेळ केलेल्या बऱ्यावाईट कल्पनांचा मानवी शरीरावर असा परिणाम होऊ शकतो. अशा काही भावना, प्राण्यांच्या शरीरात निर्माण करू शकतील अशा परिस्थितीत प्राण्यांना प्रयोगशाळेत ठेवून या गोष्टींचा पडताळा घेण्यात आलेला आहे. प्रत्यक्ष रणभूमीवर सैनिकांच्या शरीराचा अभ्यास केला तर हेच आढळून आलंय. तुम्ही फार घाबरलेले असाल वा तुमच्या भावनांचा तीव्र कोंडमारा होत असेल तर त्या क्षणी तुमच्या शरीरात ॲड्रिनिलीन (Adrenaline) थोडे अधिक तयार होते. तुमच्या रक्तवाहिन्या थोड्या आकुंचन पावतात. तुमच्या शरीराच्या निरनिराळ्या विभागांना होणारा रक्तपुरवठा थोडा अनियमित होतो. पर्यायाने त्या पेशींना प्राणवायू कमी मिळतो. याचा परिणाम जो व्हायचा तोच होतो.

कॅनुनच्या या पुस्तकानंतर आणखीही काही शास्त्रज्ञांनी या गोष्टीचा अधिक अभ्यास केलाय्. पेनिसिल्व्हानिया विद्यापीठातील डॉ. मार्टिन सेलिगमन यांनी या विषयावर 'मनोदौर्बल्य आणि मृत्यू' (Helplessness, depression development and death) या नावाचे एक पुस्तक लिहिलंय्. त्यांच्या मते हा मानसिक आजा-

राचा प्रकार चांगल्या सुशिक्षित आणि विज्ञानयुगाशी मिळतेजुळते घेतलेल्या लोकांच्या बाबतही घडतो. यात एखादी चेटकीण उद्‌भवत नाही तर तुम्ही भावनात्मकदृष्टचा ज्या व्यक्तीत फार गुंतलेले आहात, त्या व्यक्तीला तुमच्याबद्दल काय वाटते, ते तुमच्या प्रकृतीत प्रतिबिंबित होते. त्यांनी एक उदाहरण दिलंय्. तू आपले जुने घर विकलेस तर तुझा सर्वनाश होईल असे एका इंजिनीअरला त्याच्या आईने सांगितले होते. आणि घर विकल्यावर त्याला खरोखरच तसा अनुभव आला. झाले काय, मानसिक भावनांच्या ताणाखाली तो खरोखरच काही चुका करीत गेला. भविष्यावर फार विश्वास ठेवणाऱ्या लोकांच्या बाबत नेमके हेच घडते,

यापेक्षा आणखी वेगळे उदाहरण डॉ. विल्यम ए. ग्रिन यांनी सांगितले आहे. स्वतःच निर्माण केलेल्या कल्पनांचा स्वतःवर काय परिणाम होतो, हे त्यांनी दाखवून दिलंय. डॉ. विल्यम हे रॉचेस्टर विद्यापीठातील वैद्यकशास्त्राचे प्राध्यापक आहेत. अर्धांगाने बिछान्यावर खिळलेली नात्यातील एक बाई त्यांच्याकडे बारा वर्षे उपचारासाठी होती. स्वतःचा त्या वेळी दहा वर्षे वयाचा असलेला मुलगा लग्न करून संसाराला लागेपर्यंतच आपण जगणार आहोत, ही एकच गोष्ट ती बाई डॉक्टरांना पुन्हा पुन्हा ऐकवत असे. त्या बाईच्या प्रकृतीमधील चढउतार हा संपूर्णपणे तिच्या मुलाच्या आयुष्यात घडणाऱ्या बऱ्यावाईट घटनांच्यावर अवलंबून राहिला. आणि मुलाचे लग्न झाले. त्यानंतरही काही दिवसांत ती अचानकपणे मरणही पावली. ही अशी गोष्ट वाचताना आठवण होते ती महाराजांचा राज्याभिषेक पाहण्यासाठीच जन्माला आलेल्या आणि मुलाचा राज्याभिषेक होईपर्यंतच जिवंत राहिलेल्या जिजाबाईंची.

तुमच्या भावनेचा तुमच्या शरीरावर होणारा हा परिणाम काही लोकांच्या पुरताच मर्यादित आहे, असे शास्त्रज्ञांना आता वाटत नाही. जीवनाच्या एखाद्या-दुसऱ्या क्षेत्रातच हे घडते, असेही शास्त्रज्ञांना वाटत नाही. अगदी मधुमेहाने वा रक्तदाबाने आजारी असलेल्या लोकाना त्यांची नेहमीची औषधे न देता अगदी तशाच दिसणाऱ्या खोट्या गोळ्या (placebo tablets) देऊन बरे ठेवण्याचे शास्त्रीय प्रयोग यशस्वीपणे झालेत. कॅन्सरसारखा आज सर्वस्वी असाध्य वाटणारा रोग काही विशिष्ट व्यक्तिमत्त्वाच्या लोकांनाच अधिक प्रमाणात होतो, असे म्हणण्याकडे शास्त्रज्ञांचा कल आहे.

प्लॅस्बो टॅब्लेटस आणि कॅन्सरमागचे प्रमुख कारण याबाबतचे संशोधन अजून फार प्राथमिक स्वरूपात आहे हे खरे. पण तुमचे मन तुमच्या शरीरावर अनेक बरे-वाईट परिणाम करू शकते, हे मात्र विज्ञानाने आज मान्य केलेले आहे. तुम्ही मुळी नेहमी कल्पवृक्षाखालीच बसलेले असता. तुम्ही आपण दुःखी आहोत अशी स्वतःच्या मनाची समजूत करून घेतलीत तर कोणीही काहीही करून तुम्हाला आनंदी व निरोगी करू शकणार नाही. याउलट त्याच परिस्थितीत तुम्ही आनंदी आणि सुखी व निरोगी राहावयाचे ठरवलेत तर तर तुम्हाला कोणीही अडवू शकणार नाही. फक्त एक आठवडा एक साधी गोष्ट करा. सकाळी उठल्यापासून चेहऱ्यावर फक्त हास्यच ठेवणार, दिवसभर मनात आनंदी विचार आणणार आणि मी सुखात आणि मजेत आहे, अशी कल्पना करणार, असा संकल्प फक्त एक आठवडा पाळा. झालेला फरक तुम्हाला एका आठवड्यातच जाणवेल.

थोडक्यात काय, आधुनिक विज्ञान आणि आधुनिक मानसशास्त्र एवढेच सांगते की, ' मन करी रे प्रसन्न सर्व सुखाचे कारण ' म्हणून आवर्जून सांगणाऱ्या तुकारामांनी जे तीनशे वर्षांपूर्वी सांगितले होते, ते शंभर टक्के खरे आहे....आणि मानवी मनाबाबतचे आमचे ज्ञान अजून तुकारामाच्या एवढेच आहे ! □

## नृत्य करा आणि निरोगी बना....

आर. ए. थॉम यांनी ' डान्स मॅगझिनच्या ' डिसेंबर १९७५ च्या अंकात एक लेख लिहिलाय. शास्त्रशुद्ध व योग्य नृत्य दररोज थोडा वेळ केल्यास केवळ माणसाचे शरीरच तंदुरुस्त राहते असे नव्हे तर त्यामुळे अनेक दुखणी बरी होतात, मनाचा उल्हास वाढतो व इतर बऱ्याच गोष्टी होतात, असा त्यांचा दावा आहे. ते म्हणतात, ' बौद्धिक वाढ खुटलेल्या मुलांचा ' बुद्ध्यांक ' योग्य नृत्य केल्यास सुधारतो. दारू व सिगारेट यासारखी व्यसने या नाचामुळे सुटतात. योग्य नाचामुळे तुरुंगातील कैद्यांची वागणूक सुधारते. नाचात हे एवढे सामर्थ्य आहे म्हणून तर आदिमानवाने नाचाचे शास्त्र बनविले. अनेक रानटी जमातींनी त्याचे धर्मशास्त्र बनवून त्याचे जतन व संवर्धन केले.

आपल्या लेखात डॉ. थॉम पुढे म्हणतात, तुम्हाला याबाबत अधिक मोफत माहिती हवी असेल तर आमच्या संस्थेला डाक पत्र पाठवा.

आमचा पत्ता :

*American Dance Therapy Association. Inc.*
Suite 210, 1000 Century Plaza, Columbia,
Maryland.–21044, U. S. A.

औरंगाबादमधील प्रौढांसाठी असलेलं

# बालनाट्य शिबिर

सौ. दीपाली निरगुडकर

एक छोटासा हॉल–गोल करून निरनिराळ्या प्रकारची माणसं खाली बसली होती. अर्थात स्त्रियांचा सुद्धा समावेश होता. एक बाई अभिनयासहित आवाजाचे प्रकार समजावून सांगण्यात मग्न झाली होती. सगळ्यांचेच चेहरे उत्साहाने फुललेले दिसत होते. आपण काहीतरी करून दाखवू, असा भाव प्रत्येकांच्या चेहऱ्यावर दिसत होता. आणि बाईंना किती सांगू आणि किती नको असं झालं होतं. या बाई होत्या सौ. सुधा करमरकर.

हे बालनाट्य शिबीर २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबरपर्यंत औरंगाबादच्या सरस्वती शाळेत छोट्याशा हॉलमध्ये भरलं होतं. औरंगाबादमधील प्रौढांसाठी असलेलं बालनाट्य शिबिर हे पहिलंच होय. हे शिबिर म्हणजे नाटकाची आवड आणि जाण असणाऱ्यांना जणू एक पर्वणीच होती. याच्या संचालिका होत्या सौ. सुधा करमरकर. वास्तविक बालनाट्याला फारसा चांगला पूर्वेतिहास नाही. प्रौढगटासाठी वर्षातून अनेक नाटकं येतात, पण बालगटासाठी २ ते ३ नाटकांच्यावर येत नाहीत, ही खेदाची गोष्ट आहे. वास्तविक पाहता बालनाटकांतूनच सद्भिरुची असलेला प्रेक्षक पुढे प्रौढगटासाठी घडणार असतो. पण या गोष्टी कोणी विचारातच घेत नाही. एवढ्याचसाठी सुधाताई कंबर कसून उभ्या आहेत. प्रत्येक भागात बालनाट्याचा विकास व्हायला पाहिजे, म्हणून या वर्षी सोलापूर व औरंगाबाद येथे समाजकल्याण केंद्रामार्फत हे शिबिर भरवण्यात आलं.

औरंगाबादकरांना खऱ्या अर्थाने या क्षेत्रात पाऊल टाकून पुरी चार वर्षे झाली. श्री. कमलाकर सोनटक्के येथे आले व मराठवाडा विद्यापीठात नाट्यक्षेत्राचे नवे दालन उघडले. औरंगाबादमध्ये पूर्वी नाटकं बसत नव्हती असे नाही, ती बसत होती. स्पर्धेत पहिली पण येत होती. पण त्याचा सर्वांगीण अभ्यास नव्हता. पण आता प्रत्येक गोष्टीचा बारीकसारीक विचार करून नाटकं सादर केली जातात. जुनीच नाटकं नवा अर्थ घेऊन रंगभूमीवर येऊ लागली. याचे सर्व श्रेय एकमुखाने श्री. सोनटक्के यांनाच द्यावे लागेल. त्यांच्यासारखा सुज्ञ, जाणकार व गुणी कलावन्त औरंगाबादकरांना लाभला आहे. आजवर पुण्या–मुंबईच्या नाटकांवर तहान भागविणाऱ्या प्रेक्षकवर्गाला त्यांच्यामुळे मोलाचे काही नवे–जुने पाहावयास मिळत आहे.

ह्या शिबिराचा प्रमुख उद्देश म्हणजे प्रत्येक भागात बालनाट्याचा विकास होणे. म्हणून याचं शिक्षण प्रथम प्रौढांना देण्यात आलं. या शिबिराचं वैशिष्ट्य म्हणजे थेअरीपेक्षा प्रॅक्टिकलला जास्त प्राधान्य देण्यात आलं होतं. शिबिरामध्ये मार्गदर्शक म्हणून सौ. सुधा करमकर, श्रीधर राजगुरू, सौ. सुलभा देशपांडे आल्या होत्या. तिघेहीजण या क्षेत्रातले डोळस जाणकार. या लोकांचा त्या विषयातील सखोल अभ्यास पाहून शिबिरार्थी अवाक् झाले. यांच्या हाताखाली शिकणं यातच प्रत्येकाला अभिमान होता.

पहिल्या दिवसाचे संचालन सुधा करमरकर यांनी केले. ह्या क्षेत्रातील त्या अध्वर्यू! समोरच्या प्रेक्षकांच्या गळी आपली माहिती उतरलीच पाहिजे, हे त्यांचे मुख्य धोरण. गेली पंधरा वर्षे लिटिल थिएटर त्या मोठ्या दिमाखात चालवत आहेत. आतापर्यंत जादूचा वेल, अलिबाबा आणि चाळीस चोर, अल्लाद्दिन आणि जादूचा दिवा, निम्मा-शिम्मा राक्षस, सिंड्रेला आणि राजपुत्र अशी बरीच नाटकं लिटिल थिएटरतर्फे सादर करण्यात आली. प्रत्येक नाटकाचे अनेक प्रयोग झाले आहेत. बाल रंगभूमीशी एकनिष्ठ असलेल्या सुधाताईंनी बालनाट्य म्हणजे काय इथूनच सुरुवात केली. कमल-पुष्पवत बालमनं असतात. हळुवार, अनंत गूढ छटा असलेली, लवकर आकलन न होणारी. अशा गूढ मनाचा अभ्यास कसा करावयाचा हे त्यांनी सांगितले. बालनाट्य बसवताना काय काय अडचणी येतात, त्यावर कशी मात करायची, बालांना कुठल्या विषयात जास्त रस असतो, याचं सुंदरपणे वर्णन केले. त्याचप्रमाणे बालनाट्याचं वैशिष्ट्य म्हणजे नाटक हे बालकांसाठीच असलं पाहिजे. आवाजाचे प्रकार, इंप्रोव्हायझेशन, उदा. : आगगाडीमध्ये दोन व्यक्ती भेटतात. त्यांची पूर्वीची ओळख निघते. लग्नसमारंभ, मंडईतील गोंधळ, इसापनीतीतल्या गोष्टी सांगून त्यावर नाट्यीकरण करणे या सर्व गोष्टी होण्यापाठीमागे प्रमुख उद्देश म्हणजे कल्पना-शक्तीला वाव देणे. एवढंच नव्हे तर श्वास कसा घ्यायचा, स्टेजवर कसं उभं राहायचं, चालायचं कसं, अशा प्रकारच्या प्राथमिक गोष्टी पण शिकविल्या. प्रत्येक शिबिरार्थीकडून प्रत्येक गोष्ट त्यांनी करून घेतली.

श्रीधर राजगुरू हे प्रख्यात थिएटर अॅकेडमीचे नेपथ्यकार. यांनी स्टेजचे किती प्रकार पडतात, पडद्याचे प्रकार किती पडतात, प्रकाशयोजना कशी करावी, हे सांगितले. स्टेजवर एका खेड्यातल्या घराचा सीन उभा करायचा असेल तर काय काय गोष्टी कराव्या लागतील, एका शिक्षिकेची खोली उभी करायची असेल तर काय करावे लागेल. आणि मुख्य गोष्ट म्हणजे स्टेजवर वास्तवतेचा आभास जरूर निर्माण करायचा, पण जास्त फापटपसारा नको. स्टेजवरील प्रत्येक वस्तूचा उपयोग करून घेतला पाहिजे. नुसतं नेपथ्यच चांगलं असून चालत नाही, तर वेशभूषा, प्रकाशयोजना आणि संगीत या सर्वच गोष्टी चांगल्या असल्याशिवाय नाटकाचं निर्मितिमूल्य वाढू शकत नाही. ह्या सर्व गोष्टी एकमेकांना परस्परपूरक आहेत.

शेवटी आल्या सौ. सुलभा देशपांडे. सुलभाताईंनी बालनाट्य बसवताना पहिल्यांदा काय केलं पाहिजे ते सांगितले. एक गोल करून बसायचं. पहिल्या मुलाने एक action करायची. दुसऱ्या मुलाने पहिल्या मुलाची व स्वतःची action

करायची. शेवटच्या मुलाने स्वतःची आणि सर्वांच्या action करायच्या. याने एक महत्त्वाचा फायदा म्हणजे मुलांची स्मरणशक्ती वाढते. इंप्रेशनमध्ये खाली गरम विस्तव आहे तर एखादी गोष्ट कशी वितळत जाईल, डोक्यावर बर्फ ठेवला तर तो माणूस कसा गोठून जाईल, बाटलीतील राक्षस झाकण उघडल्यावर कसा बाहेर येईल, खेळण्यातल्या बाहुल्या किल्ल्या दिल्यावर कशा नाचतात, कशा डोलतात, दोन व्यक्तींना समोरासमोर उभं करून एका व्यक्तीने समोरच्या व्यक्तीने केलेली कृती उलटी करायची. म्हणजेच समोर आरसा आहे, असं गृहीत धरायचं. त्याचप्रमाणे एक शब्द किंवा एक वाक्य द्यायचं, त्यावरून पाच ते सात मिनिटं बोलायला सांगायचं. यामुळे शब्दभांडार वाढू शकेल. लहान मुलांना आवडतील, अशा गोष्टी सांगून आपला उद्देश सफल करायचा. या सर्व गोष्टींमुळे बालकांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळतो.

या सात दिवसांच्या शिबिरात बालनाट्यमहोत्सव सादर करण्यात आला. यामध्ये रॉबिनहुड, आला अडाण्याचा गाडा, सिन्ड्रेला आणि राजपुत्र ही बालनाट्यं दाखविण्यात आली. नाटकाला बालक व पालक यांचा चांगला प्रतिसाद होता.

असं हे शिबिर सात दिवस चाललेलं. हे सात दिवस कसे संपले ते कळलंच नाही. सर्वांचे चेहरे आनंदाने फुलून आले होते. या शिबिराने औरंगाबादकरांना निश्चितपणे नवी दिशा मिळाली. सर्व शिबिरार्थींनी पुढच्या वर्षी बालनाट्य स्वतंत्रपणे सादर करण्याची हमी सुधाताईंना दिली आहे. सोनटक्केसरांनी यापूर्वी औरंगाबादकरांना प्रौढ नाटकांसाठी नवी दिशा दिली, तर सुधाताईंनी या शिबिरातून बालनाट्यांसाठी नवी दिशा दिली. □

---

**मुक्काम मुंबई**

## चौऱ्याऐंशीचा फेरा

### बहुरूपीचा उलटा प्रवास

मंगळवार, सोळा नोव्हेंबर १९७६, राज्य नाट्यस्पर्धेचा पहिला दिवस. रवींद्र नाट्य मंदिरात हळूहळू प्रेक्षकांची गर्दी. सगळेचजण 'बहुरूपी' जुलूसनंतर यंदा काय चमत्कार करणार यासाठी उत्सुक. यामध्ये अनेक साहित्य, नाट्य–सिने आदी क्षेत्रांतील नामवंतांची बहुरूपीचे कर्तृत्व पाहायला हजेरी.

'जुलूस' बहुरूपीची प्रायोगिक रंगभूमीस बहुमोल देणगी ठरली. गतसाली स्पर्धेच्या बाद फेरीतच गाळले गेलेले पण तरीही स्पर्धेतील इतर अनेक नाटकांपेक्षा उचलून धरले गेलेले, जुलूस. जुलूसची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढतच गेली. इतकी की अंतिम फेरीत पहिले–दुसरे क्रमांक पटकावणारी नावेसुद्धा लोक विसरले. जुलूसने तयार केलेल्या अशा या हवेत सारेजण पालापाचोळ्यासारखे उडणार, हा बऱ्याचजणांचा तर्क.

पण–

बहुरूपीने यंदा 'चौऱ्याऐंशीचा फेरा' हा फार्स सादर करून साऱ्यांच्या आशा–तर्कअपेक्षा पार धुळीत मिळवल्या. फार्स म्हटला की, एकाहून एक चढत्या प्रसंगाने प्रेक्षक सतत हास्यरसात डुंबणार ही खात्री; परंतु या दोन अंकी फार्समध्ये प्रेक्षकांना हसून हसून पोट दुखले ही 'तक्रार' करायला संधीच मिळाली नाही. कित्येक वेळा एखादे गंभीर रहस्यप्रधान नाटक आपण पाहतो आहोत, असेच वाटत होते. अर्थात थोडासा दोष लेखकाचा व बराचसा दोष दिग्दर्शकाचा आहे. वास्तविक एका वृद्ध स्त्रीचे एकेकाळी ज्याच्यावर प्रेम केले त्याच्याबरोबरचे वागणे हा प्रसंगच किती गंमतीचा, परंतु नेमक्या तिथेच प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर एक स्मिताची रेषासुद्धा उमटणे कठीण झाले.

लेखक वसंत माने यांचे लेखन काहीसे विस्कळीत व पुरेसे हसे निर्माण करण्यात अयशस्वी झाले आहे. त्याचप्रमाणे दिग्दर्शक हेमचंद्र अधिकारी हेसुद्धा नाटक गतिमान ठेवू शकले नाहीत. कदाचित नाटकात स्वतःकडे इतकी मोठी भूमिका घेतल्यामुळे दिग्दर्शनात ते कमी पडले आहेत. यातील भूमिकांबद्दल बोलायचे झाल्यास अजित केळकर (बाबू), शिरीष कर्णिक (नानाभाई), हेमचंद्र अधिकारी (मोटाभाई) यांना फार्सची जाणीव आहे हे जाणवत होते. त्यांना नंदकुमार घाणेकर (माणेकजी) यांनी योग्य साथ दिली. परंतु बाकी इतरांविषयी काही बोलूच नये अशी स्थिती.

तर असा हा 'चौऱ्याऐंशीचा फेरा.' बहुरूपीचा उलटा प्रवास. वास्तविक जुलूसच्या यशानंतर बहुरूपीने नाटकाच्या निवडीबाबत अधिक काळजी घ्यायला हवी होती. कारण आता जुलूसचे यश हे सर्वस्वी अमोल पालेकरांचे कर्तृत्व असाच निष्कर्ष काढायचा मोह होतो.

'हे नाटक गणेशोत्सव मंडळाच्या स्पर्धेतही अंतिम फेरीत पोचू शकणार नाही,' ही एका प्रेक्षकाची प्रतिक्रिया कदाचित अतिशयोक्ती ठरेल, तरीसुद्धा बहुरूपीने त्याकडे दुर्लक्ष करणे मात्र अयोग्यच ठरेल.

–सुहास फडके

---

**हिंदी चित्रपट**

## जिनी और जॉनी

### वेगळ्या ढंगाचे फर्मास मनोरंजन

निवृत्त कधी व्हावं हे एरवीच आधी फार थोड्या लोकांना कळतं. त्यातून चित्रपटसृष्टीत तर, आपली निवृत्तीची वेळ आली आहे, हे अनेक तारेतारकांच्या लक्षात तरी येत नाही, किंवा लक्षात येऊनही तिकडे सोयीस्करपणे डोळेझाक केली जाते. मेहमूद कॉमेडियन झाला तरी 'स्टार्स'मध्येच जमा होणारा, पण त्याला मात्र आपल्या निवृत्तीची वेळ कळायला फारसा उशीर झाला नाही, असं म्हटलं पाहिजे. जवळजवळ वर्षभराहूनही अधिक काळ तो मुंबई सोडून बंगलोरच्या आपल्या फार्मवर निवृत्तिसदृश स्थितीत राहातोय आणि प्रामुख्यानं स्वनिर्मित चित्रपटांतच कामं करतोय. या निवृत्तीपूर्वीच्या त्याच्या, इतरांच्या व्यावसायिक चित्रपटांतल्या भूमिका इतक्या कलाहीन आणि अभिनयाचा तोचतोचपणा घटविणाऱ्या होत्या की, या गाजलेल्या विनोदी अभि-

नेत्याची प्रतिभा संपली की काय, असाच भास व्हावा. आता मात्र त्याचे चित्रपट बऱ्यापैकी पाहवतात. आणि मेहमूद संपला नसून नव्यानं सुरू झाला असल्याचं जाणवतं.

मेहमूद नव्यानं सुरू झालाय असं मी म्हणतो ते या अर्थानं की, आता तो पडद्यावर पाहायला मिळतो, तो प्रमुख भूमिकेत. पूर्वीप्रमाणं चव आणण्यापुरता विनोदी मसाला म्हणून दुय्यम-तिय्यम भूमिकेत नव्हे. आणि दुसरं; प्रमुख अभिनेत्याबरोबर निर्माता-दिग्दर्शकाची जबाबदारीही तो पार पाडतोय. या दृष्टीनं त्याचे सगळयात अलीकडचे तीन चित्रपट-कुंवारा बाप, सबसे बड़ा रुपय्या आणि जिनी और जॉनी-महत्त्वाचे ठरतील. एक तर हे चित्रपट मेहमूदच्या किंवा इतरांच्या रूढ चाकोरीबाहेर जाऊ पाहाणारे आहेत. विशेषत: जिनी और जॉनी हा ताजा चित्रपट तर आधीच्या दोघांच्याही पुढचं पाऊल ठरेल. 'सबसे बड़ा रुपय्या'मधली मेहमूदची भूमिका ही 'कॉमेडियन कम् व्हिलन' अशा स्वरूपाची होती, तर 'कुंवारा बाप' या चित्रपटाला प्रसिद्धी भलत्याच कारणासाठी मिळाली असली तरी-मधल्या त्याच्या भूमिकेचा तोंडवळा बहुश: गंभीर, शोकात्मक होता. 'जिनी और जॉनी'मधला त्याचा रोल हाही विनोद आणि माफक गुन्हेगारी यांचं बेमालूम मिश्रण आहे. तिन्ही चित्रपटांत त्यानं पारंपरिक प्रेमकरणं निदान स्वत:च्या संदर्भात शक्य असूनही आळवलेली नाहीत; आणि तिन्ही चित्रांत त्याला मध्यवर्ती महत्त्व असलं, तरी त्याच्या कथांमध्येच व्यक्तिचित्रांना महत्त्व येत असल्यानं तो कथेवरचा अत्याचार ठरत नाही. अशा स्थितीत 'जिनी और जॉनी'वर 'मेहमूदी ढंगाची / छापाची करमणूक' अशा शिक्का मारणं फारसं न्यायाचं नाही, असं मला वाटतं.

याच सिनेमाविषयी बोलायचं झालं, तर त्याच्या नावापासूनच त्यामध्ये जिनी आणि जॉनी या दोन व्यक्तिरेखांना, त्यांच्या स्वभावचित्रणाला आणि या दोघा ठकांची गाठ पडल्यामुळे घडत जाणाऱ्या घटनाक्रमाला महत्त्व आलेलं आहे. जिनी ही एका वेश्येची छोटी गोड पोरगी. आईच्या अ'.नक अपघाती निधनामुळे ती अनाथ होते. पण खरं तर या अष्टपैलू महाठक मुलीला पालकाची गरज नसतेच. तिला उटीला तिच्या मावशीकडे नेऊन पोहोचविण्याचं काम ज्या जॉनीकडे येतं, तो तिच्या नावावर दहा हजार रुपये घेऊन लंपास करतो, आणि मग ते वसूल करण्यासाठी त्याचा पिच्छा पुरवताना ही मुलगी ज्या युक्त्या आणि भानगडी करते, त्याचं थोडंफार योग्य वर्णन 'अफलातून' याच एका विशेषणानं होण्यासारखं आहे. एकमेकांना आणि लोकांना बनवीत चालू झालेला हा प्रवास संपतो तेव्हा जॉनी आणि जिनी यांच्यात बापलेकीचा अतूट जिव्हाळा निर्माण झालेला असतो.

जिनीच्या भूमिकेत मेहमूदनं स्वत:च्याच छोटया मुलीला-जिनीला-सादर केलेलं आहे आणि तिनंही पडद्यावरच्या प्रथम पदार्पणातच खुद्द पिताजींना बनेलपणात मागं टाकलेलं आहे. गोड निष्पाप चेहरा आणि महाडँबीस डोकं लाभलेल्या या जिनीच्या भूमिकेनं सबंध चित्रपटातच जान आणली आहे. मेहमूदच्या डोक्यातून निघालेल्या काही सुरेख 'कॉमिक पँचेस्'मध्ये तिनं उघडच त्याच्यावर ताण केली आहे. 'मेहमूदनं तिला छान साथ दिली आहे,' असं म्हणायला लागावं यातच बरंच काही आलं. दिग्दर्शक म्हणूनही मेहमूदनं समाधानकारक कामगिरी बजावली आहे. मात्र चित्रपटाचा वेग, फँटसीला शोभावा तितका त्याला ठेवता आलेला नाही आणि त्यामुळे मात्र क्वचित कंटाळा येतो. मात्र अभिनेता आणि दिग्दर्शक या दोन्ही नात्यांनी त्यानं स्वत:वर ठेवलेला संयमी तावा अभिनंदनीय. निर्माता म्हणूनही त्यानं चोख कामगिरी बजावली आहे, हे चित्रातली 'गेस्ट स्टार्स'ची नामावली पाहिल्यावर जाणवतं. हेलननं मात्र अभिनयाची बऱ्यापैकी संधी देणाऱ्या एका भूमिकेला फारसा न्याय दिलेला नाही. अशीच एक संधी संगीतकार राजेश रोशननं दवडली आहे. दोन गाणी बरी आहेत, एवढंच. निखळ विनोदी चित्रपटाची 'टेस्ट' असणाऱ्यांना (ही) आवडावा, इतपत जिनी और जॉनीचा बेत जमलाय हे निश्चित.

---

प्रसन्न करणारी प्रेमकविता

# फ्रेन्डस्

'फ्रेन्डस्' नावाची एक विलक्षण नाजुक प्रेमकविता पुण्यात वेस्टएन्डला नुकतीच लागून गेली.

अक्षरश: भावकविता. निसर्गाच्या कॅनव्हासवर चितारलेली आणि वेडावून टाकण्याइतकी मोहक.

मुंबईतही ती खूप गाजली म्हणे. कमाल आहे.

*

गोष्ट काही अगदी परग्रहावरची नवीकोरी होती असं नव्हे. सरळ टीनएजर्स लव्ह स्टोरी. टीनएजर्स म्हणणंही थोडं जड जावं. पंधरा वर्षांचा पॉल हॅरिसन. त्याच्यापेक्षा एखाद्या वर्षानं लहानच असेलशी मिशेल.

अगदी रिॲलिझमचा पदर धरून वाटचाल होती असंही नाही. दोघांचीही 'एस्केप' तशी फँटसीमध्ये शोभावी अशीच. पलायनवादात जमा व्हावी अशीच.

वडील वारल्यानं जवळजवळ अनाथ झालेली मिशेल (ॲनिस ॲल्व्हिना) आणि सधनता असूनही वडील दुर्लक्ष करीत असल्यामुळं चिडचिडलेला पॉल (सीन बरी). एका 'झू'मध्ये सहज दोस्ती आणि एके दिवशी गाडीतनं हिंडत असताना किरकोळ अपघात. वडिलांची आवडती मोटर आपल्या हातनं तळयात पडली म्हणून बावरलेला पॉल, कसलेच पाश न उरलेल्या मिशेलबरोबर सहज एक दिवसापुरता राहायला जातो. *

'फ्रेन्डस्'मधली 'दोस्ती' तसं म्हटलं तर इथं संपते. पण तरीही खरी कविता मात्र इथंच सुरू होते. एक-दोन दिवसांच्या ट्रीपसाठी बाहेर पडलेले हे दोन दोस्त एकमेकांच्या नकळतच कायमचे जीवनसाथी बनतात. कमालीच्या निरागसपणे एकत्र येतात. व्यवहार सुटत नाही कुणालाच, पण नातं तुटत नाही.

किती सहज ती गृहिणीची भूमिका

स्वीकारते. वयाला शोभणारा अल्लडपणा आणि भूमिकेला शोभणारा समंजसपणा यांचं खरं नैसर्गिक मिश्रण.

तो कमवायला बाहेर पडतो. एकमेकांची सुखदुःखं जाणून वाटून घ्यायची ती सगळ्या लेव्हल्सवर–अगदी त्यानं कसे तरी मिळवलेले तीनच मासेसुद्धा एकमेकांना आग्रहानं देऊन सारखे वाटून खाईपर्यंत. *

मातीला पाय टेकल्यानंतर अॅडॅम-ईव्ह-लाच शक्य झालं असेल असं–इतकं निसर्गाशी एकजीव झालेलं सहजीवन. बाकीच्या जगाला सुरक्षित अंतरावर ठेवून.

साहजिकच निसर्गाचा प्रसाद.

मूल. तिचं-त्याचं. त्या दोघांच्या एकमेकात मिसळलेल्या ज्योतीतून पेटलेली ज्योत. तिच्याच शब्दात– 'The most wonderful thing that ever happened to me!' त्या natural poetic fantasy मध्ये जुळावा इतक्या नैसर्गिक सहजतेनं पण माणसाच्या जातीच्या लयविलयाच्या मुळाशी असणाऱ्या सनातन कुतूहल–अगत्यानं; त्याचा स्वीकार, रूढार्थानं पतिपत्नी नसलेले हे दोघे मित्र करतात.

हे नवनिर्माण आणि त्याचं स्वागत हा फ्रेंड्स्मधल्या कवितेचा एक आत्मा आहे. 'एक' आत्मा. *

कविता इथं अशी संपते...

त्या दोघांचं ते कौतुक काही महिने वयाचं झालेलं.

पोलिसांच्या मदतीनं त्याच्या सतत शोधात असलेले त्याचे वडील त्याच्या कामाच्या ठिकाणी त्याची वाट पाहताहेत. त्याला परत नेण्यासाठी.

याची कल्पना नसलेला तो कामावर निघताना तिचा आणि त्या नव्या कौतुकाचा निरोप घेतोय.

दोघेही मागे वळून पाहत राहतात. निरोपाचे हात हलत राहतात.

इथं सिनेमा संपवलाय.

पुढं काय what then ततः किम् वगैरे. कुणास ठाऊक. *

लेविस गिलबर्ट या प्रतिभावंत दिग्दर्शकानं या हळुवार भावकाव्याला देखणा चित्रसाज चढवलाय. फॅंटसी, पोएट्री आणि रिॲलिटी या तिघांचा मिलाफ असलेली जी बेहतरीन शैली त्यानं योजलीय, त्यात त्याचं आणि त्याच्या कलाकृतीचं यश आहे. गंमत म्हणजे कथेचा बाजबैठक काव्यमय आहे आणि ट्रीटमेंटमध्ये मात्र रिॲलिझमला थोडं झुकतं माप दिलंय. कदाचित म्हणूनच फ्रेन्डससारखी कविता तुमची–माझी नाही, हे समजत असलं तरी उमजत नाही. 'My father is a silly bastard' असं संतापून म्हणणारा पॉल स्वतः किती सहजतेनं आणि तरीही किती उत्कटतेनं 'डॅडी'च्या कपड्यात शिरतो, त्याचं चित्रण पाहिलं की, गिल्बर्टच्या दुहेरी–तिहेरी हाताळणीचं मर्म, गवसतं. म्युझिक डिरेक्टर जॉन एल्टन आणि डिरेक्टर ऑफ फोटोग्राफी यांच्या सुरेल आणि सुखद कामगिरीची जोडही त्याला मिळालीय.

कविता दृश्यसाकार करण्यात यांचा वाटा मोठा. *

पण फ्रेन्ड्स्मधली प्रेमकविता तशी सबंध चित्रातच भरून राहिलीय्. अगदी लहान-सहान कडव्यात– ओळीतसुद्धा.

ती प्रसूत होते आणि वेदनाइतक्याच दाटलेल्या उत्कंठेनं विचारते, 'Is he a boy?' आणि नव्या जिवाच्या थरारक साक्षात्कारानं भारावून– आणि भांवावूनही– गेलेला तो घाईनं कुजबुजल्यासारखा उत्तरतो, 'He is a girl.'

किंवा ती त्याला उत्साहानं सांगते, 'इथं आम्ही पूर्वी राहायचो. तेव्हा माझे वडील चित्र काढायचे.' आणि त्याचा शेरा– 'I hope my father would have done something useful.'

त्या दोघांच्या सहजीवनाच्या पहिल्या–दुसऱ्याच दिवशी ती त्याला 'तुला कुठलं काम जमेल', असं विचारते. तो सांगतो, 'Nothing. I am educated.' आणि मग तिचा टोला, 'Seems I will have to uneducate you a little.'

मूल होणार म्हटल्यावर दोघाची धांदल. मग तो शहरातल्या दुकानातून चक्क एक पुस्तक विकत आणतो– 'A Baby Is Born.' मग शहरातल्या चौकात, हॉटेलात स्टेडियममध्ये, सगळीकडे त्या पुस्तकाचा अभ्यास सुरू होतो. मग नव्या प्रवाशाना गाईड एकीकडे एखादी इमारत उभी करायला सात वर्षं लागल्याची माहिती पुरवीत असतो आणि शेजारीच या दोघांची सातव्या महिन्यातल्या गर्भावर चर्चा सुरू असते. ती दोघं आपलं लग्न साजरं करतात किंवा आपल्या मुलाचं बारसं करतात तेही असंच. जगाला विसरून जाऊन पूर्णपणे.

किंवा तो बुलफाइटचा प्रसंग.

किंवा त्यांच्या मुक्त आयुष्याची निसर्गाशी, ऋतूंशी अखंड घातलेली सांगड. विशेषतः किनाऱ्यावर उधळणारे ते देखणे शुभ्रपांढरे घोडे. त्यांच्या आणि या दोघांच्या आयुष्य-क्रमात पडलेला फरक.

किंवा ती दोघं टबमध्ये आंघोळ करतात तो सुरुवातीचा प्रकार. आकर्षण आणि संकोच, ओढ आणि संयम यांचा त्यावेळी सुखवणारा लपंडाव.

Poetry. Wonderful poetry.

हृदय आभाळात तरंगलं तरी पाय मातीला टेकणारी कविता आणि म्हणूनच फ्रेंड्स्मध्ये ढगापासून धुळीपर्यंत अखंड पसरलेली. *

सीन बरी आणि ॲनिस ॲल्व्हिना.

या कवितेला साजावी अशी 'पेअर. सहजसुंदर आणि प्राकृतिक मनमोकळा अभिनय. चेहरे उसे चॉकलेटी वगैरे नव्हेत; तरीही.

विशेषतः भावदर्शन, अपेक्षित वयाला पूर्णतः जुळणारं. एकंदर प्रभावात मात्र ती त्याला कितीतरी मागे टाकते. *

मैत्री. प्रेम. आणि प्रेमाचा अविभाज्य उत्तर भाग ठरलेली शारीरिक भूक. काय खरं? कदाचित तीनही.

'फ्रेन्ड्स्'मध्ये बहुधा प्रेम हा शब्दच वापरलेला नाही. टीनएजर्स लव्ह स्टोरी म्हटल्यावर वासनेचा महापूर पाहायला मिळेल, अशा अपेक्षेनं आलेले प्रेक्षक तिथंच फसतात.

त्या दोघांच्या मैत्रीला शरीरसंबंधाचा पैलू नाहीच असं कसं होईल? पण त्याच्या सहजीवनाचा, दोस्तीचा पाया तो नव्हे. हेतू तो नव्हे. तो अगदी सहज, निसर्गतः उद्भवलेला एक पैलू आहे, बस्, एवढंच. त्यामुळे त्याचं कुठल्याही प्रकारचं स्तोम माजवलेलं नाही. प्रदर्शनाचंही नाही, संयमाचंही नाही.

सहज मारलेल्या हरिणापोटी कस्तुरीही निघावी तसं काहीसं. *

आणि फ्रेन्ड्स्चा शेवट?

कलात्मक अपूर्णता? शोकान्ताची सूचना? कुणास ठाऊक.

कविता शेवटच्या पूर्णविरामापर्यंत वाचली तरच उपभोगता येते, असंच काही नाही.

आणि इतक्या प्रसन्न कवितेचं तर तसं मुळीच नाही.

—शिरीष सहस्रबुद्धे

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## २७।११।७६ ते ३।१२।७६

**मेष** : जमिनीचा लाभ

राशिस्वामी मंगळ हा या आठवड्यात तुम्हाला वरदानच ठरणार आहे. वाहन विकत घेण्यासारखी जर तुमची परिस्थिती असेल तर यावेळी तुम्ही ते अवश्य घेऊ शकाल. तुमची स्वतःची जमीन असेल तर त्याकडे तुमचे मन आकृष्ट होईल. जर तुमची जमीन नसेल तर तुम्हाला जमीन मिळणार आहे. शेती व इंजिनीयरिंग उद्योगाशी संबंधित असा एखादा धंदा तुम्ही सुरू करू शकाल. भांडवल अगर इतर कोणत्याही अडचणी येणार नाहीत. नोकरीच्या दृष्टीने कामाचा ताण अजून तरी काही काळ राहणार आहे. शुभ दिनांक २९–३०.

महिलांना : चालू नोकरीत अनुकूल बदल घडेल. प्रमोशनचा योग आहे.

विद्यार्थ्यांना : प्रवासाचा हेतू पुरा होईल.

**वृषभ** : महत्त्वाच्या घटना

अनेक महत्त्वपूर्ण घटना या आठवड्यात घडणार आहेत. अंतरिक्षातील रवी-मंगळासारखे सामर्थ्यवान ग्रह तुम्हाला अनुकूल आहेत. त्यामुळे यावेळी जे मनात आणाल ते यशस्वी करण्याइतके असामान्य सामर्थ्य तुम्हाला प्राप्त होणार आहे. आर्थिक उलाढाल बऱ्याच मोठ्या प्रमाणात होणार आहे. पैशाची टंचाई आता कमी कमी होत आहे, याचा प्रत्यय याच आठवड्यात तुम्हाला येणार आहे. धंद्याच्या वाढीसाठी पैशाचे जे प्रयत्न कराल त्यात मोठे यश मिळणार आहे. नोकरीत एकंदरीत अनुकूलता राहील. वरिष्ठांच्या कलाने वागल्यास अनेक चांगल्या संधीचा लाभ होईल. शुभ दिनांक २७–३०.

महिलांना : अनेक दिवस रंगविलेली स्वप्ने साकार होण्याची चिन्हे दिसू लागतील.

विद्यार्थ्यांना : चांगल्या गुणांना प्रसिद्धी मिळेल.

**मिथुन** : सांसारिक ताण

हा आठवडा आपणास प्रतिकूल जाणार नाही. गुरू बारावा आहे याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. मन आणि विचार या दोन्ही बाबतीत काळजी घेतल्यास कोणताच त्रास होणार नाही. मात्र रवी-मंगळ सहावे शत्रूस्थानी आहेत, ते तुमच्या प्रगतीच्या आड येणारा विरोध मोडून काढतील. तब्येतीला जपणे जरूर आहे. धंद्यात प्रगतीची नवी क्षेत्रे उपलब्ध होतील. भागीदारीत व्यवसाय करावयाला हरकत नाही. व्यापारात नियमाचे पालन करून धाडस करा. लेखक म्हणून नाव मिळेल. नोकरीत कामाचा ताण पडेल. शुभ दिनांक २७–२९.

महिलांना : सांसारिक ताण सहन करावा लागेल. मात्र पैसा मिळेल.

विद्यार्थ्यांना : संशोधनाचे तंत्र हस्तगत होईल.

**कर्क** : अपेक्षित बदल

चंद्राबरोबर शनी आहे, याची दखल न घेऊन चालणार नाही. साडेसाती आहे व त्या साडेसातीचे काही परिणाम माणसाला भोगावे लागतातच. त्यातून तुमची सुटका तूर्त तरी होणे नाही. तरी पण रवी-मंगळाचे तुम्हाला भरपूर सहकार्य आहे व त्यांचा तुम्हाला फायदा देखील होणार आहे नोकरीत बदल होण्याचा संभव आहे. खात्यात बदल होईल किंवा कामात बदल होईल. हा बदल आगामी आशाआकांक्षा प्रफुल्लित करण्याच्या दृष्टीने अनुकूल आहे. चालू धंद्यात आता अडचणी नाहीत. सार्वजनिक कामात तुम्हाला विरोध फारसा जाणवणार नाही. आर्थिक परिस्थितीत लक्षणीय सुधारणा होईल. शुभ दिनांक २८–३०.

महिलांना : व्यापारात फायदा होईल. स्वतंत्र धंदा सुरू करा.

विद्यार्थ्यांना : परीक्षेत जास्त काळजी घेणे आवश्यक आहे.

**सिंह** : अडचणींवर मात

बारावा शनी असला तरी त्याची तुम्ही आता अजीबात फिकीर करू नका. साडेसातीने तुमच्या प्रगतीच्या मार्गात आजवर खूपच अडथळे आणले असले तरी ते यापुढे फारसे राहणार नाहीत. राशिस्वामी रवी अनुकूल आहे. तो तुमच्यासाठी नवे काम निर्माण करणार आहे. त्यामुळे तुमची प्रतिष्ठा तर वाढेलच, पण लोकप्रियता कमालीची मिळेल. तुम्ही आता विरोधकांचे डावपेच त्यांच्यावरच उलटवू शकाल. जे लोक कारवाया करीत होते, त्यांची आता गंभीरपणे दखल घ्या. तुमचा प्रभाव सर्वच क्षेत्रांत जाणवणार आहे. नोकरीत खास अधिकार वाढतील. शुभदिनांक २९–३०

महिलांना : चालू नोकरीत पगारवाढ व अपेक्षित बदली होईल.

विद्यार्थ्यांना : नवे संशोधनात्मक तंत्र आयुष्यात येईल.

**कन्या** : भावनेचा पगडा

तुम्ही कोणत्या ना कोणत्या दडपणाखाली काम करता. तुम्ही लोकांत अतिशय प्रिय असता, पण हे दडपण तुम्ही झुगारून दिले तर या आठवड्यात तुमच्याकडून बरेच काही नवे घडू शकेल. नोकरीधंद्याची परिस्थिती समाधानकारक राहील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी संपादन करण्याचे तंत्र तुम्हाला आत्मसात होईल. प्रत्येक मागण्याच्या बाबतीत सहानुभूती मिळेल. काही अनुकूल विचार होईल. दुय्यम धंद्याची परिस्थिती सुधारेल. तब्येत ऐकंदरीत थोडीफार नरमगरम राहील. मात्र मन उत्साही राहील. कौटुंबिक संबंधात थोडाफार अनुकूल बदल जाणवेल. शुभदिनांक २७–३०.

महिलांना : कामाचा ताण कमी होईल. काही नवे वातावरण निर्माण होईल.

विद्यार्थ्यांना : आशाअपेक्षा सफल होऊ लागतील.

**तूळ** : व्याप वाढेल

सध्या तुमची रास सर्वांत महत्त्वाची ठरत आहे. राहू-हर्शलने तुमची प्रतिष्ठा उंचावर ठेवली आहे. सध्या रवी-मंगळ अनुकूल आहेतच. म्हणूनच तुमचा सार्वजनिक कामाविषयीचा व्याप वाढणार आहे. गर्दी ही तुमचे वैभवच आहे. नोकरीत नवे क्षेत्र व नवे काम तुमच्याकडे सोपविण्याची शक्यता आहे. तुमचे महत्त्व फार फार वाढणार असून, तुमचा वरिष्ठांवर प्रभाव पडणार आहे. एखादी योजना कार्यान्वित करण्याची जबाबदारी तुमच्यावर टाकण्यात येईल. स्वतःचा धंदा-

देखील तुम्ही सुरू करू शकता. अनुकूलता आहे. तब्येत थोडीफार नाराजीची राहिली तरी त्याचा प्रत्यक्ष कामावर परिणाम होणे नाही. शुभदिनाक ३०–१

महिलांना : कलाक्षेत्रात अचानक तुमचे नाव गाजणार आहे.

विद्यार्थ्यांना : चैनीच्या वृत्तीला आळा घालावा लागेल.

**वृश्चिक :** नोकरीत चांगला

आर्थिक बाजू असावी तेवढी सबळ नाही, याची खंत मनात बाळगून बसू नका. बचत झाली नाही तरी गरजेपुरता पैसा तुम्हाला सहज मिळत राहणार आहे. त्यामुळे प्रतिष्ठेवर परिणाम होण्यासारखे काही घडणार नाही. हा आठवडा नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरावा, प्रमोशन मिळण्याची व आजवर उराशी बाळगलेले स्वप्न साकार होण्याची शक्यता यावेळी निर्माण होऊ शकेल. तुमचे प्रयत्न यावेळी तरी वाया जाणार नाहीत. तुमच्यापैकी ज्याच्यावर सध्या बेकारीची कुऱ्हाड आहे, ते लोक या वेळी भाग्यवान ठरणार आहेत. त्याना नोकरी मिळून कामदेखील आवडेल असेच मिळेल. शुभदिनांक २९–३०

महिलाना : चालू धंद्यात व्याप वाढेल. पैशाचा प्रश्न सुटेल.

विद्यार्थ्यांना : तुमच्या बुद्धीची चमक तुमचे यश वाढवील.

**धनू :** संमिश्र यश

दोलायमान परिस्थितीतून तुम्ही आता बाहेर पडता आहात, याची खात्री बाळगा. या वेळी तुमचे मनोरथ बऱ्याच प्रमाणात सफल होतील. उपासना अगर देवधर्म करणाऱ्यांना मानसिक समाधान मिळणार आहे. सार्वजनिक कार्याला योग्य प्रोत्साहन मिळणार असून तुमचे सुप्त गुण प्रकाशात येणार आहेत. मन मोकळे ठेवा व ठरवून कामाला लागा. आर्थिक बाजू भक्कम होण्यास अजून काही काळ तरी वाट पाहावी लागेल. लॉटरीरेसमध्ये भाग घेऊन नशिबाची परीक्षा पाहायला हरकत नाही. नोकरीच्या बाबतीत थोडीफार सुधारणाच होईल. अडचणी कमी होतील. शुभ दिनांक २७–२९.

महिलांना : मंगल कार्यात पुढाकार मिळेल. शिक्षिकांना शुभकारक आहे.

विद्यार्थ्यांना : एखादी महत्त्वाची घटना घडेल.

**मकर :** सावध राहावे

यशालादेखील कधीकधी दृष्ट लागते, याचा प्रत्यय येईल तुम्ही स्वत.ला अजिक्य समजता, पण दैव असे अजिक्यपद कुणास देत नाही याची जाणीव ठेवावी लागेल. नोकरीत तुमचे वर्चस्व आहे. परंतु तुम्ही डावपेच करताना मात्र फार सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. वरिष्ठांच्या विरुद्ध वागणे हितकारक ठरणार नाही. खासगी नोकरीत मालकांच्या मनात तुमच्याबद्दल द्विधा मनःस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. चालू कामात बदल होणार नाही. बेकाराना कामाचे आश्वासन मिळेल. व्यापारधंदा प्रगतीकडे झुकला नाही तरी नुकसान नाही. राजकारणात फारसा बदल होणार नाही. शुभ दिनाक २९–३०.

महिलाना : तब्येत सुधारून कोणतेही काम करण्यात उत्साह वाटेल.

विद्यार्थ्यांना : शैक्षणिक कामाच्या निमित्ताने प्रवास घडेल.

**कुंभ :** धंद्यात भरभराट

हा आठवडा तुम्हाला प्रगतीचा नवा मार्ग दाखवणार आहे. दशमस्थानी रवी-मंगळ ही एकच गोष्ट एवढी असामान्य आहे, की तुम्ही म्हणाल ते करण्याचे सामर्थ्य या वेळी तुम्हाला प्राप्त होईल. औषधे, खते, लोखंडी सामान, जमिनीची खरेदी-विक्री, साखर हे धंदे भरभराटीला येतील. वकिलीचा व्यवसाय एकदम अनुकूल रूप धारण करील, तर राजकारणात मोठी प्रतिष्ठा प्राप्त होईल. राजकारणात सत्तादेखील मिळू शकेल. नोकरीत तुम्ही 'वरिष्ठ' व्हाल. मालकाची मर्जी राहून अनेक महत्त्वाची अधिकारपदे भूषविण्याचे स्वप्न साकार होईल. यावेळी परदेशी प्रवास होण्याची देखील शक्यता आहे. शुभ दिनांक १–२.

महिलांना : मोठेपणा व मान सहज मिळून जाईल.

विद्यार्थ्यांना : सार्वजनिक कार्यात श्रम कारणी लागतील.

**मीन :** सारी अनुकूलता

राशिस्वामी गुरू पुढील आठवड्यात दुसरा होणार आहे, त्यापूर्वी तुमचे सारे हेतू व बेत तडीस नेणे उपयुक्त ठरेल. या वेळी तुमच्या प्रगतीची सूत्रे रवी व मंगळाच्या हातीच आहेत. असामान्य कर्तृत्व व मनात आणाल ते घडवण्याचे सामर्थ्य या दोन ग्रहांत आहे. यावेळी म्हणूनच नोकरीत तुमचा प्रभाव वाढणार असून वरिष्ठाना तुमच्या सल्ल्याचीच नव्हे तर सहकार्याचीदेखील गरज भासणार आहे. तुम्ही जर लेखक असाल तर तुमचा सरकारी पातळीवर गौरव होणार आहे. तुम्ही जर स्वतःचे प्रकाशन काढणार असाल तर त्याला अनुकूलता आहे. आर्थिक बाजू भक्कम नसली तरी गरजा भागणार आहेत. शुभ दिनाक २८–२९.

महिलांना : माहेरच्या मंडळीचा सहवास लाभणार आहे.

विद्यार्थ्यांना : शिक्षणाच्या निमित्ताने प्रवास घडू शकेल. ☐



# जग कुठं चाललंय ?

## इच्छामरण

प्रेमाला भिणं म्हणजे जीवनालाच भिणं आहे आणि जे जीवनालाच भितात ते आधी तीनचतुर्थांश मेलेलेच असतात, असं बरट्रँड रसेल यानं म्हटलं आहे.

जीव देण्याचं किंवा स्वतःचा जीव घेण्याचं स्वातंत्र्य स्वतःला असावं का ? असा सामाजिक प्रश्न या औद्योगिक कंटाळवाण्या रटाळ जगात चर्चिला जात आहे. जीव माझा आहे, त्याचं मी वाटेल ते करीन, असं म्हणता येईल का ? अर्थात दुसऱ्याचा जीव घेण्यापेक्षा स्वतःचाच घेतलेला , बरा. दुसऱ्याच्या खिशात हात घालण्यापेक्षा स्वतः-च्याच खिशात हात घातलेला बरा.

'अरे, नखं खाऊ नको.' शाळेतील वर्ग-मास्तर नखं खाणाऱ्या मुलाला सांगतो.

'पण नखं माझी आहेत, सर!' विद्यार्थी उत्तराचा टोला हाणतो.

अशातलाच प्रकार. पण हे उत्तर योग्य आहे का !

मृत्यू हा कित्येकांना शिक्षा, कित्येकांना देणगी किंवा वरदान व कित्येकांच्यावर मृत्यू ही एक मेहेरबानी म्हणून येते, असं सेनेकानं म्हटलं आहे.

प्रत्येकाला जसा जगायचा हक्क आहे, तसाच काही विशिष्ट परिस्थितीत वैकुंठाला जाण्याचा हक्क असू द्यावा का ? हा प्रश्न दिवसेंदिवस सुधारलेल्या जगास ग्रस्त करीत आहे. वैद्यकशास्त्रातील शोधांनी म्हाताऱ्यांची संख्या वाढत आहे व नवीन नवीन रोगांनी व हरएक प्रकारच्या प्रदूषणामुळं लोक जर्जर होत आहेत. आपले डोळे कायमचे मिटतील तर बरं, अशी कित्येकांची भावना होत आहे.

स्वतःच्या इच्छेप्रमाणं व इच्छित वेळेला मरण्याची मुभा व हक्क अगर दुसऱ्याच्या साहाय्यानं आपलं मरण ओढविण्याचा हक्क (युथेनेशिया) जास्त जास्त लोकप्रिय होत आहे. वर्षानुवर्षं मरणाच्या दारी खितपत पडण्यापेक्षा, सगळा कारभार लवकरच आटोपलेला बरा, अशी ही विचारसरणी. रोगजर्जर माणसानं मृत्यू आणणारी गोळी घेऊनसुद्धा वाचला तरी तो आत्महत्येचा प्रयत्न म्हणून गुन्हा होऊ नये व डॉक्टरानं रोग्याच्या इच्छेप्रमाणं गोळी अगर इंजेक्शन दिल्यानं मृत्यू आल्यास तो प्रकार खुनाच्या सदरात पडू नये, हा विचार बळावत आहे.

अमेरिकेतील लोकमत मोजणारे मर्व्हिन फील्ड यांना असं दिसून आलं की, कॅलि-फोर्नियातील बहुतेक लोक वरील मताचे आहेत. या शहरातील प्रातिनिधिक व निर-निराळ्या व्यवसायातील व थरांतील ५०४ लोकांची तपासणी करता असं आढळून आलं की, ८७ टक्के लोकांचं मत असं की, रोग्याला अगर पीडित झालेल्या माणसाला आयुष्य विनाकारण लांबविणारी औषधं नाकारण्याचा हक्क असायला हवा. यांपैकी काही लोकांची मतं तर याहीपेक्षा प्रगत. त्यांचं म्हणणं असं की, असाध्य रोगांनी शरपंजरी पडलेल्या माणसांना यातना न होता, आयुष्य संपुष्टात आणणारी औषधं मागण्याचा व मिळण्याचा हक्क आहे. ६३ टक्के लोक या मताचे होते व त्यांपैकी ४१ टक्के सत्तरीच्या पुढील. (टाईम २८–४–१९७५)

दुःखी जीवनातून सुटका करून घेण्याची ही सर्व धडपड.

जीवनाबद्दलची भीती हाच विसाव्या शतकातील आवडता रोग आहे, असं वुइल्यम फेल्प्स यानं म्हटलं आहे.

□

## वजनदार माणसं

वजन, विशेषतः महिलांना एक मोठी चिंतेची गोष्ट होऊन बसली आहे. वजन–मापांचे अधीक्षक असूनसुद्धा व्यापारी ग्राहकांना वजनात हातोहात फसवीत आहेत. माणसं जास्त जास्त वजनदार होत आहेत पण त्यांच्या शब्दांना वजन नाही. गाणारे खूप निघालेत पण त्यांच्या आवाजाला, स्वरांना वजन नाही. कागदांवर वजन ठेवल्याशिवाय कचेरीतील कागद सरकत नाहीत. विद्वत्ता नाही, तपश्चर्या नाही, चारित्र्य नाही तरी पण लोक दुसऱ्यावर वजन मारण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशा वजनांच्या अनंत सामाजिक समस्या उपस्थित झाल्या आहेत.

जर्मन लोक वजनदार, संस्कृतात पीन असं म्हणतात. पश्चिम जर्मन सरकारनं आपले प्रजाजन किती लठ्ठ, पीन आहेत याचं नुकतंच संशोधन केलं. तसा पीन हा शब्द किती सुटसुटीत हडकुळा आहे. वापरायला अगदी हलका लठ्ठ नाही. अशक्त माणसानंसुद्धा सहज उच्चारावा. या संशोधनाचे कामी ४६ शास्त्रज्ञ सतत ३ वर्षं काम करीत होते. ६४८ पानी त्यांचा अहवाल आहे. त्यांचा एकंदरीत निष्कर्ष असा की, जर्मन पुरुषांना जरी आहारातील कॅलरीजची जाणीव असली तरी ते मोठ्या बटाट्यासारखे असतात व जर्मन महिला टच्च फुगलेल्या पुरीसारख्या असतात. (टाइम्स ५–७–१९७६)

सर्वसाधारणपणे ५० टक्के जर्मन लोकांचं वजन प्रमाणाबाहेर असतं व त्यातील २० टक्के लोकांचं वजन तर खूपच. मांसाचे व चरबीचे डोंगरच ते. आदर्श वजन फक्त १० ते १५ टक्के लोकांचं असतं. २६ टक्के शाळ-करी मुलींचं वजन व २५ टक्के शाळेतील मुलांचं वजन प्रमाणाबाहेर ओसंडून जात असतं.

बर्लिनमधील लोक दही (योगर्ट) खातात. नाताळात चॉकोलेटचा खप १४ पट जास्त वाढतो. समाजातील सर्व आर्थिक थरात हा लठ्ठपणा शिरला आहे असं आढळून आलं. समाजात ही सर्व कलागत लावणारी खोडचाळ वस्तु म्हणजे साखर.

या संशोधनात असं दिसून आलं की जर्मन लोक वाजवीपेक्षा जास्त खातात. आहार शास्त्रज्ञांच्या मताप्रमाणे माणसानं दर-दिवशी जास्तीत जास्त ७८ ग्रॅमपर्यंत स्निग्ध, पदार्थ, म्हणजे लोणी तेल वगैरे खायला हरकत नाही. परंतु जर्मन महिला स्निग्ध खाद्य रोज सरासरीनं १२१ ग्रॅम व पुरुषांचं १४२ ग्रॅम असल्याचं आढळून आलं. आरोग्य-शास्त्राच्या नियमाप्रमाणं माणसानं एका विशिष्ट कॅलरीजपर्यंत आहार ठेवावा हे

युक्त होय. परंतु अनेक जर्मन स्त्रीपुरुष दररोज त्या प्रमाणापेक्षा १००० कॅलरीजचा जास्त आहार घेतात असं संशोधनांती दिसून आलं. मुलं गोड पदार्थ अतोनात खातात व म्हाताऱ्या बाया क्रीम केक्स मनमुराद खातात असं पाहाणी करणाऱ्यांना आढळलं व पुरुष दारू हं म्हणून पितात. ३६ ते ५० या वयाच्या गटातील जर्मन पुरुष दिवसाकाठी स्वाहा करीत असलेल्या कॅलरीज पैकी ४७४ कॅलरीज म्हणजे सुमारे १२ टक्के दारूमधून गिळंकृत करतात.

या सर्व गोष्टींचा अपरिहार्य परिणाम म्हणजे लठ्ठपणाची वाढ. त्यामागोमाग हृदयविकार, रक्तदाब, अर्धांगवायु व मधुमेह हे हमखास न आमंत्रण देता चालत येतात. दारूमुळं यकृत व प्लीहा यांचे विकार वाढू लागतात. दंतविकार वर डोकं काढू लागतात. शाळेतील मुलांची दंततपासणी करता ९७ टक्के मुलांत दातात पोकळ्या निर्माण झाल्याचं संशोधनात दिसून आलं. वीस वर्षांवरील २५ टक्के जर्मन लोक कृत्रिम दातांच्या कवळ्या वापरतात.

असं हे दंतपुराण बरंच लांबविता येईल. तात्पर्य असं की स्वतःच्या खर्चानं सुद्धा लठ्ठ होणं हे कांही चांगलं नाही. स्वतःच्या व समाजाच्या आरोग्याला व अर्थव्यवस्थेला विघातक आहे.

जो आपल्या पोटाकडे लक्ष देत नाही तो दुसऱ्या कशाचीही पर्वा करणार नाही असं डॉ. जॉन्सननं म्हटलं आहे.

□

## स्त्रीची सागरी महत्त्वाकांक्षा

स्त्रियांना घटनेप्रमाणं समान हक्क आहेत. कोठल्याही व्यवसायात त्यांना मज्जाव नाही. पण या समान हक्काच्या बजावणीचे परिणाम समान होतातच असं नाही.

खरी समता ही स्मशानात असते अशी एक जर्मन म्हण आहे.

अमेरिकेतील नॅन्सी डोनेली ही एक ऐन विशीतील चटकदार महत्वाकांक्षी तरुणी. तिची एक मुलखावेगळी महत्वाकांक्षा. एकाद्या जहाजावरील अधिकारी व्हायचं. सन १९७५ मध्ये तिनं यू. एस. मर्चंट मरीन अकेडमी


☆ ☆ ☆

दुसऱ्या आवृत्तीच्या वाटेवर असलेली

# राजहंस प्रकाशने

□ **सांगत्ये ऐका**
हंसा वाडकर
(तिसरी आवृत्ती)

□ **टॉलस्टॉय-एक माणूस**
सुमती देवस्थळे

□ **श्रीग्रामायन**
श्री. ग. माजगावकर

□ **शतपावली**
रवींद्र पिंगे

□ **पुरंदऱ्यांची दौलत**

□ **पुरंदऱ्यांची नौबत**
ब. मो. पुरंदरे

☆ ☆

किंग्ज पॉईंट येथे नाव नोंदवलं व प्रवेश मिळवला. तिला कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं. या संस्थेत १९७४ पासून स्त्रियांना प्रवेश दिला जात आहे व १९७६ मध्ये २५ महिला तेथे सागरी प्रशिक्षण घेत आहेत. पण काय झालं कोण जाणे. स्त्रीचं चरित्र परमेश्वरालासुद्धा अगम्य सप्तमस्थानात कोण पापग्रह बसला होता काही सांगता येत नाही. त्यानं आपला प्रभाव दाखवायला सुरुवात केली.

गेल्या मार्चमध्ये एका सायंकाळी नृत्य-समारंभानंतर ती व तिचा एक मित्र मार्क लेविस २२ आरमारातील शिकाऊ सैनिक मजा करीत हिंडत होते. तो तिचा प्रेमदोस्त. नंतर ती दोघे तिच्या वसतिगृहाच्या खोलीवर जाऊन त्यांनी त्या रात्री सहशय्या केली. बहुतेक कॉलेजांची प्रथा अशी की, कॉलेजातील वसतिगृहात अगर कॉलेजच्या जागेत जर विद्यार्थ्यांनी कामाचरण केलं तर त्यांच्यावर चांगलंच रागवायचं, परंतु प्रत्यक्ष कृती काहीच करायची नाही. परंतु तिच्या दुर्दैवानं मर्चंट मरीन ॲकेडमीची तशी प्रथा नाही. ॲकेडमीच्या नियमाप्रमाणं जर कोणी विद्यार्थ्यांनं वसतिगृहात अगर बराकीत एकत्र शयन केलं तर ते विद्यार्थ्याला न शोभणारं असं कृत्य आहे व या अपराधाला शिक्षा म्हणजे ॲकेडमीतून बाहेर घालवणं.

तिच्या खोलीतील एका मैत्रिणीनं व दुसऱ्या एका शिकाऊ विद्यार्थ्यानं नॅन्सी व मार्क यांना सहशय्येत पाहिलं व त्या विद्यार्थ्यानं ॲकेडमीच्या अधिकाऱ्यांना ही सर्व बातमी दिली. या अधिकाऱ्यांनी नॅन्सीनं राजीनामा देऊन निघून जावं असा दबाव आणला, पण मार्कविरुद्ध काहीच कारवाई केली नाही. खबऱ्या विद्यार्थी म्हणू लागला की, आम्ही तेथे ॲस्पिरिन आहे काय पाहायला गेलो होतो त्या वेळी आम्हाला ते विश्वरूपदर्शन झालं.

ॲकेडमीचे अधिकारी पुढे म्हणू लागले की, 'नॅन्सीबरोबर कोण झोपला होता कोण जाणे. तो पांघरुणात खोल गुरफटून झोपला होता. त्यामुळे तो नक्की कोण होता, त्याचा पत्ता लागला नाही. आम्हाला एवढंच माहीत आहे की, त्याचे केस भुरे होते. नंतर आम्ही तिच्या भुऱ्या केसांच्या दोस्ताला बोलावलं पण त्यानं हा सर्वच प्रकार साफ नाकारला. मी त्या गावचाच नव्हे, असं तो म्हणू लागला. नॅन्सीसुद्धा मार्क लेविस हा तिच्या शेजारी झोपला होता, हे सपशेल नाकारू लागली व मार्क लेविस हा तिचे माहितीचासुद्धा नाही, असं म्हणू लागली.'

ॲकेडमीचे अधिकारी तिच्यावर दडपण आणू लागले व त्यांनी तिच्यापुढं एकच पर्याय ठेवला व तो हा की, तिनं जर ॲकेडमी सोडली तर मार्कला ॲकेडमीत राहू देऊन पदवीपर्यंत शिक्षण घेऊ देऊ. शेवटी त्यांनी आपले शब्द खरे केले.

नॅन्सीला ॲकेडमीबाहेर नाइलाजाने पडावं लागलं. ती जळफळत राहिली व कडवटपणानं म्हणाली की, 'माझा दोस्त कोण आहे, हे सर्वांना माहिती होतं व आहे. अखेरीस मार्कला जून १९७६ मध्ये पदवी मिळाली. अधिकाऱ्यांनी एक तर आम्हा दोघांनाही ॲकेडमीबाहेर हाकलून द्यायला हवं होतं किंवा त्यांनी आम्हा दोघांनाही ॲकेडमीत राहू द्यायला हवं होतं. परंतु त्यांनी आम्हा दोघांना भिन्न वागणूक दिली व माझ्याविरुद्ध भेदभाव केला व अखेरीस मला बळी दिलं.'

मेरीलँडमधील सेनेटचे सभासद ग्लेन बेल हे याबाबतीत चौकशी करीत आहेत व ती लैंगिक भेदभावाचा बळी आहे किंवा नाही हे पाहत आहेत. ॲकेडमीचे अधिकारी म्हणतात की, आम्ही तिच्याबाबतीत लैंगिक भेदभाव केला नाही.

नॅन्सीचा वाङ्‌निश्चय झालेला आहे. ती म्हणते की, 'माझं सगळं ध्येय धुळीला मिळालं. मी मार्कशी विवाह करीन व मिळेल ती नोकरी पत्करल्याशिवाय मला गत्यंतर नाही.'

अशी ही लैंगिक समतेची कहाणी व शोकांतिका आहे.

समता, समानता ही सर्व कथा कादंबऱ्यांतच ठीक. निसर्गात समता नाही. सृष्टीत नाही, जगातील व्यवहारात नाही.

ब्रिटिश कादंबरीकार व शास्त्रज्ञ स्नो यांनी म्हटलं आहे की, 'माणसं ही मरणात समान असतात. माणसं जन्मतःच समान असत नाहीत. माणसं ही कोऱ्या कागदासारखी जन्माला येतात व त्या कोऱ्या कागदावर मुलाच्या आईबापांनी, शिक्षकांनी व परिस्थितीनं लिहायचं असतं, ही कल्पनाच मूर्खपणाची आहे.' (टाईम ६-११-७२).

ही सुधारलेल्या व स्त्रीदास्यविमोचनाच्या माहेरघरातील परिस्थिती. भारतातील स्त्रियांना रास्त व योग्य स्वातंत्र्य तरी किती मिळतं व तिच्याविरुद्ध भेदभाव केला जातो किंवा नाही, हा ताळा ज्यानं त्यानं मनात घालून पाहावा.

'स्त्री होणं हे एक भयानक कठीण काम आहे, कारण मुख्यत: तिची गाठ पडायची आहे ती पुरुषाशी व वागायचं आहे ते पुरुषाशी' असं जोसेफ कॉनरॅड यानं म्हटलं आहे.

आणि मार्क लेविसचं काय नशीब आहे पाहा! करून सवरून नामानिराळा.

वि. रा. तळाशीकर